किंमत १ रुपया
(वा. वर्गणी ६ रु.)

Reg. No. B. 3434 Licence No. 53.
Licenced to post without prepayment

# अर्थ


## दिवाळी अंक

वर्ष २० | पुणें, बुधवार तारीख २७ ऑक्टोबर, १९५४ | अंक ४१



पुणें येथील महाराष्ट्रीय बँकांची परिषद
( २ व ३ ऑक्टोबर, १९५४ )

# " अर्थ " साप्ताहिकातर्फें पाहुण्यांचा सत्कार व अल्पोपाहार



परिषदेचे अध्यक्ष, श्री. वा. पुं. घैर्द व स्वागताध्यक्ष श्री. के. पी. जोशी हे मध्यभागीं. " अर्था " चे संपादक श्री. श्री. ग. काळे हे डाव्या बाजूच्या पहिल्या खुर्चीवर.

### वाटाड्यांच्या शिक्षणाचा वर्ग

भारतांत येणाऱ्या परकीय प्रवाशांना देश पहाण्यास मदत करण्यासाठी खास वाटाडे शिक्षण देऊन तयार करण्यांत येणार आहेत अशा शिक्षणाचा एक वर्ग १ नोव्हेंबरपासून दिल्ली येथें सरकारच्या पुरस्कारानें चालू करण्यांत येत आहे. ह्यापूर्वी चालू वर्षीच्या जुलै ते सप्टेंबरपर्यंत असाच एक वर्ग मुंबईला उघडण्यांत आला होता.

### सिनेमासंबंधी कांहीं आकडे

भारतामधील सर्व सिनेमागृहांत मिळून दरवर्षी सुमारें ६० कोटी लोक सिनेमा पहातात. प्रत्येक हिंदी नागरिक दरवर्षी सरासरी १ रु २ आणे सिनेमा पहाण्यासाठी खर्च करतो. भारतामधील सिनेमागृहांची संख्या ३,५०० आहे. स्टुडिओंची संख्या ६५ असून त्यामधून दरवर्षी सुमारें २३८ चित्रपट तयार केले जातात. सिनेमाच्या धंद्यांत सुमारें ४२ कोटी रुपये भांडवल गुंतलेलें आहे.

### भारतीय बोलपटांचा गौरव

रशिआंत दाखविण्यांत आलेल्या भारतीय बोलपटांचें तेथील लोकांनीं खूप स्वागत केलें. लेनिनग्रॅड शहरांत एकाच दिवशीं २ लाख प्रेक्षकांनीं भारतीय बोलपट निरनिराळ्या सिनेमागृहांतून पाहिले. किएव्ह शहरांत चार दिवसांत ५०,००० प्रेक्षकांनीं भारतीय बोलपट पाहिले. 'दो बिघा जमीन' ह्या बोलपटाचें वृत्तपत्रांनीं विशेष स्वागत केलें.

### नवीन पोलादाचा कारखाना

भारताचे प्रसिद्ध उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला ह्यांनीं सोव्हिएट रशिआच्या मदतीनें पोलादाचा एक नवीन कारखाना काढण्याचें ठरविलें आहे अशी बातमी आहे. संकल्पित कारखान्यांत यांत्रिक हत्यारें तयार करण्यांत येणार असल्याचें समजतें.


## पूर्व खानदेश सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. जळगांव

मुख्य कचेरी : जळगांव

तारेचा पत्ता "EKCOBANK" टेलिफोन नं. ३५४

......प्रगतीचे बोलके आंकडे......

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. | २५,००,००० |
| वसूल भाग भांडवल | रु. | १५,७३,५०० |
| राखीव व इतर गंगाजळी | रु. | २०,५१,११२ |
| ठेवी | रु. | १,८६,५८,६७० |
| सहकारी संस्थांकडील कर्जें | रु. | १,२२,१०,९३८ |
| व्यक्तींकडील कर्जें | रु. | २३,८३,१८० |
| रोख्यांत गुंतविलेली रक्कम | रु. | ८३,५८,६८४ |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

शाखा १३ : अंमळनेर, भुसावळ, बोदवड, चाळिसगांव, चोपडा, धरणगांव, एरंडोळ, फैजपूर, जामनेर, पाचोरा, पारोळा, रावेर व यावल.

उपशाखा १२ : भडगांव, एदलाबाद, नशिराबाद, निंभोरा, मेहुणबारे, म्हसावद, कजगांव, सावदा, शेंदुर्णी, वरणगांव, वरखेडी व भालोद.

जळगांव हेड ऑफिसला व पारोळा शाखेस सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय आहे.

डब्ल्यु. डी. साळुंखे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर

आर. वाय. सोनवणे, मॅनेजिंग डायरेक्टर

## पुणें म्युनिसिपल कार्पोरेशन सर्व्हंट्स को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लिमिटेड.

७३ बुधवार पेठ, पुणें शहर

[ स्थापना १९१४ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १,५०,००० |
| वसूल भांडवल | रु. | ८८,१८० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ३९,५६६ |
| खेळतें भांडवल | रु. | ५,५०,००० |

मा. सल्लागार मंडळ :—(१) मा. रा. द. भट अध्यक्ष, (२) मा. दि. न. धाकस उपाध्यक्ष, (३) मा. रा. ग. जोशी, (४) मा. डॉ. प्र. रा. महाजनी, (५) मा. डॉ. दे. त्र्यं. विसाळ.

मा. कार्यकारी मंडळ :—(१) मा. सि. धों. आव्हनावे—चेअरमन. (२) मा. कृ. द. घारमळकर—व्हा. चेअरमन. (३) मा. व. रा. कोतवाल. (४) मा. सो. शं. नाईक. (५) मा. श्री. ह. मोघे. (६) मा. द. ल. भडगांवकर. (७) मा. ना. धों. भोकरे. (८) मा. त्र्यं. रा. देशपांडे. (९) मा. रा. ता. कांबळे. (१०) मा. वि. द. नवल. (११) मा. भि. वि. पाटील.

सभासद व बिगर सभासद यांच्या सेव्हिंग, चालू व हप्तेबंद ठेवी स्वीकारल्या जातात. इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ना. कृ. कुलकर्णी
सेक्रेटरी

मुंबईत गेलें ३० वर्षें
विश्वासपात्र ठरलेले व खात्रीचे
## चष्म्यांचे व्यापारी
आर. एन. शिंदे अँड सन्स
लक्ष्मी रोड, पुणें २.

# कण आणि क्षण

दुसरी आवृत्ति

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

पृष्ठसंख्या १९८
कि. २॥ रु.

## गुजराती आवृत्तीची प्रस्तावना

### लेखक : श्री. गणेश वासुदेव मावळंकर, अध्यक्ष, "लोकसभा", नवी दिल्ली

महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विचारवंत लेखक, श्री. श्रीपाद वामन काळे, यांनीं "कण आणि क्षण" ह्या शीर्षकाखाली स्वतःच्या कांहीं लेखांचा संग्रह प्रसिद्ध केला आहे. 'सुखी जीवनाच्या पाऊलवाटा' हें या पुस्तकाचें थोडक्यांत वर्णन श्री काळे यांनीं स्वतःच केलें आहे. मराठी वाङ्मयांत हें पुस्तक इतकें लोकप्रिय झालें आहे कीं, अल्पावधींत त्याची दुसरी आवृत्ति प्रसिद्ध करावी लागली. या पुस्तकाचें गुजरातींत रूपांतर करून प्राध्यापक शशीन ओझा यांनीं गुर्जर जनतेची फार मोठी सेवा केली आहे असें मीं म्हटलें, तर त्यांत जरा सुद्धां अतिशयोक्ति नाहीं.

एका मराठी पुस्तकाचें रूपांतर करून 'महान् सेवा' ती कशा प्रकारें झाली, असा प्रश्न स्वाभाविक रीतीनें कोणाच्याहि मनांत येईल. मराठी पुस्तकांत अशा कोणत्या तत्त्वज्ञानाचा समावेश केला आहे, कीं जें हिंदमध्यें दुसऱ्या कोणालाहि नवीन वाटावें ! मी प्रथमच सांगून टाकतों कीं, गुजराती जनतेला माहीत नसलेलें असें कोणत्याच प्रकारचें तत्त्वज्ञान या मराठी पुस्तकांत नाहीं. पण वैचारिक आणि सामाजिक, त्याचप्रमाणें व्यक्तिगत जीवनासंबंधीं जी एक दृष्टि आहे तीतच त्यांतील लेखांचें वैशिष्ट्य आहे.

जीवनांत सुखी होण्याची प्रत्येकाची स्वाभाविक इच्छा असते व त्यासाठी अविरत व प्रामाणिक प्रयत्नहि चालू असतात; पण त्यासाठी जे धर्मनियम व संयम पाळावे लागतात, ते पाळणें अनेकांना जमत नाहीं आणि असें असून देखील सुखी होण्याची तीव्र इच्छा तर त्यांना असतेच. पण पुष्कळ अंशीं असें दिसून येतें कीं, खरें सुख अथवा सुखी कौटुंबिक व सामाजिक जीवन म्हणजे काय याची त्यांना जाणीवच नसते आणि कदाचित् असली तरी तें सुखी जीवन साध्य करण्याच्या मार्गाचें ज्ञान त्यांना नसतें. आपल्या लेखांत दैनंदिन जीवनांतील साध्या साध्या गोष्टी घेऊन त्यांतन श्री. काळे यांनीं सुखी जीवनाची किल्लीच जणूं काय प्रत्येकाच्या हातांत दिली आहे. जो वाचील, विचार करील, समजून घेईल आणि आचरणांत आणील, त्याला कौटुंबिक आणि सामाजिक सुखाचें भांडार खुलें झालेलें सांपडेल, यांत शंका नाहीं.

सामुदायिक सोय, सहकार्य आणि सुख कसें साधेल ही दृष्टि दरेक प्रश्नाकडे ठेवून व्यक्तीनें कशा रीतीनें वागलें पाहिजे, तें श्री. काळे यांनीं अगदीं स्पष्ट सांगितलें आहे; आणि उदाहरणेंहि अशा प्रकारें दिलीं आहेत कीं, विषयाचें प्रतिपादन कलात्मक आणि सहज पटेल अशा प्रकारें व्हावें.

मूळ मराठी लेख स्त्रीवर्गासाठी प्रसिद्ध होणाऱ्या 'भगिनी' मासिकासाठी मुख्यतः वेळोवेळीं लिहिलेले आहेत, आणि त्यांचा हेतु आजच्या बदललेल्या काळांत कौटुंबिक आणि आर्थिक प्रश्नांची समस्या सोडविण्यास मदत व्हावी, हा आहे. भगिनीवर्गाला या लेखांची जेवढी आवश्यकता आहे तेवढीच बंधुवर्गाला पण आहे, असें माझें मत आहे. या पुस्तकांत जें लिहिलें आहे त्याचा विचार करून त्याप्रमाणें वर्तन करण्याचा जर प्रत्येक स्त्री-पुरुषानें निश्चय केला, तर सर्व समाजाचा नूर बदलून जाईल आणि सामाजिक जीवन, जें आज सामान्यपणें, दुःखमय आहे व वाटतें, तें खरोखरच सुखमय होईल.

मूळ मराठी पुस्तकाला प्रख्यात मराठी लेखक, प्राध्यापक ना. सी. फडके यांनीं एक छोटीशी प्रस्तावना लिहिली असून तिला "सुखप्राप्तीच्या कर्मयोगाचे सुबोध धडे" असें सूचक शीर्षक दिलें आहे. प्रा. फडके लिहितात:—

"सौंदर्य वस्तूंत नसतं, तर पाहणाऱ्याच्या दृष्टींत असतं व ज्याला सौंदर्यदृष्टि असते त्याला आजूबाजूस मुबलक सौंदर्य आढळतं. याप्रमाणेंच सुख संसारांत नाहीं—श्रीमंतींत नाहीं, गरिबींत नाहीं !—तर तें संसार करणाराच्या दृष्टींत आहे, व ज्याला सुख घ्यावं कसं आणि द्यावं कसं हें कळतं तो स्वतःचा संसार तर नेटका आणि सुखाचा करतोच, पण इतरांच्या जीवनांतहि समाधान व आनंद निर्माण करतो."

प्रख्यात "स्त्री" मासिकाचे संचालक श्री किर्लोस्कर यांनीं मोजक्या शब्दांत लेखकाचें अभिनंदन केलें आहे. श्री. किर्लोस्कर लिहितात :—

"जगांत बरींच माणसें दुःखीकष्टी दिसतात, तीं त्यांच्या वांट्याला सुखाचा भाग कमी आलेला असतो म्हणून नव्हे, तर स्वतःच्या आयुष्यांतून सुख कसें वेंचावें हें त्यांना ठाऊक नसतें, यामुळें. प्रत्येक फुलांत मध असला, तरी रातकिड्याला तो मिळत नाहीं; मधमाशीच तो गोळा करूं शकते. त्याचप्रमाणें, आपण हें ओळखलें पाहिजे कीं, सुख ही एखादी स्वतंत्र वस्तु नसून आयुष्याच्या प्रत्येक क्षणाला त्याचे सूक्ष्म परमाणू चिकटलेले असतात. ते कणाकणानें गोळा करतां येणें हीच आयुष्य सुखी करण्याची गुरुकिल्ली आहे."

"कण आणि क्षण" हें या पुस्तकाचें नांव कसें सार्थ आहे, हें यावरून दिसून येईल.

पुस्तक दरेक व्यक्तीला, दरेक कुटुंबाला मार्गदर्शक होईल अशा प्रकारचें आहे. आपल्या समाजांत वैचारिक भूमिकेची उंची आपण इच्छितों तेवढी उंच नाहीं. बहुतेक लोक गतानुगतिक व रूढिप्रियच असलेले आढळतात. स्वतंत्र विचार करून, उच्चारांत किंवा आचारांत रूढीपेक्षां, अगदीं थोडा का होईना, निराळेपणा दाखविणाऱ्या माणसाला समाजाचा उपहास किंवा निंदा सोसावी लागते व यामुळें साधारणपणें कोणी विचारच करीत नाहीं ! आणि त्याप्रमाणें आचरण करण्याचें धैर्य दाखवूं शकत नाहीं. यामुळें अज्ञानांत व रूढीच्या दडपणाखालीं सर्व जीवन जगावें लागतें व जीवनाच्या प्रत्येक क्षणाला दुःख व गुलामगिरी भोगावी लागते ! यामधून जर आपण समाजाला बाहेर काढूं शकलों, तरच कुटुंब आणि समाज सुखी होईल, स्वातंत्र्याचा सुखानुभव घेतां येईल व आपल्या देशाला मिळालेलं स्वातंत्र्य टिकवून ठेवतां येईल.

प्रा. शशीन ओझा यांनीं साध्या, सरळ भाषेत या पुस्तकाचें रूपांतर करून व्यक्ति, कुटुंब, समाज आणि देश यांची जी सेवा केली आहे, त्याबद्दल मी त्यांचें हार्दिक अभिनंदन करतों.

# अ नु क्र म णि का


१ संपादकीय ३५१
२ " सौख्य-संपदा तुमचीच " ३५२
३ खादीचा संदेश (वैकुंठ ल. मेहता) ३५३
४ रोटी व रोजगार (प्रा. द. गो. कर्वे) ३५४
५ लहान बँकांचें ग्रामीण भागांतील कार्यक्षेत्र (जे. व्ही. जोशी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) ३५५
६ शेतीला सहकारी संघटनेमार्फत भांडवलाचा पुरवठा (आर. जी. सरैया, प्रांतिक सहकारी बँक) ३५८
७ आयुर्विमा जगतांतील चालू घडामोडी (ज. रा. जोशी, अॅक्चुअरी, वेस्टर्न इं. विमा कं.) ३६१
८ आपल्या कारखानदारीचें भवितव्य ("विवेक परदेशी") ३६४
९ नागरी सहकारी बँकांतील कांहीं मूलभूत प्रश्न (शं. वि. संझगिरी, सारस्वत को. बँक, मुंबई) ३६५
१० हवामानाचे अंदाज कसे वर्तवितात (डॉ. मो. वा. चिपळूणकर) ३६७
११ बँकिंग विषयाच्या पदवीधरांविषयीं बँकांची अनास्था (ल. म. जोशी) ३७१
१२ बँकिंग अॅवार्डाचे बँकांच्या व्यवस्था खर्चावर परिणाम ३७३
१३ भारताच्या निर्यात व्यापाराचा आढावा ३७७
१४ सहकारी साखर कारखाने (डॉ. रा. गो. काकडे) ३७९
१५ पाकिस्तानांतील बँकिंग ३८१
१६ भारतीय शेतीच्या उत्पादनांतील वाढ ३८५
१७ भारताचे लष्करी उद्योगधंदे ३८७
१८ महत्त्वाच्या जागतिक संघटना ३८९


## "अर्था"चा पुढील अंक

"अर्था"चा पुढील अंक दि. १७ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल. दि. ३ व १० नोव्हेंबरचे अंक नेहमीप्रमाणें बंद राहतील.

## जाहिरातीमधील दुरुस्ती

रत्नाकर बँक लि. ची पृ. ३७८ वरील जाहिरात रद्द समजावी; त्याऐवजी ह्याच पृष्ठावरील त्या बँकेची जाहिरात अधिकृत समजावी, अशी विनंति आहे.


## "शिवदर्शन लॉज"

डेक्कन जिमखाना कॉर्नर,
पोष्टाशेजारीं, पुणें ४

★ सुशिक्षित लोकांसाठीं पुण्यांतील एकमेव निवासस्थान.
★ अत्यंत माफक दर व हवेशीर, स्वच्छ खोल्या.
★ संडास बाथरूम्स लगत.
★ कॉर्पोरेशन बस टर्मिनस् खालींच.
★ रिक्षा, टॅक्सीज् व इतर वाहनांची सोय.
★ फॅमिलीज्साठीं उत्कृष्ट व्यवस्था.
★ तार व पोष्ट ऑफिस जवळच.
★ फोनची खालींच व्यवस्था.
★ परीक्षक, व्यापारी मंडळी, व पुण्यांत मिटींग्सूसाठीं येणाऱ्या मंडळींसाठीं मुद्दाम बांधलेलें.

एकदां अनुभव घेऊन पहा.

प्रोप्रायटर
शिवाजीराव शिरोळे

## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३
मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—
सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली — चेअरमन
श्री. महादेव बाळाप्पा चौगुले, कोल्हापूर — व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा,
बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.

आमचे सर्व इष्ट-मित्रांस, ग्राहकांस व हितचिंतकांस
ही दिवाळी आनंदाची व नवीन वर्ष उत्कर्षाचें व सुखाचें जावो !

# भांडवलानें किमया केल्यास आश्चर्य नाहीं, पण केवळ-

कष्ट, सचोटी व चिकाटी यांचें द्योतक म्हणजेच

# दि सासवड माळी

## शुगर फॅक्टरी लिमिटेड.

तारेचा पत्ता : 'माळीशुगर' मुंबई ★ माळीनगर

माळीनगर (जि. सोलापूर)

मुंबई ऑफिस : फोन नं. २०१३४
सर विठ्ठलदास चेंबर्स
१६, अपोलो स्ट्रीट, फोर्ट.

## :प्रथम: ← प्रगतीचीं ठळक चिन्हें → :आज:

| :प्रथम: | :आज: |
| --- | --- |
| १. अधिकृत भांडवल: रु. ८,००,००० | रु. ५१,००,००० अधिकृत भांडवल |
| | रु. ४४,८४,८०० वसूल झालेलें |
| २. यंत्र-साधनेची शक्ति : दररोज : २५० टन ऊंस गळीत | विद्युत्-शक्तीवरील अद्यावत् यंत्रसामुग्री दररोज: १००० टन ऊंस गळीत |
| ३. पांच वर्षांपूर्वीं ऊंस उत्पादन : दर एकरीं ५० टन | आज ऊंस उत्पादन : दर एकरीं ७५ टन |

☞ पंढरपुरी पवित्र साखरेचे निर्माते ☜

अशा तऱ्हेनें प्रतिवर्षी १४५० एकरांत दर एकरीं ७५ टनाप्रमाणें ऊंस काढून या संस्थेनें जो उच्चांक गांठला आहे व जें उज्ज्वल यश कमविलें आहे त्यानें भारतांतील साखर कारखान्यांस विस्मयाचा धक्का दिला आहे.

**गवतांच्या झोपड्यांचें सुखसोयींनीं युक्त अशा नेत्रदीपक व टुमदार वसाहतींत रूपांतर.**

अः— राहणेस विनामूल्य घरें व विजेचे दिवे, डेअरी, गुरांचा दवाखाना, भाजीपाला, सहकारी किराणा दुकान, सहकारी क्रेडिट सोसायटी, वगैरे गरजा भागविण्याच्या सोयी.

बः— हॉस्पिटल, मॅटर्निटी होम, बालक-मंदिर, प्राथमिक शाळा, हायस्कूल वगैरे संस्था.

क्रः— त्याचप्रमाणें रेडिओ, मायक्रोफोन, वसाहतींत निरनिराळ्या ठिकाणीं लाउडस्पीकर्स, लायब्ररी, जिमखाना, टेनिस कोर्ट, कला-मंदिर, व्यायामशाळा, वगैरे करमणुकीचीं साधनें.

★ मालक, मजूर यांमधील सहकार्य व जिव्हाळा
★ काळाच्या पावलांचें अचूक आकलन
★ भारताच्या औद्योगिक भवितव्यतेवरील अढळ श्रद्धा
★ देशसेवेची व लोककल्याणाची जिवंत व ज्वलंत तळमळ

**या सर्वांचें प्रतीक म्हणजेच ही किमया**

संचालक मंडळ

१ श्री. रा. हरिभाऊ बळवंतराव गिरमे, मॅ. डायरेक्टर
२ ,, मारुतीराव खंडूजी पांढरे, चेअरमन
३ रावबहादुर नारायणराव सोपानराव बोरावके
४ श्री. रा. भगवंतराव गेनूजी गिरमे
५ ,, रघुनाथराव सोपानराव इनामके
६ श्री. रा. शंकरराव बाळकुजी इनामके
७ ,, सोपानराव बापूराव गिरमे
८ ,, शंकरराव भाऊराव राऊत
९ ,, शंकरराव शिवरामजी कुदळे

मॅनेजर : श्री. जी. एस. कारभारी, एम्. ए., एलएल्. बी.

# अर्थ

## दिवाळी अंक

बुधवार, ता. २७ ऑक्टोबर, १९५४





स्थापना : १९३५

*संस्थापक :*

प्रो. वामन गोविंद काळे

*संपादक :*

श्रीपाद वामन काळे


*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौधर्मकामाविति ।*

*—कौटिलीय अर्थशास्त्र*

---

**" अर्था "च्या वाचकांस व हितचिंतकांस नवें वर्ष आनंदाचें व समृद्धीचें जावो.**

## संपादकीय

" अर्था "चा २० व्या वर्षाचा हा दिवाळी अंक वाचकांस सादर करण्यास आम्हांस आनंद होत आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक अभ्युदयाचा पाया मजबूत व्हावा ह्यासाठी उपयुक्त वाङ्मय पुरवून मराठी वाचकांना क्रियाशील करण्यास साहाय्य करण्याच्या उद्देशानें संस्थापकांनीं हें साप्ताहिक १९३५ मध्यें सुरू केलें. संस्थापकांच्या निधनासहि आतां आठ वर्षें पुरीं होत आलीं आहेत. केवळ वैयक्तिक जबाबदारीवर केलेल्या ह्या उपक्रमास महाराष्ट्रीय जनतेचा जो पाठिंबा मिळाला, त्याबद्दल आम्हांला अत्यंत कृतज्ञता वाटते. एकाच ध्येयानें प्रेरित होऊन त्याच्या सिद्धीसाठी " अर्थ " अविरत प्रयत्न करीत आला आहे आणि त्याच्या साहाय्यकांस व हितचिंतकांस त्याच्या बहुमोल कामगिरीची जाणीव आहे, ह्याबद्दल आम्हांस आनंद होतो व हातीं घेतलेलें काम नेटानें चालविण्यास उत्साह वाटतो. आर्थिक पत्र चालविणें किती अवघड आणि नेटाच्या कार्यक्षमतेचें काम आहे, ह्याची कल्पना सहज येण्याजोगी नाहीं. पृष्ठसंख्या व त्यांतील ओळी, ह्यावरून त्याचें मूल्यमापन करावयाचें नसतें; तर त्यांतील मजकुराची निवड व त्याचे मागील सामाजिक व आर्थिक दृष्टिकोन, ह्यास महत्त्व द्यावयाचें असतें. सहाजीकच, जाणत्या लोकांच्या प्रोत्साहनाची आम्हांस विशेष किंमत वाटते. म्हणूनच भारत. सरकारचे अर्थमंत्री, श्री. चिंतामणराव देशमुख, ह्यांनीं " अर्था " संबंधीं काढलेले प्रशंसोद्गार येथें पुनः उद्धृत करण्यास संकोच वाटत नाहीं.

" कोणत्याहि जनसत्ताक राज्यविधानाचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे चालू घडामोडींविषयीं समंजसपणा व देशापुढील योजना व ध्येय यासंबंधीं सबोध उत्साह. हे आधारस्तंभ बळकट करण्याची जबाबदारी विशेषतः वृत्तपत्रांवर असते.

" सर्वसाधारण समाजाला आर्थिक घडामोडी ह्या स्वभावतःच दुर्बोध असतात व सध्यांच्या गुंतागुंतीच्या घडामोडींची अंतःप्रवणता समजणें त्याला विशेष कठीण असते.

" त्या समजून घेण्यांत त्यांना साहाय्य देणें हें आपल्या " अर्थ " या साप्ताहिकाचें कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. " अर्थ " ही कामगिरी फार उत्कृष्ट रीतीनें बजावीत आहे असें मी स्वानुभवावरून दृढविश्वासानें सांगूं शकतों. योग्य तें लोकसाहाय्य मिळून " अर्था "ची ही कामगिरी अव्याहत प्रभावीपणानें चालो. "

" अर्था "चे वाचक, लेखक आणि हितकर्ते सहाय्यक ह्या सर्वांस ही दिवाळी व नवें वर्ष सुखसमृद्धीचें जावो !

ह्या अंकांतील विषयांकडे लक्ष दिलें असतां असें दिसून येईल, कीं चालू आर्थिक प्रश्नांबाबत मार्गदर्शन व्हावें, असा त्यांत विशेष प्रयत्न करण्यांत आला आहे. श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं आपल्या " खादीच्या संदेशां "त आर्थिक विषमता नष्ट करण्याचें कार्य अद्याप पुरें झालेलें नाहीं, आणि विकेंद्रीकरणाची व विभाजनाची म्हणजे आर्थिक पुनर्व्यवस्था करण्याची जरूरी गांधीजींनीं हा संदेश प्रथम दिला तेव्हां जेवढी होती, तेवढीच ती आजहि आहे; खेड्यापाड्यांतील अर्धपोटी जनता रोजगारीची मागणी करीत आहे, बेकार भत्त्याची मागणी करीत नाहीं, त्यांच्या सेवेचेंच हें आवाहन आहे, असें कळकळीनें सांगितलें आहे.

बॉंबे स्टेट को. बँकेचे चेअरमन श्री. आर. जी. सरैया ह्यांचे शेतीच्या भांडवलपुरवठ्याबाबत विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. हा भांडवलपुरवठा सहकारी बँकांच्या कसा आवाक्याबाहेरचा आहे आणि रिझर्व्ह बँकेनें कांहीं पैसा पुरवला तरी तो कसा अपुरा पडेल, हें त्यांनीं दाखवून दिलें आहे. सरकार किंवा सरकारच्या पाठिंब्याची एकादी भरभक्कम संस्था ह्यांनीं सहकारी बँकांना भरपूर पैसे पुरविण्याची व त्यांतील कांहीं नुकसानी सोसण्याची जबाबदारी पत्करल्याविना आजच्या बँकिंग व्यवस्थेमार्फत नियोजित प्रगतीची अपेक्षा करणें चुकीचें होईल. उत्पादक कार्यासाठी उपयोगांत आणलेलीं कर्जें उत्पादनांतूनच फिटलीं जावींत ही योजना असली, तरी आपल्या देशांतील पूर आणि दुष्काळ ह्यांच्या आपत्तींमुळें शेतकऱ्याची उत्पादनशक्ति नाहींशी होण्याची नेहमींच भीति असते, त्याचाहि श्री. सरैया ह्यांनीं उल्लेख केला आहे.

" ज्या प्रमाणांत देश भांडवल उभारील, त्याच प्रमाणांत त्यांतील रोजगाराची वाढ होईल. चालू उत्पन्नांतून शक्य तेवढी बचत करून ती कोणत्या तरी विकास योजनेंत गुंतविणें आणि आपल्यापुरती आपल्या संसाराची योजना आखणें, ह्या गोष्टी राष्ट्रीय प्रगतीस उपकारक ठरतील. कुटुंबनियोजनाकडेहि लोकांनीं अधिक विवेकी दृष्टीनें पाहिलें, तर वाढता रोजगार मिळूं लागण्याचा दिवस अधिक जवळ येईल " असें प्रा. द. गो. कर्वे ह्यांनीं " रोटी व रोजगार " ह्या आपल्या लेखांत प्रतिपादलें आहे.

ग्रामीण विभागांतील लहान व्यापारी बँकांच्या स्थानाची चर्चा रिझर्व्ह बँकेचे एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर, श्री. जे. व्ही. जोशी ह्यांनीं केली आहे. " कांहीं विशिष्ट क्षेत्रांत लहान बँकांना मोठ्या बँकांपेक्षां विशेष अनुकूलता आहे आणि केवळ आकार लहान म्हणूनच त्यांचा भक्कमपणा किंवा त्यांचेवरील ठेवीदारांचा

विश्वास कमी असेल, असें म्हणतां येणार नाहीं; चांगल्या तऱ्हेनें चालविलेल्या व स्वतःच्या पायावर टिकाव धरणाऱ्या लहान बँकांनाहि भारताच्या वाढत्या आर्थिक संसारांत निश्चित स्थान आहे," असें त्यांनीं सांगितलें आहे.

श्री. संझगिरी ह्यांनीं सहकारी नागरी बँकांच्या कारभाराची केलेली मीमांसा सहकारीप्रमाणें व्यापारी बँकांच्या चालकांनाहि निश्चित मार्गदर्शक होईल. सचोटी, निस्वार्थीपणा, लायकी, जबाबदारीची भावना, कार्यक्षमता, योग्य दृष्टिकोन, तज्ज्ञ व अनुभवी अधिकारी–नोकर, इत्यादींबाबत त्यांचे विचार सध्यांच्या परिस्थितींत विशेष महत्त्वाचे आहेत.

आपल्या कारखानदारीचें भवितव्य कशावर अवलंबून आहे, ह्याचें मनोविश्लेषण "विवेक परदेशी" ह्यांनीं आपल्या अनुभवांच्या आधारें केलें आहे.

श्री. ज. रा. जोशी ह्या विमातज्ञानें हिंदी आयुर्विमा जगतांतील चालू घडामोडींचें उत्कृष्ट विवेचन केलें आहे आणि प्रगतीच्या दिशा दाखवून त्यांचे मार्गातील अडचणीहि निवेदन केल्या आहेत.

डॉ. चिपळूणकरांनीं आपल्या लेखांत हवामानाचे अंदाज कसें वर्तवितात, हें सुबोध भाषेंत सांगितलें आहे.

सहकारी साखर कारखान्यांबाबत एका सहकारी तज्ज्ञानें लिहिलेला लेख, सध्यां त्यासंबंधीं विशेष प्रयत्न चालू आहेत. अशा प्रसंगीं, अतिशय मार्गदर्शक होणारा आहे.

बँकिंग अवार्डचें बँकांच्या व्यवस्थाखर्चावर परिणाम, पाकिस्तानांतील बँकिंग, भारताच्या निर्यात व्यापाराचा आढावा, लष्करी महत्त्वाचे कारखाने, शेतीच्या उत्पादनाचे इंडेक्स नंबर, महत्त्वाच्या जागतिक संघटना, इत्यादि इतर विषयहि वाचकांना उद्बोधक वाटतील.

## "कार्यें नेतां तडिसी योजुन, सौख्य संपदा तुमचीच"

[ दिल्ली येथील साहित्य संमेलनाचे निमित्तानें, बेळगांव बँकेचे डायरेक्टर व "अर्था"चे मित्र श्री. गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., ह्यांनीं रचिलेल्या काव्यांतील कांहीं ओळी येथें उद्धृत केल्या आहेत. प्रस्तुत काव्यांत, श्री. सराफ ह्यांच्या रसिकतेबरोबर आर्थिक उद्धाराची त्यांची तळमळहि दिसून येत आहे.]

स्वातंत्र्यानें तुटती बंध । परसत्तेचे निर्बंध  
भरारी घ्यावया हो ! मर्द । बाहू आतां स्फुरतील ॥१॥

स्वत्वा आतां पुरता मान । स्वाभिमाना मिळें जीवन  
घरीं दारीं झालों आपण ! सत्ताधारी सकल से ॥२॥

करोनि गौरीशंकर सर । दुर्गम हिमालय शिखर  
तरुणां झाला स्फूर्तिनिधान । नरकेसरी तेनसिंग ॥३॥

बापुजींचे जे शिष्यवर । सर्वोदयास झाले सज्ज  
दलितां देववुनी दान । जगां सन्मार्ग दाविती ॥४॥

उद्योगांची होईल वाढ । धरणें त्यां होत साधन  
वाढतां संपत्तीचें मान । सुबत्ता ये सकलांसी ॥५॥

आशावादी बनूं बळकट । कार्यें नेतां तडिसी योजुन  
धनधान्यांची नसेच वाण । सौख्य संपदा तुमचीच ॥६॥

जाहो ! जगतामध्यें पुढें । होऊनी छातिचे निधडे  
जगा पुरुषार्थाचें जिणें । रेखा अक्षरें अमर ॥७॥

धरा हो ! शास्त्रांची संगती । नवनवे शोध जी देती  
मिळवुनी ते साहित्यासीं । सारस्वत श्रेष्ठ करा ॥८॥

ज्ञानगंगा वाहे जगतीं । नको तया आडवूं भिंती  
दाखवितां ज्ञानियाची वृत्ती । श्री सरस्वती पावेल ॥९॥

वेणुग्राम ( बेळगांव ) — गो. वि. सराफ

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतकांस  
नूतन वर्षाभिनंदन !

# बँक ऑफ पूना लि.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल | रु. १२,५०,००० |

मुख्य कचेरी :—४५५ रविवार, पुणें

शाखा :—(१) सदाशिव पेठ, पुणें १  
(२) भवानी पेठ, पुणें २.  
(३) सोलापूर (४) सांगली

पुणें व सांगली येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय.

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

जी. जी. साठे — मॅनेजर  
डी. आर नाईक जे. पी. — चेअरमन

स्थापना १९३८

# कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( कोल्हापूर जिल्ह्याची सेंट्रल फायनान्सिंग एजन्सी )

मुख्य कचेरी :—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर नं. १

शाखा :—१ हातकणंगलें २ जयसिंगपूर ३ मलकापूर ४ इचलकरंजी

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. ७,००,००० |
| वसूल शेअर भांडवल | रु. ३,१२,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ७१,००० |
| ठेवी | रु. २५,००,००० |
| खेळतें भांडवल | रु. ३७,००,००० |

हुंड्या, चेकस्, वगैरे बिलें वसुलीचे व बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

गो. म. घारगे — मॅनेजर  
व. गो. सरनाईक, M. A., LL. B. — प्रेसिडेंट

# खादीचा संदेश

( वैकुंठ ल. मेहता )

परकीय सत्तेपासून देशास मुक्त करण्याचा लढा सतत ६० वर्षे चालू होता. हा लढा सुरू करतांना पूर्वीच्या पिढीतील नेत्यांनीं आपल्या नजरेसमोर अनेक गोष्टी ठेवल्या होत्या. त्यापैकीं सर्वांत महत्त्वाची कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे देशांतील वाढतें दारिद्य होय. वाढत्या दारिद्र्यानें देशाची भौतिक, नैतिक व आध्यात्मिक अधोगती एकसारखी चालू होती. जनतेच्या दारिद्र्याचे हे भीषण परिणाम कसे नाहींसे करतां येतील ही इच्छा त्यांच्या मनांत सतत वास करीत होती. या भीषण दारिद्र्यानें देशाच्या आत्मिक शक्तीचा ऱ्हास होत चालला होता. या अधोगतीला मुख्य कारण कोणतें असेल तर परकीय सत्ता होती आणि म्हणून गांधीजींनीं ही परकीय सत्ता देशांतून हुसकावून लावण्याची कामगिरी अंगिकारली. परकीयांच्या या राजकीय सत्तेमुळें देशांत भयंकर आर्थिक विषमता निर्माण झाली होती. ही आर्थिक विषमता नष्ट करावी, हाहि परकीयांची राजकीय सत्ता नष्ट करण्याचा महत्त्वाचा उद्देश होता. ब्रिटिश सत्ता निघून गेल्यामुळें अर्धे कार्य पुरें झालें आहे. पण देशांतील आर्थिक विषमता नष्ट करण्याचें अर्धे कार्य अद्याप बाकी आहे.

शेतीच्या क्षेत्रांत श्री. विनोबाजी भावे यांनीं भूदान यज्ञ मोहीम सुरू करून हें उरलेलें कार्य पार पाडण्याचे प्रयत्न चालविले आहेत. आतां देशांत आपलें सरकार आहे आणि कायद्यानें आर्थिक विषमता नष्ट करून ग्रामीण भागांत परिवर्तन करण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. श्री. विनोबाजी भावे यांची भूदान यज्ञ मोहीम ही त्याला पूरक अशीच आहे. जीवनावश्यक गोष्टींच्या उत्पादनांत विकेंद्रीकरण आणि विभाजन हें या मोहिमेंत अभिप्रेत आहे. उत्पादन आणि विभाजनाचीं साधनें कामगारांच्या मालकीचीं असलीं पाहिजे अशी जी मार्क्सवाद्यांची मागणी आहे तिला हें अनुसरूनच आहे असें म्हटलें तरी चालेल. या विकेंद्रीकरणात्मक उत्पादनासाठी महात्मा गांधींनीं कापड धंद्याची निवड केली होती. कापड धंदा हा त्या दृष्टीनें योग्य आहे असें गांधीजींना वाटलें, त्याला दुसरेंहि कारण होतें. भारतांतील कापड धंद्याच्या विनाशावरच ब्रिटिशांच्या भारतावरील आर्थिक वर्चस्वाचा डोलारा उभा होता. हिंदचा धंदा जगत् विख्यात तर होताच, पण जास्तींत जास्त लोकांना रोजगारी देण्यासाहि तो समर्थ होता.

ही आर्थिक पुनर्व्यवस्था करण्याची जरूरी, गांधीजींनीं हा संदेश प्रथम दिला तेव्हां जेवढी होती तेवढीच ती आजहि आहे. भारतांतील कापडाचा धंदा हा चांगला प्रगत असून त्यानें ब्रिटिश कापडास देशांतून जवळ जवळ हद्दपार केलें आहे असें म्हटलें तरी चालेल. पण या धंद्याचें सर्व आर्थिक बळ केवळ कांहीं शहरांतच एकवटलें आहे. या धंद्यामुळें हातानें धंदा करणारे लक्षावधी लोक बेकार झाले आहेत आणि जीवनांतील विषमतेंताहि अधिक भर पडली आहे, आणि गिरणी कापड धंदा भरभराटला असूनाहि या लक्षावधी बेकारांना तो रोजगारी देऊं शकत नाहीं. त्यामुळें शेतीवरील भार वाढला असून खेडोपाडीं बेकारी निमबेकारी वाढत चालली आहे. ग्रामीण भागांतील परंपरागत धंदे ऱ्हास पावत चालले आहेत, आणि त्यांच्या अभावीं खेड्यांतील लोकांत आळस व सुस्तपणा माजला आहे.



योजना समितीनें आपल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेंत खादी व ग्रामोद्योग यांना महत्त्वाचें स्थान दिलें, त्याचें कारण हेंच होय. त्या कार्यक्रमांतील ह्या भागाची अंमलबजावणी करण्यासाठी अखिल भारत खादी व ग्रामोद्योग मंडळ निर्माण केलें आहे व पुरेसा निधि या मंडळाच्या सुपुर्द करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. खादी मंडळानें येत्या पांच वर्षांत खादीचें उत्पादन दसपट करण्याची योजना आंखली आहे, आणि ती पार पाडण्यास खादी मंडळ आपली पराकाष्ठा करणार आहे.

उत्पादन जसजसें वाढत जाईल तसतशी मागणीहि वाढणें आवश्यक आहे. या उत्पादनाचा कांहीं भाग खुद्द सरकारच खरेदी करील. पण उरलेल्या मोठ्या भागाचा खप व्हावा म्हणून मंडळाला सर्वसाधारण जनतेपासूनच अपेक्षा करणें भाग आहे. आजहि पूर्वीच्याच कार्यपूर्तीसाठी विनंती करणें आहे. खेड्यापाड्यांतील अर्धपोटी जनता रोजगारीची मागणी करते—बेकार भत्त्याची मागणी करीत नाहीं. त्यांच्या सेवेचेंच हें आवाहन आहे.

गांधीजींच्या परंपरेचे वारसदार असलेल्या राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद व पंतप्रधान पंडित नेहरू या दोघांनींहि समाजांतील सर्व घटकांना अशी कळकळीची विनंती केली आहे कीं त्यांनीं खादी खरेदी करावी आणि आर्थिक विषमता नष्ट करण्यास व लक्षावधी लोकांना किफायतशीर रोजगारी देण्यांत प्रवृत्त झालेल्या या चळवळीला सहाय्य करावें.

### भंडारदरा–रांधा योजना

भंडारदरा–रांधा धरणयोजनेचा समावेश दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करावा अशी शिफारस मुंबई सरकारनें केली आहे. ही योजना पूर्ण करण्यास ७ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. योजनेप्रमाणें वीज निर्माण होऊं लागल्यावर नाशिक, नगर आणि पूर्व व पश्चिम खानदेश जिल्ह्यांना स्वस्त दरानें वीज मिळूं शकेल.

### महात्माजींच्या चरित्रग्रंथांची भेट

चीनचे पंतप्रधान मि. चौ. एन्–लाय ह्यांना डॉ. तेंडुलकर ह्यांनीं लिहिलेल्या महात्माजींच्या चरित्रग्रंथांची भेट पेकिंगमधील भारतीय वकिलाच्या हस्तें देण्यांत आली. गेल्या गांधी–जयंतीनिमित्त पेकिंगमध्यें समारंभ साजरा करण्यांत आला त्यावेळीं ही भेट देण्यांत आली. चरित्रग्रंथाचे एकूण आठ खंड आहेत.

### नाटकावरील करमणूक कराची सूट

मुंबई मराठी साहित्य संघानें 'होनाजी बाळा' ह्या नाटकाच्या निर्मितीचे हक्क मिळविले आहेत. ह्या नाटकावरील करमणुकीच्या कराची सूट ३० सप्टेंबर, १९५५ पर्यंत मुंबईसरकारनें मंजूर केली आहे. मात्र संघानें नाटकाचे प्रयोग करण्याबद्दल भरमसाठ पैसे घेऊन दुसऱ्या कोणाला प्रयोगाची परवानगी देतां कामा नये अशी अट घालण्यांत आली आहे.

### हरिजनांच्या उद्धारासाठी स्पर्धा

हरिजनांना ज्या सामाजिक अडचणी सोसाव्या लागतात त्या दूर करण्याच्या कामीं उत्कृष्ट कार्य करणाऱ्या खेड्यांना बक्षिसें द्यावयाचें सौराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. प्रत्येकीं १,००० रुपयांचें एक, अशीं पांच बक्षिसें जाहीर करण्यांत आलीं आहेत. ज्या खेड्यांना बक्षिसें मिळतील, त्यांनीं सर्व रक्कम आपल्या खेड्यांतील लोकोपयोगी कामावर ती खर्च करावयाची आहे.

# रोटी व रोजगार

## कौटुंबिक संसाराची योजना राष्ट्रीय प्रगतीस उपकारक

( प्रा. द. गो. कर्वे )

मनुष्याची मुख्य गरज म्हणजे रोटी; व ती मिळविण्याचा व्यवसाय तो रोजगार. कसेंतरी पोट भरावें एवढ्यापुरती सुधारलेल्या समाजांतील माणसाची गरज मर्यादित नसते. अंगची शक्ति व युक्ति ह्यांचा पूर्ण उपयोग होईल असा रोजगार असावा, व त्यामुळें मिळणाऱ्या कमाईतून आपल्या गरजा योग्य रीतीनें भागवितां याव्या अशी विधायक व वाढती महत्त्वाकांक्षा सर्वत्र दिसून येते. व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक समता ह्यांचा आतां प्रसार होत असल्यानें रोजगार व कमाई ह्या दोन्हीं बाबतींत सर्वांस सारखा वाव असावा अशी सामान्य मागणी आहे.

हिंदुस्थानांत स्वायत्त लोकशाही स्थापन झाल्यापासून रोटी आणि रोजगार ह्यांबद्दलच्या सार्वत्रिक मागणीस विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. लढाईच्या काळांतील कामगारांस असलेली वाढती मागणी गेली, परंतु अन्नधान्याचा व इतर उपयुक्त जिनसांचा तुटवडा मात्र कमी झाला नाहीं, अशी परिस्थिति दीर्घकाळ टिकली. विशेषतः गेल्या दहा वर्षांत अवर्षण, अतिवर्षण, आणि अकालवर्षण ह्यांचा देशास उपद्रव होत राहिल्यानें दुष्काळी वातावरण अनेक वर्षे चालू राहिलें. गेले एक-दोन हंगाम एकंदरीनें चांगले होते, परंतु अजून अन्नधान्याची परिस्थिति सर्वस्वी निर्धास्त झाली असें म्हणतां येणार नाहीं. मात्र, ज्या मोठ्या प्रमाणांत पाणी व वीज पुरवठ्याच्या योजना, आणि शेतीस खतें व चांगलें बीं पुरविण्याचे कार्यक्रम, आतां चालू आहेत ते पाहिले म्हणजे सामान्यतः धान्य-दुष्काळ सर्व देशास पुन्हा बाधेल अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

परंतु धान्य असलें तरी तें विकत घेण्यास पैसा पाहिजे व तो मिळविण्यास रोजगार पाहिजे. राष्ट्राच्या पंचवार्षिक योजनांचा भर उत्पादन व व्यवसाय—रोटी व रोजगार—ह्या दोहोंवर सारख्या प्रमाणांत असला पाहिजे. नाहीं तर माल आहे पण गिऱ्हाईक नाहीं, म्हणून मंदी; अगर गिऱ्हाईक आहे पण माल नाहीं, म्हणून महागाई; असा थंडी-तापाचा विकार चालूं रहावयाचा. मोठमोठ्या वीज-धरणांच्या योजना, सामुदायिक विकास योजना, शेती सुधारणेचा संघटित कार्यक्रम, हरतऱ्हेच्या कारखान्यांस मदत आणि कांहीं विशेष महत्त्वाच्या-खतें, लोखंड, वहातुक, वगैरे-धंद्यांची प्रत्यक्ष सरकारकडून वाढ, ह्या अनेक दिशांनीं रोटीबरोबर रोजगारहि वाढत आहे. परंतु दोहोंचा समन्वय होण्याच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत. त्यांचें शक्य तितक्या लवकर निराकरण करण्याकडे पुढील आर्थिक व सामाजिक धोरण वळणें जरूर आहे.

रोजगार मिळण्यास ज्या गोष्टींची आवश्यकता आहे त्यांमध्यें जमीन, कच्चा माल व भांडवल ह्यांचा अंतर्भाव होतो. शेतीस योग्य व उपलब्ध असलेली सर्व जमीन लागवडीस मिळावी ह्याकरतां अनेक प्रयत्न चालू आहेत. वाळवंट वाढूं नये, जमीनीची धुपणी थांबावी, खार अगर दलदल नाहींशी व्हावी, जमीनीचा उंचसखलपणा सारखा करून ती नांगरटीस तयार करावी, निर्जल प्रदेशांत पाणी-पुरवठा करावा, इत्यादि सर्व मार्गांनीं सुधारणा करण्याच्या योजना अंमलांत आल्या आहेत. ह्या योजना जसजशा फलद्रूप होतील, तसतसा रोजगारास असलेला वाव वाढेल व मालाची निपजहि वाढेल. अशाच वाढत्या उत्पादनांतून शक्य तितका भाग बाजूला काढून त्यांतून कच्चा माल व भांडवल उभारलें पाहिजे. देशांतील एकंदर रोजगारांत वाढ व्हावयाची—मग तो रोजगार शेतकीचा असो कीं कारखानदारीचा असो—तर ती भांडवल उपलब्ध होण्यावरच अवलंबून आहे. नवीन जमीन लागवडीखालीं आणणें, नवा कारखाना उभारणें, आहे ती शेती अगर कारखाना अधिक जोमानें चालवणें, ह्या सर्वांस भांडवलाची जरूर आहे.

ज्या प्रमाणांत देश भांडवल उभारील त्याच प्रमाणांत त्यांतील रोजगाराची वाढ होईल. परराष्ट्रांकडून कर्ज अगर देणगी घेणें, किंवा जुन्या गंगाजळींतून उचल करणें, हें कांहीं थोड्या प्रमाणांतच शक्य असतें. एकंदर देशाच्या वाढत्या गरजा ध्यानांत घेतल्या तर असें स्पष्ट दिसेल, कीं देशाच्या चालूं उत्पन्नांतून जेवढ्या प्रमाणांत बचत होईल तेवढीच खरी प्रगति. मितव्यय, बचत व सरकारी अगर खाजगी धंद्यांत गुंतवणूक, हा क्रम जेवढ्या मोठ्या प्रमाणांत राष्ट्र अंगिकारूं शकेल, तेवढ्याच प्रमाणांत रोजगारांची वाढ होईल. कांहीं विशिष्ट क्षेत्रांत उत्पादनास उत्तेजन मिळण्याकरितां करावे लागणारे श्रम अगर वापरावे लागणारे जिन्नस लोकांकडून विनावेतन अगर सवलतीनें मिळाल्यास उपलब्ध भांडवलाचा अधिक फायदा होतो. परंतु हाहि एक बचतीचा आणि गुंतवणुकीचा मार्गच समजला पाहिजे.

एका बाजूनें बचतीच्या आणि सुधारलेल्या संघटनेच्या मार्गानें रोजगारांत वाढ होत असतां रोजगार मागणाऱ्या लोकांची संख्या जर मर्यादित न ठेवली, तर रोजगार वाढूनहि प्रत्येकास मिळणाऱ्या रोटींत म्हणण्यासारखी वाढ होणार नाहीं. विकास योजना आणि इतर संघटित सुधारणा ह्यांचा इष्ट परिणाम रोगनिवारणावर मोठ्या प्रमाणांत होत आहे. ह्याच वेळीं कुटुंब-नियोजनाकडेहि लोक अधिक विवेकी दृष्टीनें बघूं लागतील तर सर्वांस वाढता रोजगार मिळूं लागण्याचा दिवस अधिक जवळ येईल. चालूं उत्पन्नांतून शक्य तेवढी बचत करून ती कोणत्या तरी विकास योजनेंत गुंतविणें आणि आपल्यापुरती आपल्या संसाराची योजना आखणें ह्या दोन बाबतींत जनतेचें पाऊल जेवढें पुढें पडेल तेवढें राष्ट्रीय प्रगतीस उपकारक ठरेल.

सेवा, सुरक्षा आणि सौजन्याचें प्रतीक

स्थापना १९१८

सारस्वत

को-ऑपरेटिव्ह बँक

लिमिटेड.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

अधिकृत भांडवल रू. १०,००,०००

वसूल झालेलें भांडवल रू. ७,२७,३००

रिझर्व रू. ६,०६,०००

ठेवी रू. १,२२,००,०००

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

★ शाखा:- दादर, माहीम, बेळगांव, पुणें. ★

# लहान बँकांचें ग्रामीण भागांतील कार्यक्षेत्र

( जे. व्ही. जोशी, एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया )

आपल्या भारताची अर्थव्यवस्था मुख्यत्वेंकरून ग्रामीण स्वरूपाची आहे आणि त्यांत शेती व ग्रामोद्योग ह्यांस महत्त्वाचें स्थान आहे. सहाजिकच, कोणत्याहि राष्ट्रोद्धाराच्या योजनांत ग्रामीण भारताच्या आर्थिक उद्धारास अग्रस्थान दिलें जाणें योग्यच आहे. पंचवार्षिक योजनेनें आपल्या देशांतील शेतीच्या सुधारणेवर विशेष भर दिलेला आहे. ह्या उद्देश साध्य होण्यासाठीं आवश्यक असलेल्या बाबींत बँकिंग व पतव्यवस्था ह्यांच्या सोईचा प्रामुख्यानें समावेश होतो. अशा सोईच्या अभावीं, योजनेंतील शेतीविषयक उद्दिष्टें गांठणें अशक्यप्राय होईल, असें त्या योजनेनें नमूद केलेलें आहे. ग्रामीण विभागांतील आर्थिक प्रगतीचे कामीं पतसंस्था, विशेषतः बँका आणि सहकारी सोसायट्या, ह्यांना महत्त्वाची कामगिरी करावयाची आहे.

### ग्रामीण बचतीचा उत्पादक उपयोग

ग्रामीण विभागांत बँकांचें जाळें पसरविण्याच्या प्रश्नाबाबत विचारसरणींत सध्यां बराच बदल झालेला आहे. शेतकऱ्याच्या अल्प मुदतीच्या व दीर्घ मुदतीच्या गरजा भागविण्यासाठी त्याला आर्थिक मदत करण्याचा प्रश्न फार जुना आहे; युद्धकाळांत व युद्धोत्तर काळांत उत्पन्न मिळविणारांचा वर्ग बदलला आहे आणि बचतीचे बाबतींतहि शहरी विभागाचे मानानें ग्रामीण विभागाचें महत्त्व वाढूं लागलें आहे, अशी कल्पना आहे. ही बचत एकत्र करून तिचा आर्थिक उत्कर्षासाठीं उपयोग करण्याचें महत्त्व सहाजिकच प्रतिपादण्यांत येत आहे. शहरी वर्गाकडून होणाऱ्या बचतीचे झरे आटूं लागले आहेत आणि पंचवार्षिक योजनेचा पाया शक्य तेवढा व्यापक करण्याचा हेतु आहे, अशा समयीं ग्रामीण विभागाकडे अधिक लक्ष जाणें क्रमप्राप्तच आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, ग्रामीण विभागांस भांडवल पुरविण्याइतकाच ग्रामीण बँकिंगचा प्रश्न मर्यादित राहिलेला नाहीं; ग्रामीण बचतीस प्रोत्साहन देऊन व ती एकवटून तिला राष्ट्रीय प्रगतीच्या कामास लावण्याचाहि तो प्रश्न बनला आहे.

### आज उपलब्ध असलेल्या सोई

ह्या संबंधांत सध्यां उपलब्ध असलेल्या सोईचा उल्लेख करणें इष्ट होईल. आपल्या देशांत ९० शेड्यूल्ड बँका व ४०० वर बिगर शेड्यूल्ड बँका आहेत. त्यांपैकीं, शेड्यूल्ड बँकांच्या सुमारें २,७०० कचेऱ्या आहेत आणि बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या सुमारें १,३०० कचेऱ्या आहेत. ह्या आकड्यांवरून, बँकिंगच्या सोईचें दुर्भिक्ष्य किती आहे, ह्याची कल्पना येईल. आपल्या देशांत, ९०,००० लोकसंख्येस १ बँक कचेरी असें प्रमाण पडतें, तर ग्रेट ब्रिटनमध्यें तें ४,०००:१, युनायटेड स्टेट्समध्यें ७,६००:१ आणि जपानमध्यें १५,९००:१, असें पडतें. दुसऱ्या प्रकारानें हेंच सांगावयाचें म्हणजे, आपल्या देशांत प्रत्येक १२० चौरस मैलांस १ बँक कचेरी आहे; ग्रेट ब्रिटनमध्यें तें प्रमाण ८:१ आणि युनायटेड स्टेट्समध्यें १५२:१ असें आहे. आर्थिक विकासाच्या अभावाचें तें प्रतिबिंब आहे; देशांतल्या देशांतहि, कांहीं प्रदेश बँकिंगचे बाबतींत ज्यास्तच मागासलेले आहेत. पूर्वीच्या प्रांतांपेक्षा पूर्वीच्या संस्थानी मुलखांत बँकिंगचा प्रसार सामान्यतः कमी झालेला होता आणि आजहि बहुधा तशीच परिस्थिति आहे. प्रांतांमध्येंहि कांहीं प्रांतांतच, तुलनात्मक दृष्ट्या, बँकांच्या कचेऱ्यांची संख्या जरा अधिक आढळते. शेड्यूल्ड बँकांच्या बहुसंख्य (५५%) कचेऱ्या ५० हजार लोकवस्तीपेक्षा मोठ्या शहरांतून आहेत, तर फक्त ३०% कचेऱ्या २५ हजार वस्तीपेक्षा लहान गांवांतून आहेत. त्यापेक्षा ज्यास्त प्रमाणांत बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या लहान गांवांतून आहेत. परंतु एकूण बँकिंगच्या व्यवहारांतील त्यांचा हिस्सा लक्षांत घेतला, म्हणजे त्या वैशिष्ट्याचें महत्त्वहि फार वाटत नाहीं. १९५२ अखेर, शेड्यूल्ड बँकांच्या सुमारें ८९% ठेवी व त्यांचीं ९१% कर्जे ५० हजार वस्तीपेक्षा मोठ्या गांवांतून केंद्रित झालेलीं होतीं. हें स्वाभाविक असलें आणि मोठ्या शहरांच्या महत्त्वाचा तो परिणाम असला, तरी शहरें व ग्रामीण विभाग ह्यांची फारकत करणारी खिंड केवढी मोठी आहे, ह्याची त्यावरून कल्पना येईल. तालुक्याचीं ठिकाणें, गांवें व कांहीं व्यापारी केंद्रें ह्यांच्या पलीकडे आंत जाणें व्यापारी बँकांना, कांहीं अपवाद सोडले तर, शक्य झालेलें नाहीं, असें रूरल बँकिंग चौकशी कमिटीनें नुकतेंच नमूद केलेलें आहे.

### सोईच्या विस्ताराचे दोन मार्ग

बँकिंगच्या सोईचा मोठ्या क्षेत्रांत विस्तार-प्रसार व्हावयाचे दोन मार्ग आहेत: (१) मोठ्या शहरांत अगोदरच चांगल्या तऱ्हेनें स्थापन झालेल्या बँकेनें ग्रामीण शाखा उघडणें, किंवा (२) स्थानिक लहान बँकेनें विविध प्रकारचीं कामें हातीं घेऊन बँकिंग उपलब्ध करून देणें. भारतांत, ह्या दोन्ही प्रकारांनीं बँकिंगचा प्रसार झालेला आहे व ते प्रकार एकमेकांचे स्पर्धक न मानतां एकमेकांस पोषकच मानले पाहिजेत. इंपीरिअल बँकेनें व इतर व्यापारी बँकांनीं तालुक्याच्या ठिकाणीं व इतर निम-शहरी केंद्रांचे ठिकाणीं आपल्या शाखा उघडाव्यात आणि मोठ्या गांवांतून अथवा मध्यवर्ती खेडेगांवांतून मध्यवर्ती सहकारी बँका, त्यांच्या शाखा व प्राथमिक सहकारी सोसायट्या ह्यांचा विस्तार व्हावा, अशा प्रकारची बँकिंगची रचना रूरल बँकिंग चौकशी कमिटीनें सुचविलेली आहे.

### व्यापारी आणि सहकारी बँका ह्यांचे परस्पर-संबंध

व्यापारी बँकिंगपद्धति आणि सहकारी बँकिंगपद्धति ह्यांचें परस्पर नातें कोणत्या स्वरूपाचें असावें, हा प्रश्न त्यांतून उद्भवतो. त्या दोघांमध्यें स्पर्धा होण्याचा संभव असतो, अशी विचारसरणी कधीं कधीं ऐकूं येते. वास्तविक हें इष्ट नाहीं; कारण त्या दोघांचेमध्यें एकसूत्रता आणल्यास बँकिंगचा देशांत आंतवर प्रसार करण्यास त्यांचा फार मोठा हातभार लागण्याजोगा आहे. स्पर्धा असलीच तर ती मर्यादित, ठेवी आकर्षण्यापुरतीच, रहाणार. त्या दोघांनीं समजूतदारपणें धोरण आंखलें तर अशा स्पर्धेचे दुष्परिणाम टाळतां येतील. उलट, त्यांचीं कार्यक्षेत्रें स्वतंत्र असल्याकारणानें त्यांचें अस्तित्व एकमेकांस पोषकच व्हावयास पाहिजे. शेतीला भांडवल पुरवठा करण्याचे कामीं सहकारी बँकांचा त्यांचा अनुभव आणि तपशीलवार माहिती ह्यामुळें, विशेष उपयोग; तर लहान व्यापारी आणि ग्रामोद्योग ह्यांस भांडवल पुरविणें लहान व्यापारी बँकांच्या

कार्यक्षेत्रांत अधिक चांगलें बसण्याचा संभव. पिकांची विक्री घडवून आणणाऱ्या व्यापाऱ्यांशींच मुख्यतः व्यापारी बँकांचा आज संबंध आहे. नियंत्रित बाजारपेठा, प्रतवारी, शेतमालाच्या दर्जांत एकवाक्यता, वेअरहाउसेसची समाधानकारक व्यवस्था, इत्यादींची प्रगति झाली म्हणजे व्यापारी बँकांचें कार्यक्षेत्र वाढेल. ग्रामोद्योगांची वाढ होण्यावर भर दिला जात आहे. तेव्हां त्यांच्यासाठीं भांडवल पुरविण्याचें व्यापारी बँकांचें कार्यक्षेत्रहि विस्तार पावणार आहे. सहकारी बँका शेतकऱ्यांच्या व्यवसायास भांडवल पुरविण्याकडेच प्राधान्येंकरून लक्ष देतील. तेव्हां ग्रामीण भागांतील व्यापारी बँकांची प्रगति सहकारी बँकांना बाधक होण्याची भीति नाहीं.

### लहान बँकांना अनुकूल बाबी

बँकिंगच्या सोईची ग्रामीण भागांत वाढ करण्यास लहान बँकांचा कितपत उपयोग होईल, ह्याचा विचार करतांना, मोठ्या बँकांपेक्षा लहान बँकांना अनुकूल असलेल्या कांहीं बाबींचा उल्लेख करणें इष्ट होईल. पैशाचें मोठें पाठबळ आणि व्यापक क्षेत्रांतील अधिक अनुभव ह्या गोष्टी मोठ्या बँकांना साहाय्यक होतात, हें खरें आहे. पण, लहान बँकांच्या मानानें मोठ्या बँकांचा व्यवहारखर्च व पगारखर्च भारी असतो आणि तो आणखी नव्या शाखा उघडण्यास प्रोत्साहनकारक नाहीं. तालुक्यांचीं ठिकाणें, व्यापारी गांवें आणि आर्थिक महत्त्वाचीं इतर केंद्रें ह्यांचे पलीकडे जाण्यास मोठ्या बँका उत्सुक असणार नाहींत; लहान व्यापारी बँका आणि सहकारी बँका ह्याच ग्रामीण भागांत, आंतवर, जरा कमी त्रासानें प्रवेश करूं शकतील. त्यांचा पगारखर्च व व्यवहार खर्च कमी असल्यानें, त्या बँका लहान गांवांतच केवळ नव्हे, तर शेजारच्या ग्रामीण भागांतहि बँकिंगच्या सोई उपलब्ध करून देऊं शकतील. आपल्या कार्यक्षेत्रांची संभाव्यता, गिऱ्हाइकांबद्दल सूक्ष्म ज्ञान आणि त्यांच्या गरजाप्रमाणें पद्धति बदलण्याची तत्परता त्याचप्रमाणें चालकांचे निकटचे व्यक्तिगत स्थानिक संबंध, ह्या सर्व गोष्टी लहान बँकांना विशेषेंकरून अनुकूल आहेत. ग्रामीण उद्योगधंद्यांना भांडवल पुरविणें त्याच बँकांना सोईचें आहे व लहान उद्योगधंद्यांची गरज त्या चांगल्या तऱ्हेनें भागवूं शकतील; मोठ्या व्यापारी बँका लहान आकाराच्या उद्योगधंद्यांना भांडवल पुरविण्यास सहसा तयार नसतात. पण लहान बँकांजवळ पुरेसा पैसा असत नाहीं, ही मोठी अडचण आहे. अधिकाधिक बिगर-शेड्यूल्ड बँका शेड्यूल्ड होऊं लागल्या. म्हणजे ह्याबाबतची अडचण थोडी–फार दूर होऊं शकेल; कारण, शेड्यूल्ड बँका मध्यवर्ती रिझर्व्ह बँकेची आतां वरचेवर मदत घेऊं लागल्या आहेत; हिंदी बँकिंगमधील ती एक स्वागतार्ह घटना आहे. रिझर्व्ह बँकेकडून पैशाचा पुरवठा होण्याची शक्यता आहे, त्याबरोबरच मोठ्या बँकांकडून पैसा मिळविण्याचे मार्गहि त्यांना शोधून काढतां येतील. युनायटेड स्टेट्समधील बँकांमधील अशा सहकार्याचें नातें–'कॉरस्पॉंडंट' नातें– ह्या बाबतींत आपणांस मार्गदर्शक होण्याजोगें आहे; त्याचा अभ्यास करून, येथील परिस्थितीस अनुसरून त्यांत कोणते बदल करणें जरूरीचें होईल व त्यास येथें कितपत यश मिळेल, ह्याचा विचार केला तर तो, मला वाटतें, फायदेशीर ठरेल.

मध्यवर्ती नाणेबाजारांत लहान बँकांना अशा रीतीनें वाव मिळणें, हा त्यांची कर्ज देण्याची ताकद वाढविण्याचा एक मार्ग झाला. त्यांचेजवळील मर्यादित पैशाचा अधिक तोलून मापून उपयोग केल्यानेंहि, परिस्थितींत सुधारणा होण्याजोगी आहे. योग्य प्रकारच्या आर्थिक उपक्रमास पैशाची मदत केली म्हणजे उत्पन्नांत व रोजगारांत भर पडेल आणि बँकांजवळील


# दि बँक ऑफ कराड लि., कराड.

स्थापना–१२–३–१९४६

हेड ऑफिस, कराड. शाखा–भवानी पेठ, सातारा.

| | |
|---|---|
| शेअर वसूल भांडवल | रु. २,१८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ५३,००० |
| खेळतें भांडवल | रु. २२,००,००० |

— बोर्ड ऑफ डायरेक्टर्स —

श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे, चेअरमन.

श्री. ना. बा. बुधकर, व्हाइस–चेअरमन.

श्री. वि. रा. वेलणकर, श्री. शं. प्र. ओगले, मेजर सरदार बी. एन्. पाटणकर, श्री. वि. द. शिराळकर, डॉ. व्ही. जी. देशपांडे, श्री. रा. अ. अराणके, श्री. म. रा. देशपांडे.

**मुदत–ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातात.**

| | | |
|---|---|---|
| मुदत वर्ष एक | ... | ३¼% |
| मुदत वर्षे दोन | ... | ३½% |
| मुदत वर्षे तीन | ... | ३¾% |
| मुदत वर्षे चार | ... | ४% |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

कराड, ता. १८–१०–५४ — म. वि. खंडकर, मॅनेजर.



# श्रीलक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

## फलटण (जि. उत्तर सातारा)

( स्थापना १–२–१९२६ )

| | | |
|---|---|---|
| भांडवल : | भागांचें अधिकृत ... | रु. २,००,००० |
| | „ खपलेलें ... | रु. १,२४,६५० |
| | „ वसूल ... | रु. १,१८,२०० |
| फंड : | रिझर्व्ह फंड ... | रु. १,०२,५३५ |
| | इमारत फंड ... | रु. ५३,००० |
| | इतर फंड ... | रु. १,१३,०७५ |
| ठेवी : | ... ... ... ... | रु. ११,७२,०४६ |

चालू, सेव्हिंग्ज व मुदतींच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सध्यांचे ठेवींचे दर खालीलप्रमाणें:—

( १ ) चालू ठेवींवर ½% ( २ ) सेव्हिंग्ज ठेवींवर १½%

( ३ ) मुदत ठेवींवर १ ते ५ वर्षांस २½ ते ४%

**व्यवहार :** मुख्यतः सहकारी पेढ्यांना कर्जाऊ रकमा पुरविल्या जातात. बँकांचे इतर सर्व प्रकारचे व्यवहार होतात.

चौकशी समक्ष अगर पत्रद्वारें.

**ही दीपावली सर्वांना उत्कर्षदायी होवो.**

श्री. ह. तळवलकर, A.C.R.A., मॅनेजर. — वि. शं. झिरपे, B.A., LL.B., चेअरमन.

उपलब्ध पैशांत वाढ होईल. स्थानिक पैसा मोठ्या व्यापारी केंद्रांकडे खेचला जातो, ह्या भीतीस लहान बँका हेंच परिणामकारक उत्तर आहे; लहान बँकांना ह्या अनुकूलतेचा फायदा करून घेतां येण्यासारखा आहे.

**बँकेचा आकार, ही मूलग्राही महत्त्वाची बाब नाहीं**

बँकिंगच्या सोईच्या फैलावाचा विचार करतांना, संस्थेचा आकार, ही प्राथमिक महत्त्वाची बाब नाहीं, असें ह्यावरून दिसून येईल. बँकिंगची वाढ व्हावयाची तर बँकिंगची संवय वाढली पाहिजे आणि ती गोष्ट बँकांच्या स्थैर्यावर ठेवीदारांचा किती विश्वास आहे, ह्यावर अवलंबून आहे ती बँक मग लहान असो, वा मोठी असो ठेवीदारांचा विश्वास निर्माण करण्यास थोडा वेळ लागतो आणि चांगल्या व्यवस्थेमुळें तो निर्माण होण्यास मदत होते. युद्धकाळांत बँकांच्या कचेऱ्यांत, संख्येच्या दृष्टीनें खूपच वाढ झाली पण ती सर्व निरोगी नव्हती. रूरल बँकिंग चौकशी कमिटीनें म्हटल्याप्रमाणें "तुटपुंज्या आर्थिक सामर्थ्याच्या आणि अनिष्ट प्रकारच्या व्यवस्थेखालील कित्येक बँकांनीं बेपर्वाईनें आणि बेदरकारपणें शाखा वाढ केली." स्थानिक गरजांची नीट चौकशी केली नाहीं आणि अपेक्षित उत्पन्न-खर्चाची काळजीपूर्वक छाननीहि करण्यांत आली नाहीं. ह्याचा परिणाम असा झाला, कीं युद्धोत्तर काळांत त्यांपैकीं कांहीं संस्था बंद पडल्या, तर बँकिंग कंपन्यांच्या कायद्यामुळें कांहींना बँकिंगचा धंदा बंद करावा लागला. ह्या बँका बंद पडल्या, ह्याचा अर्थ बँकिंगच्या इमारतीचें बांधकाम सर्वसाधारणपणें कच्चें आहे, असा मात्र नव्हे पण, ठेवीदारांवरील त्याच्या परिणामाकडे मात्र दुर्लक्ष करून कसें चालेल? कायद्यांत सुधारणा, रिझर्व्ह बँकेचे देखरेखीचे अधिकार, इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स आणि बँकर्स ट्रेनिंग कॉलेज अशा संस्थांकरवीं बँकिंगच्या शिक्षणाची सोय, इत्यादि मार्गांनीं बँकिंगची विश्वासार्हता वाढविण्याचा कसून प्रयत्न करण्यांत येत आहे. पण अखेर, बँक चालविणाऱ्यावरच तिची प्रगति अवलंबून रहाणार, हें उघड आहे. दैनंदिन कारभार हाकणाऱ्या अधिकाऱ्यांप्रमाणेंच, किंवा त्यांच्यापेक्षाहि अधिक, बँकांच्या धोरणास जबाबदार असणाऱ्या संचालकांस हें लागू आहे. रिझर्व्ह बँकेनें बँकिंग कंपन्यांच्या केलेल्या तपासणींत असें आढळून आलें आहे, कीं कधींकधीं संचालक बँकांच्या कारभारांत लक्ष घालीत नाहींत आणि त्यामुळें संचालक मंडळाचें बँकेच्या अधिकाऱ्यांवर असावें तेवढें नियंत्रण रहात नाहीं. संचालक, त्यांचे स्नेही, त्यांचे नातेवाईक किंवा त्यांचे हितसंबंध असलेल्या फर्म्स ह्यांना अप्रस्तुत कर्जें दिलीं गेल्याचीं उदाहरणें उजेडांत आलीं आहेत. झालेल्या ह्या चुका संबंधित बँकांच्या संचालकांच्या नजरेस ताबडतोब आणून दिल्या जातात; पण बँकिंगच्या वाढीस अशा अनिष्ट प्रकारांमुळें व्यत्यय येतो, हें जोरानें व नेटानें सांगणें जरूरीचें आहे. जबाबदारीच्या जाणिवेचे संचालक व त्यांचें बँकेच्या कारभारावर परिणामकारक नियंत्रण, ह्यामुळें बँकेवरील जनतेचा विश्वास वाढण्यास पुष्कळच मदत होईल. अर्ध-नागरी व ग्रामीण विभागांत हें अधिकच खरें आहे.

**मजबुती आणि कार्यक्षमता सर्वच बँकांना हवी**

मोठ्या बँकांच्या बाबतींत मजबुती आणि कार्यक्षमता ह्यासंबंधांत उच्च पातळीबद्दल कटाक्ष धरला जातो; लहान बँकांचे बाबतींत त्यांना उत्तेजन देण्यासाठीं, जरा त्यांत सैलपणा राखण्यांत यावा, असें मत बऱ्याच वेळीं व्यक्त केलें गेलें आहे. लहान बँकांना आर्थिक व इतर दृष्टींनीं शक्य तें सर्व साहाय्य अवश्य दिलें पाहिजे. ह्यांत संशय नाहीं; परंतु कोणत्याहि विशिष्ट वर्गाच्या बँकांच्या कारभाराची पातळी उतरविणें इष्ट दिसत नाहीं. विशिष्ट प्रसंगीं, जरूर वाटली तेथें, बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या कांहीं तरतुदींपासून माफी देण्यांत आलेली आहे. तथापि, सर्वसाधारण पातळींत उतार झाला तर ज्या अडचणी आपण सोडवूं पहातों, त्यांत भरच पडेल अशी भीति वाटते. बँकिंगच्या दृष्टीनें मागासलेल्या विभागांतून निर्दोष बँकिंगच्या प्रथा निर्माण करण्याचा प्रयत्न चालू असतांना, हा धोका अधिकच जाणवतो.

**लहान बँकांचें बँकिंग क्षेत्रांतील उचित स्थान**

ज्या लहान बँका स्वतःच्या पायावर उभ्या राहूं शकतील व ज्या सुव्यवस्थित आहेत अशांना हिंदी बँकिंग क्षेत्रांत निश्चित स्थान आहे. मुंबई आणि कलकत्ता ह्यासारख्या शहरांतून मोठ्या बँकांच्या शेजारीच लहान बँकाहि चालू आहेत, हें त्या अद्याप करीत असलेल्या महत्त्वाच्या कामगिरीचें निदर्शक आहे. लहान गिऱ्हाईकांची सोय मोठ्या बँकेपेक्षा लहान बँकेंत अधिक चांगली लागणें स्वाभाविक आहे आणि आपल्या देशांतील बहुसंख्य गिऱ्हाइकें लहान आसामीच आहेत. डिसेंबर १९५२ अखेरचे, बँकांचीं कर्जें व ठेवी ह्या पहाणीसाठी जमवलेले आंकडे पाहिले, तर सरासरी ठेव २,२५५ रु. ची व सरासरी कर्ज ३,६४४ रु. असें प्रमाण दिसतें. सर्व शेड्यूल्ड बँकांचे आंकडे पाहिले, तर तींच प्रमाणें अनुक्रमें २,४३० रु. व ८,३७० रु. अशीं आढळतात. सध्यांच्या मोठ्या बँका व्यापार व उद्योग ह्यांची गरज शक्य तेवढी भागवीत आहेत. पण पंचवार्षिक योजनेमुळें आर्थिक चालना मिळाल्यावर निर्माण होणाऱ्या वाढत्या गरजा योग्य प्रमाणांत भागविणें सध्याच्या बँकिंग पद्धतीला कितपत शक्य होईल, असा प्रश्न उद्‌भवतो. शेती आणि लहान उद्योगधंदे हा आर्थिक घडामोडींचा भाग मोठा आहे व त्याच्या गरजांचे बाबतींत हा प्रश्न अधिकच तीव्रतेनें जाणवण्याचा संभव आहे. ठरवून घेतलेल्या मर्यादित क्षेत्रांत कामें करणाऱ्या बँकांनीं बँकिंगच्या सोई वाढविल्या आणि ठेवीसाठी खार्चिक व अनिष्ट स्पर्धा त्यांनीं टाळली, त्याचप्रमाणें सेवेचीं नवीं दालनें उघडलीं, तर त्या बँकांनीं उपयुक्त कामगिरी बजाविली असें होईल. आर्थिक संसाराच्या वाढत्या गरजा भागविणें लहान बँकांना त्यामुळें अधिकाधिक शक्य होईल आणि त्यांत त्यांचा स्वतःचा, ज्या विभागांत त्या कार्य करतात त्या विभागांचा आणि सबंध व्यापक समाजाचाहि फायदा आहे.

(मिरज स्टेट बँकेच्या रौप्यमहोत्सवप्रसंगीं प्रदर्शित केलेले विचार)

५० वर्षांपेक्षां जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

**सरदारगृह**

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# शेतीला सहकारी संघटनेमार्फत भांडवलाचा पुरवठा

( आर. जी. सरैया, चेअरमन, मुंबई राज्य सहकारी बँक लि., मुंबई )

मुंबई राज्यांतील पतवान शेतकऱ्यांना सहकारी संघटनेमार्फत कर्ज पुरवण्याची जबाबदारी मुंबई राज्याच्या केंद्रीय व जिल्हा सहकारी बँकांनीं घेतली, त्याबाबतची प्रगति व सद्यःस्थिति ह्यांचा आढावा येथें घेण्याचें योजिलें आहे.

### सहकारी उपक्रमांचें मूल्यमापन

शेतीचें उत्पादन वाढविण्याच्या आवश्यकतेवर पंचवार्षिक योजनेनें भर दिला आहे आणि उत्पादन, भांडवलपुरवठा व शेतमालाच्या विक्रीची व्यवस्था ह्यासंबंधांत सहकारी संस्थांवर मोठी जबाबदारी टाकली आहे. ह्या बाबतींतील लक्ष्यें गाठण्यासाठी सरकार व प्लॅनिंग कमिशन ह्यांनीं कम्युनिटी प्रॉजेक्ट प्रोग्रॅम्स व नॅशनल एक्सटेन्शन सर्व्हिस ब्लॉक्स ह्यांची योजना केली आहे व त्यांच्या यशस्वितेसाठी सहकारी संस्थांच्या उभारणीवर भर घालण्यांत आला आहे. खेड्यांतील सर्व कुटुंबें सहकारी संघटनेच्या सेवेचे क्षेत्रांत थोड्याच काळांत यावींत, असा कार्यक्रम आंखण्यास प्रॉजेक्ट अधिकाऱ्यांना आग्रहानें सांगण्यांत आलेलें होतें. कम्युनिटी प्रॉजेक्टसवरील पहिल्या वर्षाच्या अहवालांत प्रोग्रॅम इव्हॅल्युएशन ऑर्गनायझेशनचे डायरेक्टर, ह्यांनीं स्पष्टपणें म्हटलें आहे :—

"सहकारी चळवळ प्रत्येक कुटुंबापर्यंत पोंचली पाहिजे, हें उद्दिष्ट असलें, तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिति अशी आहे कीं, सहकारी दृष्ट्या जरा पुढारलेल्या राज्यांतूनहि सहकारी चळवळीशीं संबंध आलेलीं कुटुंबें, शेतकऱ्यांचीं कुटुंबेंहि, उद्दिष्टाचे मानानें फारच कमी आहेत. शेतकऱ्यांचे मध्यें बिगर-पतवान शेतकऱ्यांचा फार मोठा भरणा आहे, हीं उद्दिष्टें पोंचण्याच्या मार्गांतील एक अडचण असल्याचें सांगण्यांत येतें. योजनाबद्ध व सुसंघटित राष्ट्रीय पत-पद्धतींत अंतर्भूत असलेल्या गोष्टींचें अपुरें आकलन, हें ह्या विचारसरणीच्या बुडाशीं कारण आहे. जेव्हां प्रत्यक्ष देऊं केलेल्या स्थावर तारणावरूनच माणसाची पत ठरविण्यांत येत होती, त्यावेळीं फक्त सुस्थितींतील जमीनमालकांस पतवान समजलें जाणें स्वाभाविक होतें. ह्या पद्धतींत, सहकारी पतसंस्थांना ठेवीदार व इतर बँका ह्यांचेकडून भांडवलपुरवठा होत असे; बँका पतपेढ्यांची पत स्थावर तारणावरूनच ठरवीत असत. लहान जमीनमालक, खंडकरी व स्वतःची जमीन नसणारे मजूर ह्यांना पतवान समजलें जात नसे.

"आतां राष्ट्रीय संघटनेमार्फत, मान्यता दिलेल्या कामासाठी पुरेसें भांडवल पुरविण्याच्या योजनेंत तारणाच्या दृष्टीनें कर्ज देण्यास लायकीचा विचार करावयाचा नसून, कर्जाचा विनियोग कसा केला जाणार आहे ह्यावर पत मोजली जावयाची आहे. ज्यासाठी कर्ज द्यावयाचे ती बाब उत्पादक स्वरूपाची असली आणि म्हणूनच त्या उत्पादनांतूनच कर्ज भागविणारी असली, म्हणजे योग्य ती दक्षता घेऊन दिलेलें कर्ज असुरक्षित मानण्याचें कारण नाहीं, असें नवें धोरण आहे. कर्जपुरवठ्याप्रमाणें इतरहि कित्येक उपकारक गोष्टी सहकारी संस्थांना करतां येण्याजोग्या आहेत. योजनाबद्ध विकासाच्या राष्ट्रीय कार्यक्रमांतील सामाजिक दृष्टिकोन लक्षांत घेऊन सहकारी चळवळीकडे नव्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. ह्यासंबंधांत खाजगी प्रयत्नांशीं सहकारी संस्थांची तुलना न करतां, ती सरकारी खात्यांशीं केली पाहिजे. सरकारी निवेदनांतून विकासयोजनांमध्यें सहकारास दिलेलें मूळग्राही महत्त्व लक्षांत घेतां आणि त्याचबरोबर त्यामानानें प्रत्यक्ष साधलेली अल्प कामगिरी विचारांत घेतां, ह्या सबंध विषयाचाच नव्यानें व सर्वांगीण विचार करण्याची पाळी आली आहे."

### सरकारच्या मदतीची आवश्यकता

अशा परिस्थितींत, लोकांच्या ठेवींवर अवलंबून असणाऱ्या सहकारी बँकांना पंचवार्षिक योजनेंतील उद्दिष्टें ठराविक काळांत गांठतां येणें व पतवान सर्व उद्योगांना भांडवल पुरवतां येणें अशक्य आहे. राज्य सरकार आणि रिझर्व्ह बँक यांनीं भांडवल-पुरवठ्याचा अधिकाधिक भाग पुरविला व त्या व्यवहारांतील धोक्यांबद्दल कांहीं हमी घेतली, तरच अधिक वेगानें प्रगति होण्याचा संभव आहे. भारतांतील लागवडीचें वैयक्तिक क्षेत्र फार लहान असून, आतां कित्येक सुधारणा झाल्या असल्या तरी अद्याप शेती ही पावसावरील सट्टाच ठरते, हें खरें आहे. एक-दोन वर्षांचा पूर किंवा दुष्काळ ह्यामुळें आजच्या पतवान कर्जदाराचें उद्यां कर्ज फेडूं न शकणारामध्यें रूपांतर होतें; वास्तविक त्यांत त्याचा कांहींच दोष नसतो. अशा शेतकऱ्याला कर्जाच्या फेडीची मुदत वाढवून द्यावी लागते, इतकेंच नव्हे तर पुढच्या पिकासाठी नवें कर्जहि द्यावें लागतें. असें केलें नाहीं, तर कर्ज देणारी संस्था व शेतीचें उत्पादन ह्या दोघांवरहि प्रतिकूल परिणाम होणार, हें उघड आहे. घालून दिलेल्या लक्षांचे समीप जाण्यासाठी सहकारी बँकांनीं आपल्या कामाचा व्याप भरपूर वाढविला, तरी सहकारी संस्थांना अशा कर्जतहकुब्या देणें स्वतःच्या ठेवींच्या भांडवलांतून आणि सध्यांच्या नियमाप्रमाणें रिझर्व्ह बँकेनें मदत देऊनहि शक्य होणार नाहीं. म्हणून, राज्य सरकार किंवा सरकारचा पाठिंबा असलेली कोणती तरी संघटना, ह्यांनीं ही तूट भरून काढण्यासाठी पुढें आलें पाहिजे व सहकारी बँकांना पैसा-पुरवठ्याचें व त्यांनीं पत्करलेल्या जोखमींपैकीं कांहीं धोके पत्करण्याचें आश्वासन दिलें पाहिजे. भारतांत पूर आणि दुष्काळ ह्यांची आपत्ति वरचेवर येते आणि त्यामुळें सामान्य उत्पादकाची उत्पादनशक्ति खर्ची होऊन त्याला दिलेल्या कर्जाची भरपाई उत्पन्नांतून आपोआप होऊं शकत नाहीं; त्यानें उत्पादक व मूळ उद्देशास धरून अशा उपयोगाकडे कर्जाचा विनियोग केला तरी, ती होत नाहीं. अशा परिस्थितींत, ज्या संस्थांनीं विशेषतः सहकारी बँकांनीं ज्या पद्धतीनें कर्जपुरवठा करावा अशी अपेक्षा आहे, अशांनीं पुरविलेला पैसा अपेक्षित लक्षांपर्यंत नियोजित मर्यादित काळांत पोंचणें कठीण आहे. सरकारनें त्या पुरवठ्यास मोठा हातभार लावला, कर्जाच्या दुरुपयोगावर नियंत्रणें राखलीं व दुष्काळ आणि पूर अशा नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण दिलें, तरच कांहींतरी शक्यता आहे.

पूर किंवा दुष्काळ अथवा किंमतींत भरमसाठ उतार, अशा आपत्तींच्या प्रसंगीं आणि आर्थिक दृष्ट्या अविकसित किंवा अपुऱ्या विकास पावलेल्या प्रदेशांत मदतीच्या स्वरूपाच्या भांडवलाची व्यवस्था करण्याची जबाबदारी सरकारवर आहे, असें गाडगीळ कमिटीनें व ॲग्रिकल्चरल क्रेडिट ऑर्गनायझेशन कमिटीनें स्पष्टपणें नमूद केलेलें आहे. पुनर्वस्तीसाठी लागणारा पैशाचा

ह्या पुरवठा मुख्यतः लोकांच्या ठेवींवर किंवा रिझर्व्ह बँकेच्या अल्प मुदतीच्या कर्जावर अवलंबून असलेल्या सहकारी संस्था करूं शकणार नाहींत. सरकारचीच ही जबाबदारी आहे; ह्या बाबतींत सरकारचे प्रतिनिधी म्हणूनच सहकारी बँका कार्य करूं शकतील. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतकऱ्याला परवडेल अशा व्याजानें शेतीसाठी कर्ज-पुरवठा करण्यासाठी पुरेशा ठेवी मिळविणें सहकारी बँकांना फारसें शक्य होणार नाहीं. त्यांच्या ह्या-संबंधांतील पात्रतेला निश्चित मर्यादा आहेच. अखेरच्या कर्जदाराला व्याजाचा काय दर पडतो ह्याची सहकारी बँकांना ठेवींवर द्याव्या लागणाऱ्या व्याजाच्या दराशीं तुलना करतांना देखरेखीचा व शेतीस कर्जपुरवठ्याच्या कारभाराचा खर्च ह्यांकडे दुर्लक्ष होतें. शेताच्या बऱ्याच तुकड्यांवर शेती पसरलेली असते आणि शेतकी पतपेढीचा व्याप लहान असतो, त्यामुळें खर्च भागविण्यासाठी तिला द्यावयाच्या व घ्यावयाच्या व्याजाच्या दरांत पुरेशी मोठी कूस राखावी लागते. ह्या संस्थांचा खर्च विचारांत घेतला, म्हणजे अंतिम कर्जदाराला पडणारा व्याजाचा दर जरा भारी वाटेल. ह्यासंबंधांत श्री. चेस्टर सी. डेव्हिस ह्यांचे "रूरल क्रेडिट इन् इंडिया" मधील विचार उद्धृत करणें श्रेयस्कर होईल:—

### कर्जावरील व्याजाचा दर किती असावा ?

"शेतकऱ्याला कमींत कमी व्याजानें कर्जे मिळावीं, ह्या गोष्टींवर भलताच भर दिला गेल्या कारणानें, सहकारी संस्थांची भांडवलाची वाढ खुंटली आहे आणि कर्जदाराला मदत करण्याच्या व कर्जाऊ रकमेचा विनियोग प्राप्ति वाढवून आर्थिक परिस्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें करावयास लावण्याच्या त्यांच्या शक्तीवर बंधनें आलीं आहेत. बचत अत्यंत अवघड आहे हें खरें असलें, तरी प्राथमिक पातळीचे ठिकाणीं भांडवलाचा संचय करण्याच्या आवश्यकतेस पुरेसें महत्त्व दिलें गेलेलें नाहीं. ह्या दोन गोष्टीच सोसायट्यांची मजबुती वाढविण्याच्या व त्यांची वाढ करण्याच्या मार्गांतील अडचणींत भर टाकीत आहेत. व्याज थोडें जास्त आकारून सहकारी सोसायट्या त्यांच्या गंगाजळींत पुरेशी भर सत्वर व पद्धतशीर घालूं शकतील व त्यांचें स्वतःच्या मालकीचें भांडवल त्यामुळें वाढेल. पण अगदीं कमींत कमी दरानें शेतकऱ्यांस कर्ज मिळालें पाहिजे, जरूर तर कांहीं अंशीं सरकारी मदत घ्यावी लागली तरी हरकत नाहीं, ह्या दुराग्रहामुळें भारतांत ही गोष्ट अवघड होऊन बसली आहे. सहकारी कर्जपुरवठ्याचे बाबतींत अंतिम कर्जदाराला कमींत कमी व्याजाचा दर पडण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे निदान दोन मुद्दे आहेत. पहिला मुद्दा, सहकारी पतपेढीला पुरेसें मार्जिन देणें. म्हणजे तिला स्वतःचें भांडवल वाढवितां येईल. त्यांत कर्जदार सभासदाचा वाटा राहीलच. दुसरा मुद्दा असा, कीं कर्जदार सभासदाच्या मदतीला जातां यावें ह्यासाठी सोसायटीला साधन उपलब्ध करून दिलें पाहिजे. त्यामुळें सभासदाला जरूरीचे वेळीं ती कर्ज देऊं शकेल व त्याचा उत्पादक रीतीनें उपयोग करण्यास मदत करूं शकेल."

### "रूरल क्रेडिट सर्व्हे" पासून अपेक्षा

शेतीचें उत्पादन व त्याची विक्री ह्यासाठी सर्व शेतकरी-वर्गाला लागणाऱ्या भांडवलाची गरज इतकी मोठी आहे, कीं ठेवींचे आधारावर कर्ज देणारी राज्य सहकारी बँक व इतर बँका ह्यांना ती भागवितां येणें अशक्य आहे. रिझर्व्ह बँकेनें त्यांना भांडवलाची मदत केली, तरी ती अशक्यता नाहींशी होणार नाहीं; कारण बँकांनीं ठेवींच्या रूपानें उभारलेल्या भांडवलाच्या लहान अंशाइतकीच ती मदत रहाणार. रिझर्व्ह बँकेमार्फत 'रूरल क्रेडिट सर्व्हे' चालू आहे, त्याच्या अहवालाकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत. हा अहवाल प्रस्तुत महत्त्वाचा प्रश्न सोडविण्याचें काम करील, शेतकरी वर्गाला बँकांकडून किती कर्जाची आवश्यकता आहे ह्याचा हिशेब करून सांगेल, ह्या कर्जाची सोय कोणत्या मार्गानें करावयाची त्याचा मार्ग दाखवील,


## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

फोन नं. ३० पोष्ट बॉक्स नं. १३ (स्थापना १९२७) तारेचा पत्ता—रयतबँक

अधिकृत भांडवल रु. १०,००,००० गंगाजळी आणि इतर फंडस् रु. १,७५,५००

भरलेलें भांडवल रु. ३,११,३५५ एकूण खेळतें भांडवल रु. २४,९५,६००

हेड ऑफिसः—हायस्कूल रोड, सांगली. शाखा : १ जत, २ मिरज, ३ तासगांव

१ या बँकेंत चालू, सेव्हिंग्ज व कायम मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
२ शेतकी सोसायट्यांना माफक व्याजाचे दरानें कर्ज देण्यांत येतें.
३ सोनें, चांदी व शेतकी मालतारणावर कर्ज देण्यांत येतें.
४ इतर सर्व प्रकारच्या बँकिंगचा व्यवहार केला जातो.

— अधिक माहिती समक्ष अगर पत्रद्वारें —

*सरकारनियुक्त डायरेक्टर्स बोर्ड.*

१ श्री. आर. बी. आरवाडे B. A. LL. B. सांगली (चेअरमन)
२ श्री. व्ही. पी. पोवार, B.A.LL.B., M.P. मिरज (व्हा. चेअरमन)
३ श्री. एम्. एच. गोडबोले B. A. LL. B., M.L.C. सांगली.
४ श्री. के. ए. चौगुले B. A., LL. B. सांगली.
५ श्री. बी. ए. दप्तरदार B. A. सांगली.
६ श्री. हिंदुराव एम्. पाटील, सांगली.
७ श्री. सुबराव ए. पाटील, सांगली.
८ श्री. जे. व्ही. करमरकर सराफ, सांगली.
९ श्री. ए. एन्. खानविलकर, जत.
१० श्री. जी. के. मोगली, B. A. जत.
११ श्री. विठ्ठलराव बी. देशमुख, माहुली, ता. खानापूर.
१२ श्री. डी. बी. सूर्यवंशी, M.L.A. अंकलखोप ता. तासगांव.
१३ श्री. हंसाजीराव बी. पाटील, पेठ, ता. वाळवें.
१४ श्री. एम्. व्ही. चरणकर, बिळाशी, शिराळामहाल.
१५ मे. असि. रजिस्ट्रार, को. सो. सांगली.

श्री. वाय. एस्. बोरगांवकर, B. A., B. Com. मॅनेजर.

सरकारचें व रिझर्व्ह बँकेचें सहाय्य कितपत हवें तें सांगेल व कर्जाचा योग्य विनियोग व्हावा ह्या दृष्टीनें घ्यावयाच्या दक्षता स्पष्ट करील, अशी आशा आहे.

### ग्रामीण भागांतील बचत

सहकारी संस्थांमार्फत कर्जपुरवठा करतांना, शेतकऱ्यांची बचत सहकारी चळवळीकडे आकर्षित केली जाण्याकडेहि लक्ष ठेवलें पाहिजे. सध्यां पोस्टल सेव्हिंग्ज, सरकारी कर्जें व व्यापारी बँकांच्या कांहीं शाखा ह्यांमुळें खेडेगांवांतील पैशाचा बराच मोठा भाग खेड्यांतून बाहेर वळविला जात आहे. हे पैसे शेतीच्या उत्पादनास मदत करण्यासाठी प्रत्यक्षपणें उपयोगी पडत नाहींत. खेडेगांवांत सहकारी संस्थांचें कर्ज पुरवठ्याचें काम प्रभावी व्हावयाचें असेल, तर खेड्यांतील बचत त्यांना अधिकाधिक प्रमाणांत उपलब्ध व्हावयास हवी. डॉ. पंजाबराव देशमुख ह्यांनीं सुचविल्याप्रमाणें, प्रत्येक कर्जदार किंवा शेतकरी ह्याला त्याच्या शेताच्या आकाराचे प्रमाणांत किंवा मुंबई राज्य सहकारी बँकेनें प्रयत्न चालविल्याप्रमाणें, त्याच्या वार्षिक उत्पादनाचे प्रमाणांत कांहीं लहान रकम सहकारी संस्थांत ठेव म्हणून ठेवण्यास सांगितली, तर सहकारी संस्थांजवळील पैशाचें बळ पुष्कळच वाढेल व त्यांना शेतीच्या वाढत्या गरजा भागविण्याचें साधन उपलब्ध होईल. म्हणून, शेतकऱ्यांना बचत करावयास लावून ती स्वतःच्या सहकारी सोसायट्यांत किंवा सहकारी बँकांत ठेव म्हणून ठेवण्यास प्रवृत्त करण्याचें त्यांना शिक्षण दिलें पाहिजे.

### शेतीच्या मालाची विक्री

कर्जदाराची कर्ज देणाऱ्या संस्थेबद्दल निष्ठा आणि कर्जाची वक्तशीर परतफेड, ह्यावर संस्थांकरवीं कर्जपुरवठ्याच्या योजनेचें यश अवलंबून राहतें. ह्या राज्यांत शेतीच्या कर्जपुरवठ्याची योजनाबद्ध व्यवस्था सुरू करण्यांत आली त्यावेळीं ह्या गोष्टीची जाणीव ठेवण्यांत आलेली होती. कर्जदारांनीं पिकविलेल्या पिकांची विक्री सहकारी विक्रीच्या संघटनांमार्फत करण्यावरच शेतीचा भांडवलपुरवठा अवलंबून राहील हें स्पष्ट आहे. दुर्दैवानें, शेतकी पतव्यवस्थेंतील ह्या प्रश्नाचें महत्त्व पुरेसें लक्षांत घेतलें जात नाहीं. कांहीं खरेदी-विक्री संघांना आलेलें अपयश आणि विक्रीच्या संस्थांची सध्याची, कांहीं अपवाद वगळून, कार्यपद्धति ह्यांवरून शेतकी मालाच्या विक्रीचे बाबतींत सहकारी चळवळीचा अत्यंत कमकुवतपणा दिसून येतो. सहकारी मालविक्रीची व्यवस्था वरपासून खालपर्यंत, सर्व थरांतून कार्यक्षम कशी होईल आणि विशेषतः जेथें शेतकरी आपला तयार माल विक्रीसाठी प्राथमिक संस्थेच्या हवाली करतो तेथपासूनची संघटना बलवान कशी होईल, ह्याचें अगत्य मला फार वाटतें. उत्पादन आणि विक्री, ह्यांचा मेळ सध्यापेक्षा अधिक कार्यक्षमतेनें घालण्यांत येणें आवश्यक आहे. सहकारी संघटनेमार्फत शेतीच्या उत्पादनाची विक्री होण्यावरच सहकारी बँकांच्या पतव्यवस्थेचें यश अवलंबून आहे. पिकाचें तारण हाच कर्जाचा पाया असतो. म्हणून, पिकाचें उत्पादन विकून टाकल्यावर व त्याच्या पैशानें कर्ज फेडल्यावर, पिकावरील बोजा उठावा, अशी योजना आहे. म्हणून, पतव्यवस्थेच्या जोडीनेंच विक्रीची व्यवस्था होण्याचें महत्त्व निर्विवाद आहे. सध्याच्या विक्री संस्थांचे दोष शोधून व ते टाळण्यासाठी प्रयत्न करून केवळ भागणार नाहीं; नव्या सहकारी विक्रीच्या संस्था उभारणें व त्यांच्या योग्य कारभाराची आणि देखरेखीची काळजी घेणें आतां अगत्याचें झालें आहे. त्या कामीं आणखी कालापहार उपयोगी नाहीं.


आमच्या खातेदारांस, ठेवीदारांस व भागीदारांस
दिपवाळी व नवीन वर्ष भरभराटीचें जावो.

**दि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लि.**

**गणपतगल्ली, बेळगांव**

हेड ऑफिस : गणपतगल्ली बेळगांव.
शाखा : लक्ष्मीपुरी, कोल्हापूर; अरोंदा ( जि. रत्नागिरी )

— भांडवल —

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. | २,५०,०७० |
| एकूण रिझर्व | रु. | ७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १८,००,००० |

एस. जी. पंतबाळेकुंद्री,
बी. ए. एलएल. बी.,
चेअरमन.

रजिस्टर नंबर ७२१८ स्थापना १९३५

**सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँडमॉर्गेज बँक, लि.**

**शेतकरी बांधवांच्या कर्जाची खास सोय!**

शेतकरी लोकांना कर्जांतून मोकळें होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेंची, अगर नवीन विहीर काढणेची, इंजिनादि यंत्रसामुग्री खरेदी करणेची अगर जमीन खरेदी करणेची आलेली अमूल्य संधि!

हेड ऑफिस, कराड, ——→○←—— ब्रँच ऑफिस, सांगली

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ९०,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १२,००,००० |
| वांटलेलें कर्ज | रु. | १६,५०,००० |

व्याजाचे दरः—

| | |
|---|---|
| विहीर, विहीर दुरुस्ती | ४½% |
| शेती, यंत्रसामुग्रीकरितां | ५½% |
| जमीन-खरेदी व जुनें कर्ज भागविणें | ७¼% |

म. सि. पुटाणी, मॅनेजर.
नीलकंठ आणाप्पा कल्याणी, चेअरमन.

# आयुर्विमा जगतांतील चालू घडामोडी

## वारसा कर, हप्त्यांत कपात, 'म्युच्युअल' होण्याकडे प्रवृत्ति, इत्यादि प्रश्न

( श्री. ज. रा. जोशी, एम. एस्सी., एफ. आय. ए., डेप्युटि ॲक्चुअरी, वेस्टर्न इंडिया विमा कं. लि., सातारा )

गेल्या महिन्या दोन महिन्यांपासून विमा कंपन्यांच्या जाहिराती वर्तमानपत्रांमध्यें भरपूर प्रमाणांत दिसूं लागल्या आहेत. विशेषत: भारतांतील दोन बड्या आणि म्हणून जाहिरातींवर जास्त पैसे खर्च करणें ज्यांना शक्य आहे अशा कंपन्यांनीं तर प्रचाराची अगदीं धमाल उडवून दिली आहे. विमा कंपन्यांनीं आपल्या प्रचाराची ही जी नवी आघाडी उघडली आहे ती वर्तमानपत्रें चाळणाऱ्या कोणाच्याहि लक्षांत आली असेल. ह्या आघाडीचा उगम शोधावयाचा झाला तर आपणांस दोन वर्षांपासूनचा आढावा घ्यावा लागेल.

### वारसा करामुळें कंपन्यांच्या उत्साहांत वाढ

१९५२ साल हें सर्वच धंद्यांच्या दृष्टीनें फार मंदीचें गेलें. विमा कंपन्या ह्याला अपवाद नव्हत्या. तेव्हांपासून नवीन काम मिळवून आपल्या धंद्यांतील जोम कायम ठेवण्याच्या हेतूनें कशी पावलें टाकावयास हवींत या विचारास धंद्यांतील श्रेष्ठी मंडळींत चालना मिळाली. दरम्यान जागतिक परिस्थितींतहि सुधारणा झाली व त्यामुळें १९५३ सालांत कामाचा ओघ १९५२ पेक्षा वाढला. त्यांतच १९५३ अखेर वारसा कराचा कायदा जारी झाल्यामुळें दुधांत साखर पडली. या कायद्यांत अशीं कांहीं कलमें आहेत कीं, ज्यामुळें विशिष्ट प्रकारचे विमे घेतले तर वारसा करापासून कांहीं अंशीं सूट मिळवितां येते; शिवाय वारसा कर भरण्यासाठी विमा घेऊन ठेवला म्हणजे मृत्यूनंतर येणारे विम्याचे पैसे करासाठी देऊन मूळ इस्टेट होती तशी राहूं शकते; तिच्यामधील कांहीं भाग विकून कर भरावयाची पाळी येत नाहीं. या दोन कारणांमुळें हा कायदा अमलांत आल्यापासून धनिक लोकांत नवे विमे घेण्याची लाट आली. लाख–लाख, दोन–दोन लाखांचे विमे सहजगत्या मिळूं लागले; आणि धंद्यांत उत्साहाचें वारें संचारूं लागलें.

### हप्त्यांचे दर कमी, का बोनस जास्त ?

तथापि, विमा घेणाऱ्यांमध्यें पैसेवाल्यांची संख्या एकूण विमेदारांच्या मानानें थोडीच असते. तेव्हां नुसत्या पुंजिपतींच्याकडे लक्ष देऊन भागणार नाहीं; मध्यम आणि कनिष्ठ वर्गांतील लोकांकडून जास्त विमे घेतले गेले तरच धंद्याची स्थिति कायमची सुधारणें शक्य आहे, हें उघड होतें. विमा कंपन्यांनींहि अर्थातच ही गोष्ट ओळखली होती. यासाठी उपाययोजना काय करावी याबाबत मात्र त्यांच्यामध्यें मतभेद होते. एक मत असें होतें कीं, विमेदारांना देण्यांत येणाऱ्या बोनसच्या दरांत वाढ केली कीं कार्यभाग होईल. विमेदारांच्या मृत्यूच्या प्रमाणांतील घट आणि बाजारांत मिळूं शकणाऱ्या व्याजाच्या दरांतील वाढ यामुळें नवीन मूल्यमापन झाल्यानंतर बहुतेक विमाकंपन्या बोनसचे दर वाढविणार हें ठरल्यासारखेंच होतें. शिवाय हल्लीं चालू असलेल्या विमा पॉलिसीपैकीं ऐंशीं टक्क्यांच्या वर विमे नफ्याचे असल्यामुळें ही वाढ बहुतेक सर्व विमेदारांना समाधानकारक वाटली असती असें समजावयास हरकत नाहीं.

परंतु, एका विमा कंपनीनें आकस्मिक रीत्या आपले हप्त्यांचे दर गेल्या मार्च महिन्यापासून बेसुमार कमी केले. जास्त बोनसपेक्षा हप्त्यांचे दर कमी असण्याचा परिणाम विमा घेणाऱ्यांवर अधिक होतो याचा प्रत्यय यावेळीं आला; आणि बाजारांतील स्पर्धेला तोंड देतां यावें म्हणून दुसऱ्या दोन–चार कंपन्यांनीं लगेच या कंपनीचें अनुकरण केलें. विमा कंपन्यांच्या कांहीं बिगर-सरकारी ॲसोसिएशन्स आहेत. सर्व कंपन्यांची मिळून एक निम-सरकारी ॲसोसिएशनहि आहे. यापैकीं बहुतेक सर्वांनीं दरकपातीविरुद्ध बऱ्याच तक्रारी केल्या. दोन्हीं बाजूंनीं आपआपल्या मताच्या समर्थनार्थ मुद्दे मांडले, चर्चा झाल्या. भारतांत ज्या दीडशेंच्यावर कंपन्या आयुर्विम्याचें काम करतात त्यांपैकीं पुष्कळशा लहान आहेत. त्यांना आपले दर उतरविणें सहज शक्य नव्हतें. त्यामुळें या दरकपातीसंबंधीं लहान कंपन्या विरुद्ध मोठ्या कंपन्या, असा एक सामनाहि झाला. परंतु दरकपात एकदां झाली ती झालीच; आणि हलके हलके बहुतेक सर्व कंपन्यांना आपले दर उतरविणें भाग पडलें.

आयुर्विमा धंद्यांत केवळ या वर्षांतच नव्हे, तर गेल्या कैक वर्षांत येवढी खळबळजनक घटना घडली नव्हती. या घटनेचे एकंदर धंद्यावर कोणकोणते दूरगामी परिणाम होतील हें आज सांगणें धाष्टर्याचें होईल. परंतु सर्व विमा कंपन्यांच्या दृष्टीनें ही मोठी शुभघटना नसली, तरी विमेदारांना मात्र ती स्वागतार्ह वाटली असेल हें निःसंशय होय.

### दरकपातीस सबळ कारणें

दर उतरविण्याविरुद्ध केल्या गेलेल्या हाकाटीचा विशेष परिणाम झाला नाहीं, याचें खरें कारण दरकपात करण्यामागील कारणें तितकींच सबळ आहेत. १९३१ च्या शिरगणतीप्रमाणें देशांतील स्त्री व पुरुष यांची सरासरी आयुर्मर्यादा २६·५६ वर्षें आणि २६·९१ वर्षें अशी होती. तीच १९५१ च्या शिरगणतीप्रमाणें ३१·६६ वर्षें आणि ३२·४५ वर्षें इतकी झाल्याचें दिसून आलें. पंचवार्षिक योजनांमुळें नागरिकांचें जीवन जसजसें अधिकाधिक समृद्ध आणि सुखी होत जाईल तसतशी त्यांची आयुर्मर्यादा आणखी पुष्कळच वाढणार आहे. इतर देशांच्या बाबतींत हा अनुभव प्रत्यक्ष आला आहे आणि आपण त्याला अपवाद ठरण्याचें कांहींच कारण दिसत नाहीं. व्याजाच्या बाबतींतहि परिस्थिति समाधानकारक आहे. सरकारनें विमा कंपन्यांवरील प्राप्तिकराचा बोजा कमी केला आहे आणि बाजारांतील व्याजाचे दरहि पूर्वीपेक्षा वाढले आहेत. या दोन गोष्टींमुळें विमा कंपन्यांना आपल्या निधीवर जास्त व्याज सुटूं लागलें आहे. गेल्या पांच वर्षांत विमा कंपन्यांना त्यांच्या निधीवर पडलेले व्याजाचे दर अनुक्रमें ३·०२, ३·०५, ३·१६, ३·३३, व ३·४३ असे आहेत. फक्त खर्चाच्या बाबतींत अनुभव बरा नाहीं. विमा कंपन्यांच्या खर्चामध्यें पूर्वीपेक्षा थोडी वाढच झाली आहे. म्हणजे, दरकपात केली त्यावेळीं दोन गोष्टी दर कमी करण्याला अनुकूल व एक कांहींशी प्रतिकूल होती. या तिन्हीं गोष्टी लक्षांत घेऊन जे नवे दर तयार करण्यांत आले आहेत ते जुन्या दरापेक्षा सरासरी दहा टक्क्यानें कमी आहेत.

दर कपात ही गोष्ट तत्त्वत: केव्हांहि चांगलीच; परंतु एकदम फार दर उतरविल्यामुळें जुने विमे पेडअप करून नवे विमे घेण्याकडे विमेदारांची प्रवृत्ति झाल्यास नवल नाहीं. यामुळें दिसावयाला नवीन विमे घेतले गेले तरी विमेदारांच्या विमा संरक्षणांत वाढ

होत नाहीं. नवा विमा देतांना करावा लागणारा खर्च तेवढा विमा कंपन्यांना निष्कारण सोसावा लागतो. हा अनिष्ट परिणाम एकाच वेळेस खूप दर कमी करण्याऐवजीं हप्त्या हप्त्यानें दर कमी केले असते तर टाळतां आला असता. पण आतां त्याविषयीं खल करण्यांत कांहीं स्वारस्य नाहीं.

### नव्या विमेदारांना बोनस किती मिळणार?

नवीन मूल्यमापन झाल्यानंतर बोनसचे दर वाढविले जातील असा जो अंदाज होता तो खरा ठरूं लागला आहे. नुकतेच कांहीं मूल्यमापनांचे अहवाल जाहीर करण्यांत आले आहेत. त्यामध्यें जाहीर करण्यांत आलेले बोनसचे दर मागील मूल्यमापनांपेक्षा बरेच जास्त आहेत. हा वाढवलेला बोनस ३१ डिसेंबर, १९५३ रोजीं जे विमे चालू होते त्यांना दिला जाणार आहे. नवीन कमी दरानें जे विमे आज दिले जात आहेत त्यांना बोनस द्यावयाचा प्रश्न १९५४ अखेर किंवा त्यानंतरचें मूल्यमापन जी ती कंपनी करील तेव्हां उद्भवणार आहे. कमी दराचे हप्ते देणाऱ्या नव्या विमेदारांना आणि जास्त दराचे हप्ते देणाऱ्या जुन्या विमेदारांना एकच बोनस मिळेल, कीं दोघांना दोन निरनिराळया दरानें बोनस वांटला जाईल याचा निर्णय त्यावेळीं केला जाईल. म्हणजे, अजून वर्ष-दोन वर्षे उलटल्याखेरीज तें समजाणार नाहीं. अर्थात्च नवीन विमे घेणाऱ्या विमेदारांना त्यांची या बाबतींतील उत्सुकता कांहीं काल दाबून ठेवणें भाग आहे.

### विमा एजंटांची निवड व त्यांचें शिक्षण

दरांमध्यें कपात आणि बोनसवाढ याखेरीज ज्या गोष्टींचे पडसाद हल्लीं कानांवर पडत आहेत, त्यांमध्यें एजंटांची निवड कशी करावी व त्यांना शिक्षण देऊन आपल्या कामांत तरबेज कसें करावें ही बाब प्रमुख दिसते. आजपावेतों, मिळेल त्याला एजंट बनवायचा व करील तितके दिवस काम करील असें म्हणून स्वस्थ बसावयाचें ही प्रथा चालू आहे. पण ह्यामुळें विम्याचा प्रचार जोरदारपणें, केला जात नाहीं. अनेक एजंटांना चारदोन प्रश्न खडसावून विचारले तर त्यांची समर्पक उत्तरें देण्यास ते असमर्थ ठरतात. याचें कारण त्यांच्या कंपनीनें त्यांना जुजबी स्वरूपाची माहिती देखील पुरविण्याची खबरदारी घेतलेली नसते. परिणामीं नव्या एजंटांची भरती व जुन्यांची गळती चालू राहते आणि सतत अनेक वर्षे विमा एजंट म्हणून काम करणाऱ्यांची संख्या अत्यल्प राहते, असें त्याविषयींचे आंकडे बोलतात. दुसरी गोष्ट, फावल्या वेळांत विम्याचें काम करणाऱ्यांबद्दलची आहे. असे एजंट विमेदारांना हवी ती मदत करूं शकत नाहींत. त्यांना तेवढा वेळहि नसतो आणि हुरूपहि नसतो. म्हणून एजंट हा केवळ विम्याचेंच काम करीत असावा. तो कामसू आणि अभ्यासू असावा. विक्रेत्याला लागणारे सर्व गुण त्याच्या अंगीं असावेत. विमा घेण्यानें विमेदाराचें हित होतें अशी श्रद्धा त्याचे ठायीं असावी, वगैरे. या गोष्टींकडे विमा कंपन्यांचें लक्ष आतां अधिकाधिक जाऊं लागलें आहे. यावर्षी मार्च महिन्याच्या अखेरीस मुंबईला इंडियन लाईफ ऑफिसेस असोसिएशनचें वार्षिक अधिवेशन भरलें होतें. त्यावेळीं या विषयावर प्रबंध वाचले गेले व त्यावर चर्चा करण्यांत आली. आयुर्विम्याच्या योगानें समाजाची सेवा कोणत्या प्रकारें केली जाते या विषयावरहि प्रबंध वाचले गेले आणि चर्चा झाली. भारतांत दर माणशीं विमा रु. २५ सुद्धां नाहीं. शिवाय, राष्ट्रीय उत्पन्नापैकीं फक्त अर्धा टक्का रक्कम आज विम्यासाठीं खर्च केली जाते. तेव्हां, धंद्याच्या वाढीला देशांत अजून प्रचंड वाव आहे या आशादायक गोष्टीचा पुनरुच्चार कॉन्फरन्समध्यें करण्यांत आला.


# दि कल्याण पीपल्स
## को-ऑपरेटिव्ह बँक लि.

पो. बॉ. नं. ११ ] कल्याण [ टे. नं. ५५

स्थापना : ४ जून, १९२३

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| भरलेलें भांडवल | रु. ३,१३,७१० |
| खेळतें भांडवल | रु. १४,७८,०११ |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ३,१२,७४० |
| सरकारी व इतर रोख्यांत गुंतविलेले | रु. ५,७५,१०० |

मुख्य ऑफिस :
सवनीस वकील यांची इमारत, टिळक चौक, कल्याण.
शाखा : ★ शिवाजी चौक, कल्याण ★ डोंबिवली ★ शहापूर व ★ अंबरनाथ
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

: डायरेक्टर बोर्ड :
चेअरमन
श्री. दौलतराव जयरामराव झुंजारराव
मॅनेजिंग डायरेक्टर्स
श्री. गंगाधर वासुदेव भिडे व
श्री. रावसाहेब मूळशंकर कृष्णराम जोशी
डायरेक्टर्स
श्री. पांडुरंग शिवराम देशमुख
श्री. महंमद युसुफ अब्दुल गफूर मुल्ला
श्री. वासुदेव गोविंद खडकबाण
श्री. माधव शंकर गोडबोले
मॅनेजर
बाळकृष्ण बाबुराव रुद्रभटे



स्थापना सन १९३५ टे. नं. २४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स
# को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, कॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ८०,००० हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★
श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी., ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पां. ढोरे,
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे.
डायरेक्टर्स.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

**'म्युच्युअलायझेशन'**

म्युच्युअलायझेशन ही या वर्षातील आणखी एक महत्त्वाची घडामोड म्हणतां येईल. ओरिएंटल विमा कंपनी ही भारतांतील एक फार जुनी व सर्वांत मोठी विमा कंपनी आहे, ही गोष्ट नव्यानें सांगावयास नको. ही कंपनी आजवर खाजगी मालकीची होती. परंतु ती आतां लवकरच म्युच्युअल होणार आहे. याबाबत कराव्या लागणाऱ्या सव्यापसव्यांपैकीं बराचसा भाग उरकला गेला आहे. याच सुमारास मद्रासकडील पृथ्वी विमा कंपनी ही सुद्धा म्युच्युअल होऊं पाहात आहे. ज्या कंपन्या आज म्युच्युअल आहेत त्यांपैकीं कांहींच्या अध्यक्षीय भाषणांमधून भांडवलवाल्या कंपन्या म्युच्युअल होऊं लागल्या हें नव्या युगाचें द्योतक आहे, अशा तऱ्हेची भाषा बोलली जाऊं लागली आहे. या दृष्टीनें या वर्षींची ही घडामोड भविष्यकाळीं फार क्रांतिकारक ठरणें असंभवनीय नाहीं. ओरिएंटलचें म्युच्युअल होणें, ही पुढें सुरू होणाऱ्या नाटकाची नांदी असूं शकेल; परंतु तडकाफडकी कांहीं होईल, असें मात्र नाहीं. या गोष्टी घडून घेण्यास कालावधि लागतो. आजच्या चढाओढीच्या जगांत आतां लहान कंपन्या टिकाव धरूं शकणार नाहींत ही गोष्ट स्पष्ट दिसत असतांहि अमल्गमेशन्स करण्याकडे प्रवृत्ति कमीच दृष्टीस पडते. ज्या कंपन्या म्युच्युअल आहेत परंतु लहान आहेत त्यासुद्धां एकत्र येऊन एक जोरदार संस्था निर्माण करूं चाहत नाहींत. यावरून अनेक कंपन्या एकत्र येणें किंवा भांडवलवाल्या कंपन्यांचें म्युच्युअल कंपन्यांत रूपांतर होणें हें किती संथपणें व्हावयाचें आहे तें दिसून येतें. मात्र ओरिएंटलनें घातलेला धडा पाहून त्याविषयींच्या विचारास जी जोराची चालना दिली गेली गेली आहे, तिचा थोडा–फार परिणाम इतर कंपन्यांवर झाल्याशिवाय राहणार नाहीं.

**श्रॉफ कमिटीच्या शिफारसी**

महत्त्वाच्या गोष्टी प्रथम पाहिल्यानंतर आतां इतर एकदोन गोष्टींचा निर्देश करावयास हवा. यामध्यें श्रॉफ कमिटीच्या रिपोर्टाला पहिलें स्थान देणें उचित ठरेल. मागच्या वर्षी डिसेंबर महिन्यांत रिझर्व्ह बँकेनें श्रॉफ कमिटीची नियुक्ति केली आणि देशांतील उद्योगधंद्यांस भांडवलाचा पुरवठा करण्याला मदत व्हावी म्हणून योजावयाचे उपाय सुचविण्याची कामगिरी तिच्याकडे सोंपविली. कमिटीनें आपल्या रिपोर्टांत विमा कंपन्यांच्या बाबतींत दोन सुधारणा सुचविल्या आहेत. या दोहींचा उद्देश विमा कंपन्यांच्या निधींची गुंतवणूक करण्यावर असलेले निर्बंध जरासे सैल व्हावे व या निधींतील अधिक भाग देशांतील उद्योगधंद्यांमध्यें गुंतविला जावा, असा आहे. पहिली सूचना, विमा निधींपैकीं सरकारी रोख्यांत गुंतवाव्या लागणाऱ्या भागाचें प्रमाण पंचवीस टक्क्यांऐवजीं वीस टक्के म्हणजे पांच टक्क्यानें कमी करावें अशी आहे. दुसरी सूचना, एकाच कंपनींत २½ टक्क्यापेक्षा जास्त रक्कम गुंतविण्यावर जें बंधन आहे तें वाढवून ५ टक्क्यांपर्यंत रक्कम गुंतविण्यास परवानगी असावी, अशी आहे. या सूचना मान्य होण्याजोग्या असल्या तरी विमा कायदा तेवढ्यासाठीं बदलला जाईल असें वाटत नाहीं. विमा कंपन्या अर्थातच असा बदल व्हावा यासाठीं खटपट करतील.

**हप्ता भरण्यासाठीं प्रॉव्हिडंट फंडांतून उचल**

विमा कंपन्यांचें आणखीहि एक गाऱ्हाणें सरकारकडे आहे. सरकारी नोकरांनीं विमा उतरला आणि पॉलिसी सरकारच्या नांवानें करून दिल्या तर त्यांच्या प्रॉव्हिडंट फंडामधून विम्याचे पैसे भरण्यासाठीं रक्कम उचलतां येते. याचा परिणाम हप्ते वेळच्या वेळीं भरले जाऊन पॉलिसी शेवटपर्यंत चालूं राहण्याकडे होतो. ही सवलत पूर्णांशानें कामगारवर्गाच्या प्रॉव्हिडंट फंडाबाबत मिळालेली नाहीं. देशांतील कापड, साखर, ज्यूट, इत्यादि सहा मोठ्या उद्योगधंद्यांतील कामगारांसाठीं प्रॉव्हिडंट फंडाची योजना सप्टेंबर १९५२ पासून चालूं झाली आहे. त्या फंडांतले पैसे विम्याच्या हप्त्यांसाठीं उचलतां येतात. परंतु दर वेळीं हप्ता येणें झाला कीं एक अर्ज काढून परवानगी घ्यावी लागते. वेळींच अर्ज केला नाहीं तर हप्ता थकतो आणि पॉलिसी बंद पडते. मजूरवर्गाकडून वेळोवेळीं योग्य मुदतींत असा अर्ज केला जावा अशी अपेक्षा करणें रास्त नाहीं. तेव्हां, अशा विम्याचा हप्ता येणें झाला, कीं लगेच पैसे उचलता यावेत अशी सवलत कंपन्या मागत आहेत.

**पॉलिसी लॅप्स होण्याचा प्रश्न**

विमाधंद्यांतील मागील वर्षभरांतील ठळक घडामोडींचा परामर्श घेतां घेतां धंद्यापुढील समस्यांचें दिग्दर्शनहि वर आलें आहे. मात्र एक प्रमुख समस्या म्हणजे लॅप्सेशन, हिचा उल्लेख ओघानें येऊं शकला नाहीं. विमा कंपन्यांनीं दिलेल्या विम्यांपैकीं बऱ्याच विम्यांचे दोन–चार हप्ते भरले जाऊन त्यापुढें हप्ते भरणें बंद केले जातें असा अनुभव आहे. या गोष्टीस पॉलिसी लॅप्स होणें, असें म्हणतात. पॉलिसी शेवटपर्यंत चालू राहण्यांत विमेदार आणि विमा कंपनी या उभयतांचें हित असतें. असें असूनहि लॅप्सचें प्रमाण कमी होत नाहीं. या बिकट समस्येबद्दल दर वर्षीप्रमाणें याहि वर्षीं विमा कंपन्यांच्या वार्षिक सभेपुढें भाषण करतांना त्यांच्या अध्यक्षांनीं विवरण केलें; व तें योग्यच झालें. ही समस्या सोडविण्यासाठीं एजंटांस योग्य तें शिक्षण देऊन त्यांच्या जबाबदारीची जाणीव त्यांना करून देणें जरूर आहे आणि म्हणूनच या विषयाकडे विमा कंपन्यांचें लक्ष जात आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

विम्याच्या धंद्याचें भवितव्य उज्ज्वल आहे यांत मुळींच शंका नाहीं. पण हा उज्ज्वल भविष्यकाल जितक्या लवकर आणतां येईल तितका तो आपणां सर्वांस हवा आहे. कारण, त्यामुळें समाजाच्या आणि राष्ट्राच्या उन्नतीला मोठा हातभार लागणार आहे. या चालूं वर्षांत विमा क्षेत्रामध्यें ज्या हालचाली झाल्या त्यांचा तसा परिणाम होईल अशी आशा आपण करूं या.


**रोहा अष्टमी को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.**

**रोहें ( कुलाबा )**

स्थापना : १ जानेवारी १९४७.

आद्य संस्थापक—कै. गो. चिं. भाटे, वकील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५० ००० |
| खपलेलें भांडवल | रु. | १५,७७५ |
| खेळतें भांडवल | रु. | १,७०,००० |
| गव्हर्मेंट सिक्युरिटीज् | रु. | ३०,००० |

बँकेचें कार्यक्षेत्र नागोठणें ग्रामपंचायतीचे हद्दीपुरतें वाढविण्यांत आलें आहे. बँक आपली शाखा लवकरच नागोठणें येथें काढणार आहे. बँकेनें चालू वर्षी " अ " वर्ग मिळविला आहे व चालू वर्षी बँकेनें ४½% डिव्हिडंड दिला आहे.

**बँकेचे सदस्यांस, ठेवीदारांस व हितचिंतकांस नूतन वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो, अशी प्रार्थना.**

चेअरमन : भा. वि. परांजपे ( वकील )

व्हा. चेअरमन : ना. वा. आठवले, डॉक्टर.

हुंडी चेअरमन : अ. न. शहा.

मॅ. डायरेक्टर : म. वा. धामणकर, ( वकील )

आर. एस. ताम्हणे, मॅनेजर.

# आपल्या कारखानदारीचें भवितव्य

## संपदा हवी, पण 'श्रीमंत' नकोत !

('विवेक परदेशी')

व्यक्तिगत श्रीमंतीचें कौतुक होण्याचे दिवस संपले. सुंदर, कोऱ्याकरकरीत मोटारींतून जाणाऱ्याकडे आदरानें नजरा विनीत होत नाहींत; तर "चालला आहे गरिबांच्या श्रमावर पोसलेला ऐतखाऊ," असे भाव त्यांत आढळतात. लोकशाहीच्या या युगांत बहुसंख्यांकांचे विचार आणि आकांक्षा समाजजीवनांत अधिक उठावानें उमटाव्यात, हें योग्यच आहे. न्याय-अन्याय यांचा निर्णय जनमन लावीत आहे. बहुजनांचें मन जिंकणारे त्यांचे पुढारी म्हणून पुढें येत आहेत. पूर्वींचे दिवस बरे, असें आज आतां म्हणण्यांत अर्थ नाहीं. जुने संकेत गळून पडत आहेत. राजे-संस्थानिक-जहागिरदार गेले; जमीनदार घटका मोजत आहेत; अपुऱ्या भांडवलाचे आणि इतरहि कारखाने बंद पडत आहेत. बदलत्या काळाची चाहूल घेऊन नव्या जमान्याची दखल घ्यायला हवी. भूदान, श्रमदान, संपत्तिदान, जीवनदान, तत्त्वज्ञान सनातन पण क्रांतिकारक आहे. आग लागल्यावर ती विझवीत बसण्यापेक्षां ती लागूच न देणें अधिक बरें, नाहीं कां? औद्योगिक क्षेत्रांत किमान वेतन, योग्य वेतन, नोकरीची शाश्वति, यासारख्या प्रगत कल्पना आतां निश्चित मान्यता पावल्या असून ज्या कारखान्याला तसें करतां येत नाहीं त्याला जगण्याचा कांहींहि अधिकार नाहीं, अशी विचारसरणी पसरत आहे. कामगाराचा उल्लेख 'कारखानदारींतील महत्त्वाचा भागीदार' अशा गौरवपर शब्दांत करण्यांत येऊं लागला आहे. सरकारी नोकर, बँकांतील नोकर, श्रमिक पत्रकार, यासारखे मध्यमवर्गीयहि कामगारांप्रमाणें संघटित होत असून शेतकरी आणि कामगार वर्गापासून मध्यम वर्ग दूर राहूं शकत नाहीं असाच बँकांतील नोकरांच्या संपाचा अर्थ लागतो. ट्रेड युनियन संघटना आतां चळवळ राहिली नसून समाजजीवनांतील एक प्रभावी घटक बनली आहे. कामगार-पुढारी मंत्रिपदाची वाटचाल करीत आहेत.

यापुढें "देऊ ती मजुरी" ही स्थिति फार काल टिकणारी नसून "भरपूर वेतन, तर भरपूर काम," हें तत्त्व मान्य करायला हवें. तसेंच, कौटुंबिक जीवनांतील वडीलकी, "मी म्हणेन तसें करा, मी तुमच्याचकरितां कष्ट करीत आहें" या भावना वा विचार हल्लींच्या औद्योगिक जीवनांत मानवणारे नाहींत. "कामगार कराराप्रमाणें काम करतात; पगार घेतात. मालक आणि कामगार ह्यांत मालकाला श्रेष्ठ काय म्हणून म्हणावें? सर्वजण एकाच देशाचे स्वतंत्र, समान पातळीवरील नागरिक," अशी आतां विचारसरणी आहे. पक्षाचा आणि वर्गाचा अभिनिवेश वाढत असून दुसऱ्याचा चांगुलपणा मान्य न करतां स्वसामर्थ्याचा नि हक्कांचा जयघोष करण्याची वृत्ति सर्वच ठिकाणीं रूढ होत आहे.

खाजगी कारखाने चालत नसतील तर ते सरकारनें घेऊन चालवावे; नव्हें, तें सरकारचें कर्तव्यच आहे; ही राष्ट्रीयीकरणाची मागणी अजून विशेष आग्रहानें मांडण्यांत येत नसली तरी ती निश्चितपणानें पुढें येत आहे. राज्यकर्त्यांची धारणाहि सरकारी कारखाने काढण्याची, सरकारकडे घेण्याची असली तर त्यांत नवल नाहीं.

'नफा' हा शब्द शापित झाला आहे. खाजगी भांडवल म्हणजे पिळणूक आणि अन्याय; असें समीकरण मांडणें लोकप्रिय, सर्वमान्य होत आहे. हक्कांची जाणीव आणि त्याबद्दल आग्रह सर्वत्र वाढत आहे. जुन्या शब्दांना नवीन अर्थ येत आहेत, आणि नवीन शब्द रूढ होत आहेत.

स्वदेशीची चळवळ सामान्य जनता किंवा कामगार यांचेपेक्षा कारखानदारांनाच अधिक उपकारक ठरली आणि त्यांनीं मात्र आपले खिसे गरम केले, असें सहजतेनें बोललें जातें.

अफाट मनुष्यसंपत्ति आणि पुऱ्या न झालेल्या अनंत गरजा यांचा समन्वय वाढत्या आणि त्याचबरोबर कार्यक्षम उत्पादना-खेरीज कसा साधणार? रोज नवीन नवीन कायदे बनविले जात आहेत, असंख्य भाषणें होत आहेत, अनेक घटनांच्या अहवालांनीं वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने भरत आहेत. पण त्यापैकीं किती विचार, कायदे, भाषणें, कारखानदारीला पोषक असतात? रोजगाराला कूस रहावयाची, उत्पादनक्षमता सुधरावयाची, कारखानदारी रुजावयाची, वाढावयाची तर तसें वातावरण नको कां? अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा विचारवंतांनीं, पुढाऱ्यांनीं, कामगारपुढाऱ्यांनीं, कारखानदारांनीं, आग्रहपूर्वक प्रयत्न नको कां करायला?

डिव्हिडंड नाहीं म्हणून शेअर होल्डर्स, वेळेवर व्याज आणि रक्कम परत मिळत नाहीं म्हणून ठेवीदार, भरपूर वेतन व रोजगार नाहीं म्हणून कामगार, माल महाग आणि गुणांनीं कमी आणि त्याचा पुरवठा वेळेवर होत नाहीं म्हणून व्यापारी आणि गिऱ्हाईक—सर्वच नाराज आणि नाखूष. सरकार-दरबारींहि ह्या अशा आणि लहान कारखान्यांची दखल कशी आणि कोण घेणार?

अशा वातावरणांत कारखानदारीचें भवितव्य काय? महाराष्ट्रीय कारखानदारी सर्वसाधारणपणें कारागिरींतून किंवा विश्व-विद्यालयीन जीवनांतून निर्माण झालेली आहे. आपले कारखान-दार पुंजीपती-कारखानदार नसून त्यांना कामगार-कारखान-दार म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. त्यांचें जीवन कामगारांप्रमाणेंच कारखान्यावर पूर्णतः अवलंबून असतें. पण महाराष्ट्रीय कारखानदारीचें हें वैशिष्ट्य इतरांच्या लक्षांत येईल तेव्हां ना! कारखानदार यशस्वी झाले, कीं त्यांचें वेगळेंच रूप दिसूं लागतें, आणि पुंजीपतींचें अनुकरण ते नकळत करूं लागतात, अशी शंका येण्यास जागाच रहातां कामा नये; अशा शंकामुळें "कारखानदारी" वर अन्याय होतो व अडचणी वाढतात. हे यशस्वी कारखानदार जनतेचें चित्त वेधून घेऊन तिची कधीं-कधीं, नकळत का होईना, दिशाभूल करतात आणि हाडा-रक्तांत कारखानदारी असलेले, खरे बहुसंख्य निष्ठावंत कारखानदार मात्र त्यांचेबरोबरच निष्कारण रोषास पात्र होतात. म्हणून, बड्या कार-खानदारांनीं आपल्यावरील जबाबदारी ओळखली पाहिजे. त्यांच्या कर्तृत्वाला, कार्यनिष्ठेला, ध्येयवादाला, समाजसेवेला, त्यागाला, सौजन्याला, काळाचें हें आवाहन आहे. तें किती हिरीरीनें आणि निश्चयानें स्वीकारलें जातें यावर औद्योगिक महाराष्ट्राचा भविष्य-काल अवलंबून आहे.

# नागरी सहकारी बँकांतील कांहीं मूलभूत प्रश्न

( शं. वि. संझगिरी, बी. कॉम्‌., सेक्रेटरी, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई )

सहकारी चळवळींत नागरी सहकारी बँकांना उच्च दर्जाचें स्थान आहे; पण तें स्थान टिकविण्याची जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अलीकडे मात्र कांहीं जुन्या व नामवंत बँका डबघाईस आल्यामुळें सहकारी बँकांच्या कारभाराकडे विशेष लक्ष पुरविणें प्राप्त झालें आहे.

सचोटीचा व्यवहार व त्यापासून सहकारी गटाचें हित हा सहकारी चळवळीचा पाया आहे. त्यावरच नागरी सहकारी बँकांची उभारणी झाली. ह्या तत्त्वाचें योग्य संगोपन केल्यामुळें, त्यांची वाढ होऊं शकली. पण ही वाढ टिकविण्यासाठीं तेवढ्याच किंबहुना त्याहून जास्त सचोटीच्या व्यवहाराची जरूरी आहे. डबघाईस आलेल्या बँकांचीं कारणें जर आपण पाहिलीं तर त्यांत सचोटीच्या व्यवहाराचा अभाव हें मुख्य ठरेल.

### निःस्वार्थी, सचोटीचे व लायक संचालक

ही सचोटी राखण्यासाठीं व्यवस्थापकमंडळावर निःस्वार्थी व उच्च सचोटीचीं माणसें निवडून देण्याची जबाबदारी सहकारी बँकांच्या सभासदांवर आहे.

बँक व विशेषतः सहकारी बँक हें एक विशिष्ट तंत्र आहे. त्यांतील नाजूक भाग म्हणजे लोकांच्या ठेवी. विशेषतः गरीब व मध्यम वर्गाच्या ठेवींचा भाग त्यांत प्रामुख्यानें असतो. ह्या ठेवी म्हणजे गरीब व मध्यमवर्गीयांनीं मेहनत करून मिळविलेली बचत. या बचतींवर त्यांच्या सर्व आकांक्षा उभारलेल्या. या ठेवींवर बँकांचा मुख्य चरितार्थ चालणार. तेव्हां बँकांच्या व्यवस्थापक मंडळावर केवढी मोठी जबाबदारी आहे हें व्यवस्थापक-मंडळावरील सभासदांनीं जाणलें पाहिजे. त्यासाठीं व्यवस्थापक मंडळावर काम करणारीं माणसें आपल्या जबाबदारीची जाणीव असणारीं अशींच पाहिजेत.

बँकेचें संगोपन व संवर्धन करणें ही एक तपश्चर्या आहे. पण बँक बेजबाबदार माणसांच्या हातांत गेल्यास—मग ती संस्था कितीहि चांगली असो—तिचा विनाश व्हावयास मुळींच अवधि लागत नाहीं.

ही मूलभूत जबाबदारी पार पाडावयाची असेल तर व्यवस्थापकमंडळावर आपण जीं माणसें निवडून देतो, त्यांचा शैक्षणिक अगर इतर व्यावहारिक दर्जा त्या जबाबदारीस साजेल असा असला पाहिजे.

### कर्जाची सुरक्षितता

सभासदांच्या आर्थिक गरजा भागवून त्यांची सर्वांगीण उन्नति करणें हें सहकारी बँकेचें मुख्य कार्य. ग्राहकांकडून मिळालेल्या ठेवींचा मोठा भाग ह्या कामासाठीं वापरला जातो. तेव्हां साहजिकपणें सभासदांना देण्यांत येणाऱ्या कर्जाची सुरक्षितता ज्या प्रमाणांत असेल त्या प्रमाणांतच ग्राहकांच्या ठेवींची सुरक्षितता असें समीकरण निघतें. बँकेच्या ताळेबंदावरून कर्जाची सुरक्षितता कळणें फार कठीण.

सभासदांकडून आलेल्या कर्जाच्या अर्जाची छाननी करणें हें व्यवस्थापक मंडळाचें सर्वांत महत्त्वाचें काम आहे. तें करण्यासाठीं व्यवस्थापक मंडळावर असलेल्या सभासदांचा त्या कर्जाशीं कोठल्याहि प्रकारें संबंध असतां कामा नये. कारण, तसा संबंध असल्यास निःपक्षपातानें त्या कर्जाचा विचार होणार नाहीं. कर्जाच्या अर्जाचा विचार करितांना आपण लोकांच्या ठेवी वापरत आहों ह्याची सदैव जाणीव असली पाहिजे; पण पुष्कळ वेळां ह्या जाणीवेचा अभाव फार तीव्रतेनें जाणवतो.

पुष्कळ सहकारी बँकांमध्यें व्यवस्थापक मंडळावरील सभासदांना दिलेल्या कर्जाचें प्रमाण एकंदर दिलेल्या कर्जाच्या रकमेशीं मोठें असतें. व्यवस्थापक मंडळावरील सभासदांना कर्ज देणें हें मूलतःच चुकीचें आहे. कारण कर्जाच्या अर्जाची छाननी त्यामुळे निःपक्षपातानें होणें कठीण. त्याचप्रमाणें त्या कर्जाची वसूलीहि तितकीच धोक्यांत. ही अनिष्ट प्रवृत्ति पुष्कळ बँकांच्या अधःपातास कारणीभूत झाली आहे. याला उपाय म्हणजे कर्ज घेतलेल्या सभासदांस व्यवस्थापक मंडळावर येण्यास कायद्यानें बंदी केली पाहिजे. या दृष्टीनें सहकारी कायद्यांत बदल होणें आवश्यक आहे.

### कर्ज-पद्धतींत सुधारणा

कर्ज देण्याच्या पद्धतींतहि सुधारणा झाली पाहिजे. बँका ज्या भांडवलावर व्यवहार करतात तें ठेवीच्या रूपानें आलेलें असतें. ह्या ठेवी बहुतांशीं अल्प मुदतीच्या असतात. तेव्हां त्यांची गुंतवणूक अल्प व माफक मुदतीच्या व्यवहारासाठीं करणें हें सयुक्तिक दिसतें; पण वस्तुस्थिति मात्र उलट आहे. दीर्घ मुदतीच्या भांडवलासाठीं पैसे दिल्यानें कर्जाची वसुली होणें बिकट होतें. त्यामुळें बँकेच्या खेळत्या भांडवलाची घडी विस्कटते. यंत्रसामुग्रीच्या तारणावर दिलेल्या कर्जासंबंधीं हा अनुभव विशेष जाणवतो. अशा तऱ्हेचे व्यवहार करतांना तारणाच्या किंमतीला जास्त महत्त्व देण्यांत येतें; व अर्जदाराची पत, त्याचा धंद्यांतील अनुभव, धंद्यांतील आवक–जावक, मालाची विक्री, वसुली, अर्जदारानें घातलेल्या भांडवलाशीं कर्जाचें प्रमाण, त्यानें ठेवलेली हिशेबपद्धति या व अशाच महत्त्वाच्या बाबींचा एकसमयावच्छेदें ज्या दृष्टीनें विचार व्हावा तसा होत नाहीं. समजा, यंत्रसामुग्रीची किंमत २ लाख रुपये असली तर १ लाख रुपये कर्ज द्यावयास काय हरकत आहे? असाच संकुचित दृष्टिकोन वापरण्यांत येतो. पण त्या कर्जाची वसुली कशी होईल याकडे दुर्लक्ष केलें जातें. त्यामुळें कर्जाची वसुली बिकट होत जाऊन यंत्रसामुग्री विकेपर्यंत पाळी येते. पण यंत्रसामुग्रीची जी किंमत गृहीत धरलेली असते ती वसूल होणें हा अत्यंत गुंतागुंतीचा प्रश्न होऊन जातो व त्या यंत्रसामुग्रीचें संगोपन करण्यापलीकडे बँकेला कांहीं करतां येत नाहीं. अखेर हें मुद्दल बुडींत खात्यांत घालण्यापर्यंत मजल येऊन त्यामुळें बँकेच्या स्थैर्यास धोका पोंचतो.

### लहान पण अनेक कर्जें श्रेयस्कर

कर्जाच्या रकमेचें प्रमाण हा आणखी एक महत्त्वाचा प्रश्न आहे. बँकेच्या व्यवहाराच्या मूलभूत तत्त्वानुसार थोड्या माणसांना जास्त रकमेचीं कर्जें देण्यापेक्षां पुष्कळ माणसांना माफक रकमेचीं कर्जें देणें हें धोरण ठेवलें पाहिजे. पण वस्तुस्थिति बरोबर याच्या उलट दिसून येते. कित्येक वेळां तर एकदोन व्यक्तींनाच मोठ्या रकमेचीं कर्जें देण्यांत येतात. सहकारी वृत्तीला हें मुळींच पोषक ठरत नाहीं. ताळेबंदांत हीं कर्जें सुरक्षित कर्जें या सदराखालीं घालण्यांत येतात व यामुळें सभासदांची फसवणूक होते.

लहान प्रमाणावर व्यापार व उद्योगधंदे करणाऱ्या मध्यम वर्गातील लोकांच्या गरजा भागविणें हें नागरी सहकारी बँकेचें खरें कार्यक्षेत्र. पण या बाबतींत सहकारी बँकांच्या दृष्टिकोनांत अनास्था दिसून येते.

लहान व्यापारी व लहान प्रमाणावर उद्योगधंदे करणारा याकडे बँकेला मान्य असें तारण देण्यास नसतें. त्याच्याकडे असलेला विक्रीचा माल हेंच त्याचें तारण. तें तसें तारण असल्याकारणानें बँकेच्या १०० टक्के सुरक्षित तारणाच्या कक्षेंत बसत नाहीं. पण या व्यवहाराकडे तारणाच्या दृष्टीनें पहाणें गैर आहे. खरें तारण म्हणजे माणसाची सचोटी व त्याची व्यवहार करण्याची पद्धत.

बँकांच्या ह्या धोरणामुळें हा बहुतेक वर्ग सावकार व मारवाडी यांच्या आहारीं पडतो. कारण त्याला सावकाराकडून वाटेल तेव्हां पैसे मिळतात. ते कोणत्या दरानें मिळतात याकडे तो विशेष लक्ष देत नाहीं.

आतां सावकारांना जें तारण योग्य वाटतें तें बँकांना कां वाटूं नये? याचें कारण बँकांची लहान व्यापाऱ्याविषयीं दृष्टि जितकी सहानुभूतीची व आस्थेची असावयास पाहिजे तितकी नसते. लहान व्यापाऱ्याला आपल्या विश्वासांत घेऊन, त्याच्या गरजांचा अभ्यास करून, त्याच्या गरजा आपण कशा भागवूं शकूं, असा दृष्टिकोन असावयास पाहिजे. ५०,००० रुपये एकदोन माणसांना कर्जाऊ देण्यापेक्षा ते ५० लोकांमध्यें कर्जरूपानें विभागले तर सुरक्षिततेचें प्रमाण वाढून आर्थिक घडी सुधारण्यास मदत होते.

### लायक नोकर व अधिकारी वर्ग

मी पूर्वी म्हटलेंच आहे कीं बँकेचा व्यवहार हें विशिष्ट तंत्र आहे. तेव्हां तो व्यवहार करण्यास जो नोकरवर्ग व अधिकारी वर्ग विशेषतः अधिकारीवर्ग पाहिजे तो बँकिंग विषयांत तज्ज्ञ व अनुभवी असा असावयास पाहिजे. तज्ज्ञ व अनुभवी माणसांचा अभाव सहकारीबँकांमध्यें विशेषेंकरून दिसून येतो. पुणें येथें सहकारी कॉलेज काढून रिझर्व्ह बँकेनें सहकारी बँकांतील अधिकारीवर्गाची शिक्षणाची सोय केली आहे, हें खरें; पण जे विषय तेथें शिकवितात ते बी. कॉम्. पदवीच्या परीक्षेसाठींहि शिकविणें सुलभ झालें असतें. मुख्य गरज म्हणजे अधिकारीवर्गाला नेहमींच्यां व्यवहारांत काय काय अडचणी असतात व बँकेचा व्यवहार कसा करावयाचा याचें प्रात्यक्षिक हवें असतें. तें पुस्तकें वाचून येणार नाहीं तर त्यासाठीं प्रत्यक्ष काम करावयास पाहिजे व तें करीत असतांना त्याचें योग्य मार्गदर्शन व्हावयास पाहिजे. त्यासाठीं नामांकित बँकांमधून अशा अधिकारीवर्गाला सर्व खात्यांतून काम करण्याची संधि मिळणें आवश्यक आहे. उदाहरणार्थ, इंपीरिअल बँकेमार्फत अशा प्रात्यक्षिक शिक्षणाची सोय करणें सुलभ होईल. इतर नामांकित बँकांचेंहि या बाबतींत सहकार्य घेतां येईल. अशा रीतीनें बँकेचा अधिकारीवर्ग तयार करण्यांत आल्यावर त्याचा सहकारी बँका चालविण्यास उपयोग करतां येईल.

### पुढाकार आणि योजना

अर्थात् हा सर्व कार्यक्रम व्यवस्थित रीतीनें पार पाडावयाचा असेल तर सहकारी बँकांच्या मध्यवर्ती संस्थेनें– विशेषतः बॉंबे को–ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशननें या बाबतींत पुढाकार घेऊन रिझर्व्ह बँकेच्या साहाय्यानें अशी योजना आंखली पाहिजे.


– दुर्मिळ संगम –

हप्त्याचे व बोनसचे दर ह्यांचा एकत्रित विचार करतां आजही वेस्टर्नच्या विम्यानें कमींत कमी खर्चांत जीविताच्या जोखमीचें उत्कृष्ट संरक्षण व बोनससह जास्तींत जास्त रक्कम ह्यांचा लाभ होतो.

वेस्टर्नचा
आणखी कमी केलेल्या
दरांतील नवीन विमा घेऊन आपला
दिपावलीचा आनंद द्विगुणित व चिरकालीन करा.
नवीन वर्ष आपणांस सुखाचें जावो !

वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.,
सातारा.

पुणें शाखा :
वेस्टर्न इंडिया हाउस, लक्ष्मीरस्ता, पुणें नं. २.
फोन नं. ३४०२

सह्याद्रि इन्शुरन्स
कंपनी लि., नासिक

( अध्यक्ष : खासदार स. का. पाटील, मुंबई )

आनंदांत भर : कमी केलेले दर



कंपनीनें विमा हप्त्याचे दरांत ता. १।१०।५४ पासून कमालीची कपात केली आहे. चालू सालअखेर मूल्यमापन : बोनसमध्यें अपेक्षित वाढ. जनतेनें नेहमींप्रमाणें भरपूर सहकार्य द्यावें ही विनंती. सह्याद्रीचे विमेदार, भागीदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी व सहाय्यक यांना

★ दिवाळी आनंदाची व सुखाची जावो. ★

गो. ग. सौंदणकर.
मॅनेजिंग डायरेक्टर.

# हवामानाचे अंदाज कसे वर्तवितात

( डॉ. भो. वा. चिपळूणकर, एम्. एससी., डी. एससी., पुणें ४. )

अगदीं पुरातनकाळापासून, मानवाला, वातावरणांतील निरनिराळ्या घडामोडींना, तोंड द्यावं लागलं आहे. कोणत्याहि प्रदेशावरील हवामानाचं सर्वसाधारण आणि सौम्य स्वरूप असेपर्यंत, तेथील मनुष्यप्राण्यांना, त्याचा उपद्रव होत नाहीं; व त्यासंबंधी, ते अगदीं बेफिकीर असतात. पण तेंच त्यांनीं अत्यंत उग्र स्वरूप धारण केलं, तर सर्व जीवांवर प्राणघातक संकट कोसळून, ओढवलेले सर्व हानिकारक परिणाम, त्यांना निमूटपणें सहन करावे लागतात. वीजवावटळ, चक्रीवादळ, प्रभंजन, अतिवृष्टि, इत्यादि नैसर्गिक आपत्तींचा प्रतिकार करणं मानवाला सर्वस्वीं अशक्य असलं, तरी अगोदरपासूनच सावध राहून, त्यांचे दुष्परिणाम टाळतां येणार नाहींत का? म्हणजेच, आगामी हवामानाचं भविष्य पुरेस अगोदर वर्तवितां येणार नाहीं का?

अशाच विचारसरणींतून शास्त्रज्ञांनीं फार वर्षांपूर्वीं, वातावरणांतील घडामोडींच्या अभ्यासाला सुरुवात केली. आधुनिक काळांत, त्यांतूनच एक अत्यंत महत्त्वाचं व उपयुक्त शास्त्र निर्माण झालं. हें शास्त्र बाल्यावस्थेंत असतांना सुद्धां, केवळ सदिच्छेनं प्रेरित होऊन, एकंदर मनुष्यप्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सुखसोयींसाठी, पुढें होणाऱ्या हवामानांतील अनुकूल-प्रतिकूल घडामोडींचे अंदाज वर्तवून, आगामी अडचणी व धोके टाळण्याचे प्रयत्न, अनेक शास्त्रज्ञ फार पूर्वीपासून करीत आले आहेत. आधुनिक काळांत आपल्या देशांतच नव्हें तर जगांतील सर्व सुधारलेल्या देशांत नियमितपणें आगामी हवामानाचे अंदाज वर्तविण्याची उत्तम प्रथा पडली आहे. भारतामध्यें हवामानाचे अंदाज वर्तविण्याची मूळ सुरुवात होण्यास तरी, दोन विध्वंसक चक्रीवादळेंच कारणीभूत झालीं. इसवी सन १८६४ च्या ऑक्टोबर महिन्यांत पहिल्या वादळानें कलकत्त्यास मोठा हाहाःकार उडवून दिला. त्या वादळामुळें अदमासे ८० हजार लोक प्राणास मुकले! थोड्या दिवसांनंतर लगेच दुसऱ्या मोठ्या वादळानें मच्छलीपट्टणला तडाखा दिल्यामुळें तेथेंहि अदमासें ४० हजार लोक गतप्राण झाले!! आजच्या सुधारलेल्या काळांत सुद्धां अशा नैसर्गिक आपत्तीपासून मनुष्याला आपला बचाव करणें पुष्कळदां अशक्य होऊन जातें. जमिनीवरील वादळापेक्षा समुद्रावरील वादळें बहुधा अधिक जोरदार असतात आणि खवळलेल्या अफाट सागराच्या प्रचंड लाटांशीं आणि प्रभंजनांशीं झुंज देण्यास आजचा सर्व साधनांनीं सुसज्ज आणि निष्णात दर्यासारंगसुद्धां पूर्णपणें असमर्थ ठरतो; त्याचप्रमाणें हवेंत उंच उडणारा आधुनिक वैमानिक अशा प्रसंगीं अक्षरशः निराधार होऊन क्षणार्धांत मृत्युमुखीं पडतो.

वायुभार, उष्णतामान, आर्द्रता, ढग, पर्जन्यमान, वायुवेग, दृष्टिमर्यादा, इत्यादींना हवामानाचे घटक म्हणतात. कोणत्याहि ठिकाणीं या सर्वांचें काळजीपूर्वक अवलोकन केल्यास त्या ठिकाणच्या वातावरणाची अवस्था, म्हणजेच हवामान समजतं. या निरनिराळ्या घटकांच्या वेधांचे एकमेकांशी व मागे होऊन गेलेल्या आणि पुढें होणाऱ्या फेरफारांशी कांहीं संबंध असतात काय व असल्यास ते नक्की कोणत्या प्रकारचे असतात हें शोधून काढण्यासाठी अगदीं प्रथमपासूनच अनेक प्रयत्न करण्यांत आले. केवळ एकाच ठिकाणीं हवामानाचे वेध घेऊन चालत नाहीं असें दिसून आल्यावर अनेक ठिकाणीं, व दिवसांतून अनेकदां वेध घेण्याची खटपट सुरू झाली. एखाद्या मोठ्या प्रदेशावर अशा पांच दहा वेधशाळांच्या माहितीवरूनहि आपला हेतु नीटपणें साध्य होत नाहीं असं आढळल्यावर वेधशाळांचं जाळं अधिक दाट आणि विस्तृत करण्यांत आलं. सागरांवर संचार करणाऱ्या असंख्य लहानमोठ्या आगबोटींवर सुद्धां हवामानाचे वेध घेतले जाऊं लागले. जमिनीलगतच्या वातावरणाच्या थरांतील अनेक ठिकाणचे अनेक वेळचे वेध, आणि तसेंच डोंगरमाथ्यावरील वेधसुद्धां अपुरे पडूं लागले, तेव्हां पतंगांच्या आणि हलक्या वायूनें भरलेल्या फुग्यांच्या साहाय्यानें, छोट्या छोट्या स्वयंप्रेरित यंत्रांकरवीं वातावरणांतील वरच्या थरांसंबंधीची माहिती मिळविण्याच्या प्रयुक्त्या निघाल्या. या ठिकाणीं एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवावयास पाहिजे, ती अशी कीं, पोस्टखातें, दूरध्वनि, दूरबोली, नभोवाणी, दूरमुद्रण, अशीं एकाहून एक सरस व शीघ्र दळणवळणाचीं साधनें मिळत गेल्याकारणानेंच, दूरदूरच्या ठिकाणीं घेतलेले वेध केंद्रस्थानीं तावडतोब एकत्र आणण्याची व त्या ठिकाणीं त्यांवरून काढलेल्या अनुमानांचा तितक्याच लवकर सर्वत्र प्रसार करण्याची शक्यता व सोय निर्माण झाली व या शास्त्राची टप्प्या टप्प्यानें प्रगति होत गेली. अशा तऱ्हेनें केवळ शास्त्रज्ञांच्या कुतुहलांतून व सुरुवातीच्या खाजगी सहानुभूतींतून निर्माण झालेल्या या प्रयत्नांचं स्वरूप लवकरच पालटून निरनिराळ्या देशांत त्यांना सरकारी मान्यता मिळून, तेथील सरकारी कामकाजांत त्यांना कायमचं व महत्त्वाचं स्थान प्राप्त झालं.

आज हवामानाच्या वेधशाळांचं जाळं सर्व जगभर पसरलं आहे. आधुनिक जीवनास त्याचा योग्य उपयोग होण्यासाठी साहजिकच आंतरराष्ट्रीय सहकार्याची अत्यंत आवश्यकता असणार हें उघड आहे. कारण, वातावरणांतील घटनांना कोणत्याहि प्रकारच्यां आंतरराष्ट्रीय मर्यादांचं बंधन नसतं. वातावरणांतील खळगे, चक्रीवादळें, भोंवरें, उष्ण व थंड हवेचे प्रवाह, यांसारख्या घटना एका देशांतून दुसऱ्या देशांत अगदीं स्वैरपणें संचार करतात. त्यांच्या प्रभावाचं क्षेत्रहि अनिर्बंध असतं. उदाहरणार्थ, थंडीच्या काळांत कांहीं कांहीं खळगे तर, भूमध्य समुद्रावर उद्भवून इराण, अफगाणिस्थान, पाकिस्तान यांवरून येऊन उत्तर भारतच काय पण थेट आसामपर्यंतहि जातात! तसेंच, मोसमी पावसाचे दिवसांत व त्यानंतर सुद्धां आग्नेयेकडून येणारीं चक्रीवादळें कधीं कधीं थेट चिनी समुद्रावर उद्भवून, सयाम, ब्रम्हदेश व बंगालचा उपसागर यावरून येऊन भारतात घुसतात. तेव्हां, पृथ्वीच्या अधिकांत अधिक पृष्ठभागावरील वेध त्वरित, एकत्र जमविण्यावरच अशा घटनांच्या मार्गावरील अचूक भविष्य वर्तविणं पुष्कळसं अवलंबून असतं, हें कोणीहि समजूं शकेल; आणि यासाठींच हवामानतज्ज्ञाला शीघ्र दळणवळणाच्या साधनांची अत्यंत आवश्यकता असते.

हवामानाच्या घटकांमध्यें रोजच्या रोज घडून येणाऱ्या फरकांमुळें बनलेल्या वातावरणाच्या अवस्थेला "दैनंदिन हवामान" म्हणतात; आणि कोणत्याहि एखाद्या ठिकाणचं किंवा प्रदेशाचं, अनेक वर्षांच्या दैनिक वेधांवरून साररूपानं अजमाविलेलं हवामान,

हें तेथील "सरासरी हवामान" होय. सरासरी हवामान आणि दैनंदिन हवामान यांत पुष्कळदां बरीच तफावत आढळून येते आणि तीच असह्य कोटीची असल्यास तिच्यासंबंधी आगाऊ सूचना मिळणें अत्यावश्यक ठरतें.

आजचा हवामानतज्ज्ञ, आपल्या सभोंवतालच्या, शक्य तेवढ्या मोठ्या प्रदेशावरील अगदीं ताजी माहिती, नियमितपणें मिळवीत असतो, व ती संकलित करून, निरनिराळ्या व्यवसायांतील लोकांना त्यांच्या गरजांनुसार पुरवीत असतो. हवामानाची एकंदर माहिती व आगामी हवामानाचे अंदाज पुरविण्यासाठीं, पुणें हें भारताचें मुख्य केंद्र समजलें जातें. शिवाय दिल्ली, कलकत्ता, नागपूर, मुंबई व मद्रास असे सोईसाठीं पांच प्रादेशिक विभाग पाडले असून, या पांच केंद्रांतून त्या त्या विभागाच्या खास गरजानुसार, तेथील तज्ज्ञ, हवामानाची माहिती व आगामी हवामानाचे अंदाज पुरवीत असतात. कलकत्ता, मुंबई व मद्रास येथील प्रादेशिक केंद्रांकडे त्या जवळच्या समुद्रावरील हवामानाचे अंदाज वर्तविण्याचें कामहि सोंपविलें आहे. प्रत्येक केंद्रीय वेधशाळेंतील हवामानतज्ज्ञ, दर वेधाचे वेळीं, हातीं आलेली सर्व माहिती ठराविक संकेतानुसार, निरनिराळ्या नकाशावर मांडतो. जमिनीलगतच्या व समुद्रसपाटीजवळच्या वेधांची माहिती ज्या नकाशावर दर्शविली जाते, तो नकाशा मुख्य समजला जातो. त्याचप्रमाणें, वातावरणांतील निरनिराळ्या उंचीवरील वारे दर्शविणारे नकाशेहि महत्त्वाचे समजले जातात. तसेंच सरासरीच्या मानानें, त्यावेळीं घेतलेल्या निरनिराळ्या घटकांच्या वेधांत कमजास्त झालेले फरक, इतर नकाशावर नोंदले जातात. याशिवाय आणखीहि दोनतीन प्रकारचे खास नकाशे व आलेख तयार केले जातात. नंतर या सर्व नकाशांवर ठराविक पद्धतीनुसार प्रवाहीरेषा, समरेषा, वगैरे खाणाखुणा करून त्यावेळेचें हवामानाचें एकंदर चित्र स्पष्टपणें डोळ्यांसमोर उभें केलें जातें. यांपैकी कोणत्याहि एखाद्या नकाशावर, एक अगर अनेक घटकांत, विशेष फरक आढळून आला, किंवा अगदींच असाधारण घटना दिसून आली, तर हवामानतज्ज्ञ त्यावर आपलें सर्व लक्ष केंद्रित करून, त्या ठिकाणीं अधिक बारकाईनें पाहूं लागतो. एवढेंच नव्हें तर, अशा असाधारण घटनेचें खरें स्वरूप निश्चित करण्यासाठीं त्यावेळचे सर्व ताजे नकाशे, आधींच्या वेळचे व आदल्या दिवशींचेहि सर्व नकाशे तो बारकाईनें तपासून पहातो. अशा तऱ्हेच्या सर्वांगीण व सूक्ष्म परीक्षणांनीं, त्यावेळच्या हवामानाच्या परिस्थितीचें एकंदर स्वरूप निश्चित झाल्यानंतरच, तो आगामी घटनांसंबंधींचें आपले अंदाज ठरविण्याच्या मार्गास लागतो.

आजच्या हवामानतज्ज्ञाला, निरनिराळ्या व्यवसायांतील असंख्य लोकांना, वरचेवर पुरवाव्या लागणाऱ्या माहितीपत्रकांची, व आगामी अंदाजांची संख्या, त्यांची विविधता आणि बारकावाहि खूप वाढला आहे. त्यामुळें त्याला अनेक प्रकारचे अंदाज वर्तवावे लागतात. पुढील २४ तासांत होणाऱ्या घटनांचे अंदाज दैनिक अथवा तात्कालिक होत; पुढील ४८ ते ७२ तासांत होणाऱ्या घटनांचे, मध्यमपल्ल्याचे अंदाज होत; आणि त्याच्याहि पुढील घटनांचे अंदाज, लांब पल्ल्याचे होत. तसेंच प्रादेशिक, मार्गीय आणि स्थानिक अंदाज, स्थळ-विस्तारानुसार म्हटले जातात. शेतकरी, इंजिनिअर, बंदरांचे अधिकारी, इत्यादींना ठिकठिकाणच्या मोसमी पावसाळ्याची सुरुवात, त्यामधील खंड, चढउतार यासंबंधींचे लांब पल्ल्याचे व प्रादेशिक अंदाज पुरविले जातात. मळेवाल्यांना कडाक्याच्या थंड अथवा उष्ण हवेच्या लोंढ्यांचे मध्यम पल्ल्यांचे प्रादेशिक अंदाज


# दि महाड को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., महाड

जि. कुलाबा.

— स्थापना १९३१ —

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ८५,६७५ |
| रिझर्व फंड | रु. | ४७,२७६ |
| इतर फंडस् | रु. | ७०,००० |
| ठेवी | रु. | ७,८०,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १०,००,००० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सभासदांस व्यक्तिशः रु. १५.००० पर्यंत कर्जे देणारी कुलाबा जिल्ह्यांतील ही एकच बँक आहे. ठेवीवरील व्याजाचे दर आकर्षक आहेत. मोठमोठ्या व्यापारी पेठा असलेल्या गांवीं ड्राफ्ट देण्याची योजना आहे.

*ही दिवाळी आमचे खातेदारांस व हितचिंतकांस सुखाची जावो.*

| | | |
|---|---|---|
| द. न. वैद्य, | पी. गो. मेथा | मा. गो. धारप, |
| B.A.LL.B. | B.A.LL.B. | B.S.C. (Hon)H.D.C. |
| चेअरमन | मॅ. डायरेक्टर | मॅनेजर |

# दि कराड अर्बन को. बँक लिमिटेड.

कराड (उत्तर सातारा)

स्थापना : १९१७ ] [ फोन नं. ४३

***********************************

नवीन वर्ष बँकेचे भागदार, ठेवीदार व हितचिंतक यांना सुखाचें जावो !

***********************************

अध्यक्ष :—श्री. पु. पां. उर्फ बाबूरावजी गोखले
B. A., Ex. M. L. A.

********
****

| | | | |
|---|---|---|---|
| खेळतें भांडवल | ... | रु. | ३०,४५,१९८ |
| भाग भांडवल | ... | रु. | १,४३,५९० |
| गंगाजळी | ... | रु. | १,३४,११७ |
| इतर निधी | ... | रु. | १,६६,८४४ |
| ठेवी | ... | रु. | १४,४२,६१५ |

****
********

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

समक्ष भेटा अगर लिहा.

शंकर पुरुषोत्तम कुलकर्णी
मॅनेजिंग डायरेक्टर.

द्यावे लागतात; खलाशांना समुद्रावरील चक्री-वादळांसंबंधीचे, दैनिक अंदाज कळवावे लागतात; तसेंच वैमानिकांसाठी विमान तळावरील दाट धुकें, वारे इत्यादि संबंधी आणि मार्गावरील वीजवावटळी, ढग इत्यादि संबंधीं तात्कालिक, स्थानिक व मार्गीय असे अंदाज वर्तवावे लागतात. एकंदरींत, ग्राहकाच्या गरजेप्रमाणें स्थलकालाचा विचार करून आपले अंदाज अधिकांत अधिक उपयुक्त व अचूक व्हावेत म्हणून, हवामानतज्ज्ञ आपल्या समोरील विविध नकाशांच्या साहाय्यानें, ताज्यांतलें ताजें हवामानाचें चित्र डोळ्यासमोर वरचेवर उभें करीत असतो.

हा झाला पहिला व प्रायोगिक भाग; यापुढचा दुसरा भाग तात्त्विक होय. अर्थात् तोहि पहिल्या इतकाच किंबहुना अधिकच महत्त्वाचा असतो. यामध्यें हवामानशास्त्रांतील कांहीं महत्त्वाच्या उपपत्तींची आणि अनुभवसिद्ध शास्त्रीय कल्पनांची मदत घेऊन आगामी घडामोडींचे अंदाज वर्तविले जातात. हल्लीं साधारणपणें ज्या उपपत्तींचा विशेष विचार केला जातो त्यामागील विचारांची रूपरेषा थोडक्यांत सांगितली म्हणजे पुरें आहे. पहिल्या उपपत्तीची भूमिका अशी कीं, खुल्या वातावरणाच्या कांहीं महत्त्वाच्या गुण-धर्मांचा एकमेकांशी परस्पर संबंध असल्यामुळें हवामानाच्या निरनिराळ्या घटकांमध्येंहि ठराविक प्रकारचे संबंध दिसून येतात; आणि ते आंकड्यांनीं दर्शवितां येतात. हे संबंध सरासरी स्वरूपाचे असले, तरी ते काकतालीय न्यायाचे नसतात. निरनिराळ्या घटकांमधील हे परस्परसंबंधी गुणक, एकदां माहीत झाले म्हणजे नेहमींच्या भविष्यकथनाला फार उपयोगी पडतात. दुसरी उपपत्ति "हवेच्या आघाडी"ची. निरनिराळ्या ठिकाणांहून निघून, एकत्र येणाऱ्या दोन अगर अधिक प्रवाहांची, वातावरणांत अधूनमधून जणुं लढाईच जुंपत असते, असें यांत मानलें आहे. या संघर्षामुळें, त्यांच्या सीमांत प्रदेशावर अथवा आघाडीवर भोंवरे, खळगे, चक्री वादळें, पर्जन्य, इत्यादि जोरदार घटना उद्भवतात. कोणत्याहि दिवशीं केंद्रीय वेधशाळेंत तयार झालेल्या विविध नकाशांवर, ह्या निरनिराळ्या आघाडींची स्पष्ट ओळख पटल्यास पुढील घटनांचे अंदाज बरेच निश्चितपणें वर्तवितां येतात. तिसरी उपपत्ति "हवेच्या गठ्ठ्यां"ची होय. पृथ्वीचें एकंदर वातावरण हवेच्या निरनिराळ्या गठ्ठ्यांचें बनलेलें आहे असं यांत मानलं आहे. प्रत्येक गठ्ठ्याचे विशिष्ट गुणधर्म असून ते त्यांच्या उगमस्थानीं त्यांनीं मिळविलेले असतात; व इकडून तिकडे संचार करीत असतांना बराच काळपर्यंत ते आपले गुणधर्म सोडीत नाहींत. हवामानतज्ज्ञाचं पहिलं काम असं कीं आपल्या नकाशावर नोंदलेल्या वेधांवरून हवेच्या निर-निराळ्या गठ्ठ्यांची ओळख व विस्तार ठरविणें. या स्वरूपांत कोणत्याहि प्रदेशावरील वातावरणाचं चित्र स्पष्ट झालं म्हणजे, पुढील घटनांचे अंदाज वर्तविणें सोपें जातें. चौथी उपपत्ति "भोंवऱ्यां"ची होय. वातावरणाच्या निरनिराळ्या भागांतील हालचाल पाण्याच्या प्रवाहांतील भोंवऱ्याप्रमाणें होत असते, असं यांत मानलं आहे. साधारणपणें कोणत्याहि पुरेशा विस्तृत प्रदेशा-वरील वातावरणांत एक आड एक उच्च व नीच वायुभाराचे, भोंवरे असलेले दाखवितां येतात. आपल्या रोजच्या नकाशावर या भोवऱ्यांच्या मर्यादा व हालचालीची दिशा निश्चित करणें हें हवामानतज्ज्ञाचें मुख्य कर्तव्य ठरतं. हें जेवढं अचूक साधेल तेवढं पुढील अंदाज निर्दोष ठरतील, असं म्हटलं जातं.

या चार उपपत्तींपैकीं कोणतीहि एक उपपत्ति सर्व जगभर तितक्याच उत्कटतेनें आणि सदासर्वकाळ उपयुक्त ठरत नाहीं, असा पुष्कळांचा अनुभव आहे. त्यामुळें वेगवेगळ्या देशांतील




## सर्वांना हवी असलेली सहकारी बँक !

३७ वर्षे व्यक्तिविकास व व्यापारवृद्धीसाठी सेवा व संरक्षण करणारी

व्यापारी वर्गाची यशस्वी बँक

# दि डेक्कन मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

: मुख्य कचेरी : ११७ चर्नीरोड, मुंबई ४

: शाखा : रानडे रोड, वेस्टर्न रेल्वे-समोर, दादर

● मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजावर स्वीकारल्या जातात.

● मध्यमवर्गीयांची, व्यापारी, धंदेवाईक वगैरेंची सहकार्यानें सेवा.

* बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एस. एम. पाटकर, मॅनेजिंग डायरेक्टर.

जी. बी. देऊळकर, बी. ए., सेक्रेटरी.

महाराष्ट्रांतील सर्व सहकारी अर्बन बँकांत अग्रस्थानीं असलेली

# दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर

स्थापना : सन १९१०

हेड ऑफिस : अहमदनगर शहर

शाखा:-१ संगमनेर ( जि. नगर ) २ बेलापूर रोड-श्रीरामपूर ( जिल्हा नगर ) ३ वांबोरी ( जि. नगर. )

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| (२) वसूल भांडवल | रु. | ३,७०,२७० |
| (३) रिझर्व्ह फंड | रु. | ३,०४,०९० |
| (४) इतर फंड | रु. | २,८३,११९ |
| (५) चालू ठेवी | रु. | २५,७६,८१३ |
| (६) सेव्हिंग्ज ठेवी | रु. | ८,६१,२८९ |
| (७) मुदत ठेवी | रु. | १७,३६,०८३ |
| (८) खेळतें भांडवल | रु. | ६२,२१,७०३ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणांवर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांकडे लिहा.

त्र्यं. वि. निसळ, मॅनेजर — कृ. ज. जोशी, जनरल मॅनेजर — मो. कुं. फिरोदिया, चेअरमन

तज्ज्ञ आपापल्या अनुभवानुसार यांपैकीं एक अगर अधिक उपपत्तींचा किंवा याहून निराळ्या उपपत्तींचाहि सोईप्रमाणें वापर करीत असतात. पृथ्वीच्या कांहीं विभागांवरील हवामानाचे अंदाज वर्तविणें सरोसरीच सरळ व सोपें असतें तर दुसऱ्या कित्येक विभागांवरील अत्यंत अवघड आणि फसवें असतें, तथापि कोणत्याहि देशांतील हवामानतज्ज्ञांचे अंदाज हे कांहीं सूर्यचंद्र-ग्रहणांसारख्या, सृष्टिचमत्कारांच्या भविष्याप्रमाणें अत्यंत अचूक ठरणारे असे नसतात. त्यांना कांहीं एक प्रकारची शक्याशक्यता व तरतम भावाची माया, नेहमींच असते. गेल्या १००–१५० वर्षांतील प्रयत्नामुळेंच आजचे हवामानाचे अंदाज इतके विविध, इतके मुबलक आणि इतके अचूक वर्तवितां येऊं लागले आहेत. आज आपले दैनिक हवामानाचे अंदाज अदमासें ८० ते ९० टक्के बरोबर असतात; मध्यम आणि लांब पल्ल्यांचे अंदाजहि तितकेच बरोबर यावेत म्हणून हल्लीं सर्व जगभर शास्त्रज्ञांचे प्रयत्न चालू आहेत. तथापि, आजच्या परिस्थितींतहि वैमानिक, खलाशी, शेतकरी, इंजिनिअर, व्यापारी, इत्यादि लोकांना हवामानतज्ज्ञांचें अमोलिक साहाय्य मिळत आहे यांत बिलकुल शंका नाहीं.

( पुणें नभोवाणी केंद्राचें अनुज्ञानें )


## दि वाई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

वाई ( उ. सातारा )

| | |
|---|---|
| ठेवी | रु. ३,४७,२०० |
| खेळतें भांडवल | रु. ४,७६,५०० |

ठेवीचे दर १½ टक्का ते ४ टक्के

गृहबचत योजना, सभासद तरतूद निधि, वगैरे योजना सुरू असलेली सहकारी एकमेव संस्था.

अत्यंत माफक दरानें कर्जाऊ रक्कम दिली जाते.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

रा. चिं. पावगी, चिटणीस.

## दि पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

स्थापना ] बँक लि. [ सन १९३५

पेण, जि. कुलाबा

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००० |
| वसूल भांडवल | रु. ३१,००० |
| खेळतें भांडवल | रु. २,४०,००० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

रा. गो. भावे, बी. एजी.
मॅनेजिंग डायरेक्टर.

ना. य. नेने
चेअरमन

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांस नवीन वर्ष आनंदाचें, व भरभराटीचें जावो !

## दि बेळगांव बँक लि.

स्थापना १९३०] बेळगांव [शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

बेळगांव, रत्नागिरी, धारवाड व कोल्हापूर जिल्ह्यांत शाखाः—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,१७,००० |
| ठेवी | रु. | ९६,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सः—श्री. जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन. श्री. एल. व्ही. देशपांडे, व्हा. चेअरमन. श्री. जी. व्ही. सराफ, श्री. एम जी. हेरेकर, श्री. जे. डब्ल्यू. कलघटगी, श्री. एस. एम. मुतूर, श्री. एन. एस. शिराळी, श्री. बी. बी. पोतदार, श्री. एच. एम. जमादार, श्री. ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५२ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्ट-मधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

ही दिवाळी व नवें वर्ष बँकेच्या सर्व खातेदारांस, भागीदारांस व इतर संबंधीयांस सुखाचें व भरभराटीचें जावो.

## दी बँक ऑफ औंध लि.

( स्थापना : १९३८ )

हेड ऑफिसः—१११-११२, सदाशिव पेठ, सातारा.

शाखाः—औंध, भवानीनगर व ओगलेवाडी.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ... | रु. ५०,००,०० |
| खपलेलें भांडवल | ... | ... | रु. ३,३८,८८० |
| वसूल भांडवल | ... | ... | रु. १,६९,४४० |
| रिझर्व्हस् | ... | ... | रु. ९१,००० चे वर |

—: संचालक मंडळ :—

श्री. नरहर गंगाधर जोशी, बी. ए., एलएल. बी., वकील, सातारा. ( चेअरमन )

श्री. बाळकृष्ण गणेश चांदोरकर, बी. ए., एलएल. बी., वकील, सातारा.

डॉ. माधव दत्तात्रय बोकील, एल. सी. पी. अँड एस. डी. ओ. एम. एस. ( बाँबे ), सातारा.

श्री. रघुनाथ दिनकर माजगांवकर, व्यापारी, सातारा.

श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक; व्यापारी व कमिशन एजंट, पुणें.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—मुदतठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात.—

१ वर्ष–३ टक्के, ३ वर्षें–३॥ टक्के, ५ वर्षें–४ टक्के, ७ वर्षें–४॥ टक्के व १० वर्षें–५ टक्के.

मध्यमवर्गीयांकरितां बँकेनें अल्पसंचय योजना नवीन सुरू केली आहे व त्याकरतां संचय पेट्या दिल्या जातात.

विशेष माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

बा. वा. घमंडे,
C. A. I. I. B.
मॅनेजर.

न. गं. जोशी,
B. A., LL. B.
चेअरमन.

# बँकिंग विषयाच्या पदवीधरांविषयीं बँकांची अनास्था

( ल. म. जोशी, बी. कॉम्., सर्टि. ए. आय. बी., लंडन, सर्टि. ए. आय. आय. बी. मुंबई ).

दि डेक्कन बँक्स असोसिएशन व दि पूना बँकिंग असोसिएशनच्या विद्यमानें नुकतीच पुणें येथें "महाराष्ट्रीय बँकर्स कॉन्फरन्स" झाली. त्यावेळीं महाराष्ट्रांतील निरनिराळ्या बँकांतील कार्यकर्त्यांनीं जमून विचारविनिमय केला व स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांच्या भाषणांत जे निरनिराळे प्रश्न उपस्थित केले गेले त्यावर सांगोपांग विचार करून कांहीं महत्त्वाचे निर्णयहि घेतल्याचें आपण वृत्तपत्रांतून वाचले. तसेंच "अर्थ" च्या ता. ६ ऑक्टोबरच्या अंकांत "महाराष्ट्रिय बँकिंग" या शीर्षकाखालीं अग्रलेख लिहून शेवटीं महाराष्ट्रांतील बँकांत अधिक प्रभावी सहकार्य निर्माण व्हावयास पाहिजे अशी याग्य अपेक्षा व्यक्त केली तोंहि योग्यच झालें.

त्यावेळीं असेंही सांगण्यांत आलें कीं भारताची सर्वांगीण उन्नति व्हावी म्हणून सरकार नवीन नवीन योजना आंखीत आहे. अशा वेळीं बँकांना महत्त्व आहेच व त्यांची उन्नति होण्याच्या दृष्टीनें या कार्यास जेवढे जास्त तज्ज्ञ, वजनदार व व्यवहारी कार्यकर्ते हातभार लावतील तेवढे या घटकेला हवे आहेत. याचाच अर्थ असा कीं या विशिष्ट व्यवहाराचें शास्त्रीय ज्ञान असणारे जितके लोक आपल्याला सध्यां मिळूं शकतील त्यावर याचें यश अवलंबून आहे.

ही गोष्ट करावयाची म्हटली तर पूर्वी जे ह्या विषयांतील पदवीधर असतील पण जे दाखविलेल्या अनास्थेमुळें दुसऱ्या व्यवसायांत पडले आहेत, त्यांचा जास्तींत जास्त उपयोग करून घेणें, जे या विषयांतील पदवीधर बँकांमध्यें आहेतच त्यांच्याहि ज्ञानाचा जास्तींत जास्त उपयोग करणें व पुढील जी पिढी हें ज्ञान संपादन करील तिला अशी पदवी घेतल्यास आपल्याला पूर्ण वाव मिळेल असा विश्वास तिच्यांत निर्माण करणें ह्या तीन गोष्टी करण्याकडे आपण जास्त लक्ष देण्यास हवें; तरच हा कार्यक्षम मंडळींचा ओघ आपल्या कार्यास सतत मिळण्याची आशा आहे.

वरीलपैकीं पहिल्या मुद्याकडे वाचकांचें लक्ष वेधण्याचें या लेखांत मी योजिलें आहे.

ज्यावेळीं महाराष्ट्रांत अलीकडील बँकिंगच्या दिशाहि फांकल्या नव्हत्या तेव्हां, अस्तित्वांत असलेल्या एकुलत्या एक कॉलेजमधून बँकिंग हा ऐच्छिक विषय घेऊन पास होणारे विद्यार्थी थोडे असत व त्यावेळीं असणाऱ्या बँकांमधून कांहींना प्रवेशहि मिळाला. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सतर्फेहि परीक्षा घेतली जात असे. परंतु एकंदर गोळाबेरीज केली तर असें दिसून येई कीं पदवीधर अगर परीक्षा दिल्या म्हणून मिळणाऱ्या पगारांत, प्रमोशन्समध्यें अगर दाखविल्या जाणाऱ्या आस्थेमध्यें जरूर तें आकर्षण नव्हतें! वरिष्ट अधिकारी या ज्ञानाचा जास्तींत जास्त फायदा करून घेण्याच्या दृष्टीनें कधीं धडपड करतांना दिसले नाहींत. तर उलट यामध्यें विशेष असें कांहींच नाहीं असें दाखवीत व फार तर परीक्षा झाल्याबद्दल ५ रु. अधिक वेतन वाढवीत असत! पण आपल्या चौकटींत जे बसतील त्यांनाच पुढें ढकलण्याकडे जास्ती कल असे.

याचा परिणाम असा झाला कीं, या विषयांत तज्ज्ञ होऊन पदवी घेतल्यानंतर एका विवक्षित अपेक्षेनें जे विद्यार्थी बँकांमधून गेले व ज्यांनीं आपल्या आयुष्यास सुरवात केली, त्यांस तेथें गेल्यानंतर, आपल्या ज्ञानाचा विशेष कांहीं उपयोग नाहीं, अशीच निराशा पदरीं पडण्याचा प्रसंग आला. मग मध्यंतरीच्या काळांत निरनिराळ्या उद्योगधंद्यांत सर्वच दृष्टीनें आकर्षण लाभल्यामुळें त्यांना तिकडे जावें लागलें व बँकिंगच्या ज्ञानाचा उपयोग करून देण्यास हे पदवीधर मुकले. अशाचपैकीं कांहींजण आज कोणी शेअर बाजारांत, तर कोणी प्रोफेसर, कोणी वृत्तपत्र संपादक, कोणी इन्शुअरन्स, वगैरे वगैरे निरनिराळ्या व्यवसायांत नाइलाजानें गेलेले आपल्या दृष्टीस पडत असतील.

बरें, इतकें असून यांतील ज्या लोकांना, आपल्या ज्ञानाचा फायदा जर देतां आला तर पहावा या दृष्टीनें स्वेच्छेनें काम करण्याची हौस असते त्यांना, वरील थरांत जे एक विशिष्ट वर्तुळ निर्माण झालेलें नेहमीं पहाण्यांत येतें त्याच्या चौकटींत, त्याच्या अनुरोधानें व त्या आदेशानुसारच कार्य करावें लागतें. नाहींपेक्षा कांहींतरी फुसकीं कारणें शोधून, त्याची गळचेपी करून व्यवस्थेशीर व पद्धतशीर उचलबांगडी करण्यांत येते!

असली वागणूक पदरीं पडत असतांना व शास्त्रीय ज्ञानाच्या तपश्चर्येला अशीं कटू फळें येत असतांना इतकी कॉलेजेस व इतक्या नवीन बँका निघूनहि बँकिंग हा ऐच्छिक विषय घेऊन पास होणारे पदवीधर शेंकडा १५।२० टक्केहि नसल्यास नवल काय? यामुळेंच खूपसे विद्यार्थी "अकौन्टन्सी" हा विषय घेतात व निरनिराळ्या फर्म्समधून प्रवेश मिळवून आपल्या आयुष्यास सुरवात करतात, असा माझा समज आहे.

तेव्हां माझ्या मतें पहिली गोष्ट म्हणजे ही बँकिंगच्या पदवीधरांविषयीं वाटणारी "अनास्था" थांबली गेली पाहिजे. नंतर आतां जर खरोखरीच "तज्ज्ञ व व्यवहारी कार्यकर्त्यांची" जरूरी भासत असेल तर या दोन्ही असोसिएशन्सनीं या क्षेत्रांत पूर्वी पारंगत असलेल्या पण आस्थेच्या अभावीं निरनिराळ्या क्षेत्रांत गेलेल्या व बँकिंगचा उत्कर्ष व्हावा अशी सदिच्छा व तळमळ असलेल्या कार्यकर्त्यांस जरूर आवाहन करावें. त्यांचे पत्ते, त्यांची निरनिराळ्या विभागांतील पारंगतता, यासंबंधींची पूर्ण माहिती जमा करावी, व कोणत्या बँकांस कोणत्या तज्ज्ञांची जरूरी आहे तें बघून शक्य झाल्यास या इसमांच्या ज्ञानाचा उपयोग करतां येईल कीं नाहीं याचा आस्थापूर्वक जरूर विचार करावा अशी माझी नम्र विनंति आहे. निरनिराळ्या "प्रॅन्स" खालीं बाहेरचे "महाग" पाव्हणे बोलावून त्यांच्या परिस्थितीस लागू असलेलें ज्ञान आपल्या गळीं उतरवून घ्यायचें; यापेक्षां आपल्याच आसपास इतस्ततः पसरलेल्या व म्हणून विस्कळित व निकामी झालेल्या ज्ञानाचा थोडक्या खर्चात जास्तींत जास्त उपयोग करून घेतां आल्यास अधिक फायदा होईल. हें संघटित केलेलें ज्ञान खात्रीनें प्रभावी होईल असा मला भरंवसा वाटतो.

### अर्थशास्त्राचें रशियन भाषांतर

कौटिलीय अर्थशास्त्राचें रशियन भाषांतर करण्यांत आलें असून तें लवकरच छापलें जाईल.

## कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पुणें

—स्थापना दि. १८ जानेवारी, १९०६—

कामाची वेळ:—सकाळीं ९ ते ११-३० व सायंकाळीं ५-३० ते ७

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | .... रु. | २,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | .... रु. | १,१८,६२० |
| गंगाजळी व इतर निधि | .... रु. | १,७०,९५० |

हमेवंद (रिकरिंग) व कायम ठेवींवरील व्याजाचा दर एक वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के व ३ वर्षे ३ टक्के

बँक आपल्या सभासदांनाच दोन जामीन, घर, सरकारी कर्जरोखे, कायम ठेव, सोनें, पोस्टल पॉलिसी अगर बँकेनें पसंत केलेल्या विमा कंपन्यांच्या पॉलिसी, वगैरे तारणांवर कर्ज देते.

**सोन्याच्या तारणांवर व्याजाचा दर ५॥ टक्केप्रमाणें आहे.**

तसेंच माफक व्याजाच्या दरानें सभासदांना ओव्हरड्राफ्ट देण्यांत येतात. सरकारी नोकरांचा पगार, पेन्शन, बिलेंवसुली, इत्यादि बँकिंगचे व्यवहार बँक करिते. तसेंच सभासदांस नियमितपणा, काटकसर व शिल्लक ठेवणेची संवय लागावी या हेतूनें बँकेनें नवीन हमेवंद ठेव घेणेस सुरवात केली आहे.

**बँकेनें सुरक्षिततेसाठी, सेफ कस्टडी खातेंहि सुरू केलें आहे.**

नियमांसंबंधीं कचेरींत चौकशी करावी.

| | |
|---|---|
| य. श्री. शाळिग्राम, | पां. रा. देव, |
| कार्यवाह. | कार्याध्यक्ष. |

केवळ अल्पावधींत प्रमुख नागरी सहकारी बँकांत स्थान मिळविलेली

## दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[ पूर्वीची दि जमखंडी स्टेट सेंट्रल को. बँक लि. ]

( स्थापना सन १९४० )

मुख्य कचेरी:- जमखंडी ] :: शाखा:— बन्हट्टी

*ता. १० जून १९५४ रोजींचे आंकडे.*

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १,९९,९३५ |
| गंगाजळी | रु. | १,९८,६४३ |
| ठेवी | रु. | १२,६४,१२५ |
| खेळतें भांडवल | रु. | १७,५५,८०२ |

मध्यवस्तींत स्वतःची भव्य इमारत! सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट सोय। अनुभवी व शिक्षित नोकरवर्ग। एकोप्यानें व आपुलकीनें काम करणारें संचालक मंडळ! प्रमुख विमाकंपन्यांचे हप्ते भरण्याची सोय! भांडवलावर नफावांटणीचें साधारण प्रमाण : ५ टक्के। ठेवींवर आकर्षक व्याज। ऑडिट वर्ग 'अ'।

—सर्व तऱ्हेचे बँकेचे व्यवहार केले जातात—

| | |
|---|---|
| एस. एम. अथणी | म. द. खाडिलकर |
| चेअरमन. | मॅनेजर. |

## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली.

हरभट रोड, सांगली. ( जिल्हा-दक्षिण सातारा. )

स्थापना सन १९३५ फोन नंबर ५३

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १,८९,१६० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ९३,४६० |
| इतर फंड | रु. | १,१७,५९८ |
| ठेवी | रु. | २५,३१,५८९ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ३०,१५,७३७ |

**—: डायरेक्टर्स :—**

श्री. वामन विष्णु वाटवे, B. A., LL. B.
श्री. गणेश काशिनाथ दांडेकर, D. M. E., कारखानदार
श्री. रामचंद्र लक्ष्मण कुलकर्णी, उदगांवकर, जमीनदार.
श्री. केशव विनायक तथा दादूकाका भिडे, व्यापारी
श्री. विष्णु हरी माईणकर, B. Sc., LL. B.
श्री. गंगाधर गोविंद विनीवाले
श्री. महादेव हरी गोडबोले, B. A., LL. B., (M. L. C.) चेअरमन
श्री. ज्ञानोबा आप्पाजी येडके, जमीनदार.
श्री. लक्ष्मण दत्तात्रय भिडे

सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.
बचत निधी ठेव गोळा केली आहे.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एल्. वाय्. लागू, B. A., LL. B., मॅनेजर.

## दि मिरज स्टेट बँक, लिमिटेड, मिरज

( स्थापना १९२९ )

शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | २५ लाख रुपये |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | १२ लाख रुपये |
| वसूल भांडवल | ६ लाख रुपये |
| रिझर्व्ह फंड | ६ लाख रुपयांचे वर |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

शाखा : पंढरपूर, कुर्डूवाडी, बार्शी व लक्ष्मेश्वर.

**

ही दिवाळी व नवें वर्ष आमचे खातेदार, भागीदार व हितचिंतक ह्यांना उत्कर्षाची जावो.

| | |
|---|---|
| रावसा. व्ही. पी. बेडेकर | के. डी. शिराळकर |
| चेअरमन. | मॅनेजर. |

# बँकिंग अवार्डांचे बँकांच्या व्यवस्थाखर्चावर परिणाम

## तुलनात्मक माहिती

१९४९ चा इंडस्ट्रिअल डिस्प्यूटस (बँकिंग अँड इन्शुअरन्स कंपनीज) कायदा करून बँका व विमा कंपन्या ह्यांचेमधील मालक–नोकर तंटे मिटविण्याची जबाबदारी सरकारनें पांच वर्षांपूर्वी घेतली. गिरण्या व कारखाने ह्यांतील मजुरांच्या व कामगारांच्यासाठी १९४७ चा इंडस्ट्रिअल डिस्प्यूटस कायदा करण्यांत आला होता, त्याचे कक्षेंत १९४९ च्या वरील कायद्यानें बँकांना व त्यांच्या नोकरवर्गास आणलें. वास्तविक, कामगार आणि बँक–नोकर ह्यांना एकाच मापानें मोजणें चुकीचें आहे; व त्यांच्याबाबत उपाययोजना एकसारखीच ठेवणें अन्यायाचें आहे.

### सेन अवार्ड

गेल्या कांहीं वर्षांत कितीतरी औद्योगिक तंटे झाले, ते सरकारनें नेमलेल्या लवादांनीं वेळोवेळीं सोडवले. हे तंटे बहुतेक वेळा वैयक्तिक कामगारांपुरते किंवा त्यांच्या गटांपुरते मर्यादित होते. पण सबंद भारतांतील नोकरवर्गासाठी नोकरीच्या अटी, पगार, भत्ते, इत्यादि ठरवून देण्याचें अवघड काम ऑल इंडिया इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल (बँक डिस्प्यूटस) कडे आलें. श्री. के. सी. सेन हे त्या ट्रायब्यूनलचे अध्यक्ष होते. ह्या ट्रायब्यूनलनें बरीच मोठी पगारवाढ व भत्तावाढ देवविली. दिवाटिया ट्रायब्यूनलनें मुंबईतील बँक नोकरांना ६५ रु. प्रारंभींचा पगार देवविला होता, तो सेन अवार्डनें ९६ रु. केला. म्हणजे, त्यांत ४८% वाढ केली. बँकांचे व्यवस्था खर्च वाढले, कामाचे तास कमी झाले, बँकांनीं गिऱ्हाइकांच्या करावयाच्या सोईंत व्यत्यय आला, इत्यादि कारणांसाठी व बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या १० (१) ब कलमाविरुद्ध सेन अवार्डनें बोनस देवविला; शिस्त राखणें आणि कार्यक्षमता सुधारणें इत्यादि बाबतींत बँकांचें स्वातंत्र्य नष्ट झालें; ह्यासाठी बँकांनीं सुप्रीम कोर्टांत अवार्ड विरुद्ध अपील केलें. सुप्रीम कोर्टानें बहुमतानें ९ एप्रिल, १९५१ रोजीं सेन अवार्ड रद्द ठरविला. कारण, १९४७ च्या इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स कायद्याला धरून सेन ट्रायब्यूनलची घटना झालेली नव्हती.

### शास्त्री अवार्ड

सेन अवार्ड रद्द ठरल्यानंतर, सेन ट्रायब्यूनलनें नोकरांना देवविलेले फायदे गोठविणारा एका तात्पुरता कायदा सरकारनें केला व जानेवारी, १९५२ मध्यें नव्या ट्रायब्यूनलची नेमणूक केली. त्याचे अध्यक्ष श्री. पंचपकेशशास्त्री हे होते. बँका व त्यांचे नोकर ह्यांचेमधील तंट्यांच्या ३४ बाबींचा आमूलाग्र विचार करण्याचें काम शास्त्री ट्रायब्यूनलकडे आलें. त्या ट्रायब्यूनलनें, सेन ट्रायब्यूनलनें केलेल्या सर्व विवेचनांचा फेरविचार केला, उभयपक्षांनीं उपस्थित केलेल्या नव्या मुद्यांचा खल केला आणि आपला निवाडा एप्रिल, १९५३ मध्यें दिला. सेन ट्रायब्यूनलनें घालून दिलेलें धोरणच शास्त्री ट्रायब्यूनलनें बहुंशीं पुढें चालविलें. दोघांनीहि बँकांचें त्यांच्या खेळत्या भांडवलास व लोकसंख्येनुसार कार्यक्षेत्रास धरून वर्गीकरण केलें, तें साधारणतः एकाच पद्धतीनें. मात्र शास्त्री ट्रायब्यूनलनें लहान बँकांचा आणखी एक वर्ग पाडला. सेन अवार्डपेक्षा शास्त्री अवार्डमध्यें पगाराचें मान कमी ठरविलेलें आहे, परंतु त्यांतील नुकसान भरून काढणाऱ्या इतरहि बाबी त्यांत होत्या; भत्त्याचें प्रमाण जास्त होतें. शनिवारीं कामाचा अर्धा तास त्यानें जास्त देवविला व इतरहि कांहीं बाबतींत बँकांची सोय पाहिली. बोनसच्या बाबतींत शास्त्री ट्रायब्यूनलनें बँकांचें म्हणणें मान्य केलें व बोनस वाटण्याबाबत शिफारस करण्याचे कामीं मुग्धता राखली.

### जिजीभॉय निवाडा

शास्त्री अवार्ड मान्य करण्याच्या तयारींत बँका होत्या पण नोकरांनीं त्याविरुद्ध बरीच तक्रार केली व लेबर अपेलेट ट्रायब्यूनलकडे सबंध अवार्ड विरुद्धच अपील केलें. बँकांनींहि मग त्यांना बाधक वाटणाऱ्या मुद्यांवर अपील केलें. हीं अपिलें ऐकण्यासाठी श्री. एफ. जिजीभॉय ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक लेबर ॲपेलेट ट्रायब्यूनल नेमण्यांत आलें, त्यानें आपला निवाडा २८ एप्रिल, १९५४ रोजीं दिला. ह्या ट्रायब्यूनलनें कांहीं बाबतींत पगारांत वाढ मंजूर केली. पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे सेन व शास्त्री ह्या दोन्ही अवार्डपेक्षा बऱ्याच जास्त दरानें महागाईभत्ता देवविला. सेन अवार्डमुळें अगोदरच वाढलेल्या खर्चांत जिजिभॉय ट्रायब्यूनलच्या निवाड्यामुळें आणखी १५% भर पडली असती. बँकांचे गुप्त रिझर्व्ह व इतर गुप्त माहिती त्यांना प्रकट करावयास लावण्याचा अधिकार इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलसना आहे, हें जिजाभॉय अपेलेट ट्रायब्यूनलचें म्हणणें बँकांना बिलकूल पसंत पडलें नाहीं. नोकरवर्गानें जिजिभॉय निवाड्याविरुद्ध बऱ्याच तक्रारी केल्या आणि बँकांनींहि सरकारकडे व रिझर्व्ह बँकेकडे दाद मागितली. पगार व भत्ते ह्याबाबतींत बँकांच्या दृष्टीनें सुधारणा करण्यांत यावी व इतरहि बाबतींतील बँकांवरील जाचक आक्रमणें दूर व्हावींत, असा बँकांनीं आग्रह धरला. खालील तक्त्यांत सेन अवार्ड, शास्त्री अवार्ड आणि अपेलेट ट्रायब्यूनल अवार्ड, ह्यांनीं देवविलेल्या, कांहीं महत्त्वाच्या ठिकाणच्या, मोबदल्यांची तुलना केलेली आहे. बँकांच्या एकूण नोकरांपैकीं ६०% नोकर ह्या तक्त्यांतील सहा शहरांतील कचेऱ्यांत कामें करतात.

आमचे विमेदार-सभासद, प्रतिनिधी व हितचिंतक यांना
ही दिवाळी आनंदाची व सुखाची जावो!!!

दि
मोटार ओनर्स म्युच्यूअल
इन्शुअरन्स कंपनी लि.

मुख्य कचेरी:—फोर्ट रोड, बेळगांव.
शाखा:–मुंबई, पुणें, कोल्हापूर, नासिक, मद्रास.
ऑर्गनायझर्स:–कलकत्ता, कुर्नूल, वगैरे अनेक ठिकाणीं.
लौकरच आयुर्विमा क्षेत्रांत पदार्पण करणार!

### वेगवेगळ्या अवार्डांची तुलना

| शहर | सेन अवार्ड | | शास्त्री अवार्ड | | अपेलेट ट्राय. अवार्ड | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सुरुवातीचा | कमाल | सुरुवातीचा | कमाल | सुरुवातीचा | कमाल |
| **कारकून** | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| कलकत्ता | १२१ | ३४९ | १२८ | ३६६ | १४३ | ४१४ |
| मुंबई | १३० | ३६९ | १२८ | ३६६ | १४३ | ४१४ |
| दिल्ली | १२८ | ३६५ | १२६ | ३६२ | १४१ | ४१० |
| अहमदाबाद | १११ | ३२५ | १२६ | ३६२ | १४१ | ४१० |
| मद्रास | १२६ | ३५७ | १२६ | ३६२ | १४१ | ४१० |
| पुणें | १०४ | ३०३ | १०३ | ३०५ | १२२ | ३५२ |
| **कनिष्ठ नोकर** | | | | | | |
| कलकत्ता | ७९ | ११३ | ८३ | ११५ | ९१ | १२३ |
| मुंबई | ८५ | १२१ | ८३ | ११५ | ९१ | १२३ |
| दिल्ली | ८३ | ११९ | ८१ | ११३ | ८९ | १२१ |
| अहमदाबाद | ७२ | १०३ | ८१ | ११३ | ८९ | १२१ |
| मद्रास | ७७ | १२० | ८१ | ११३ | ८९ | १२१ |
| पुणें | ६३ | ९९ | ६६ | ९९ | ७६ | १०९ |

बँकांचें म्हणणें असें, कीं त्यांना औद्योगिक तंट्यांबाबतचे कायदे लागूच असूं नयेत; रिझर्व्ह बँकेवरच प्रत्येक बँकेंतील नोकरांच्या प्रश्नाबाबत निर्णय देण्याची जबाबदारी टाकावी. आज बँकांना कोणत्याहि नोकराविरुद्ध उपाययोजना करणें अवघड होऊन बसलें आहे. ट्रायब्यूनलच्या परवानगीखेरीज कांहीं करतां येत नाहीं आणि ही परवानगी येईपर्यंत स्तब्ध रहावें लागतें. बँकांचा व्यवस्था खर्च सध्यां कसा अप्रमाण वाढला आहे, ह्याची माहिती खालीं दिली आहे:—

### व्यवस्था खर्चांत अप्रमाण वाढ

हिंदी बँकांच्या नोकरवर्गाच्या पगाराच्या खर्चाचें ठेवींशीं प्रमाण हिंदी शेड्यूल्ड बँकांचे बाबतींत, १९४८ मध्यें १·०९% होतें तें१९५२ मध्यें १·८०% झालें. म्हणजे सुमारें ७०% वाढ झाली. अमेरिकेंतील तत्सम प्रमाण $\frac{3}{4}$ ते १% कायम राहिलेलें आहे. अमेरिकेच्या मानानें भारतांत ह्या खर्चाचा बोजा ११५% ज्यास्त आहे. ह्यामुळें एकूण व्यवस्थाखर्चाचा ठेवींवरील बोजा २·३५% पर्यंत जड झालेला आहे. ठोक नफ्यांत पगाराच्या खर्चाचें प्रमाण १९४८ मध्यें ४४·३१% होतें तें १९५२ मध्यें ५०·८६% झालें; अमेरिकन बँकांच्या बाबतींत तें ३३% आहे. एकूण व्यवस्थाखर्च हिशेबांत घेतला, तर ठोक नफ्याशीं त्याचें प्रमाण ६६·७% पडतें; अमेरिकेंत तें ५३·७ आहे. ह्याचा अर्थ, भारतांतील बँकांच्या ठोक नफ्यापैकीं दोनतृतीयांश नफा व्यवस्थाखर्च खाऊन टाकतो आणि बाकीच्या एकतृतीयांशांतून नोकरवर्गास बोनस, कर्जरोख्यांच्या किंमतींतील घसारा, बुडीत कर्जे, इत्यादींची तरतूद करावी लागते व उरलेल्यांतून कर देऊन डिव्हिडंड वाटण्याची व रिझर्व्ह काढण्याची व्यवस्था करावी लागते. प्रत्येक बँक कचेरीचा सरासरी व्यवस्थाखर्च १९४८ मध्यें ३३,००० रु. होता तो १९५२ मध्यें ५०,००० रु. झाला. बँकांकडील ठेवींत घट होत असतांना ही वाढ झालेली आहे. इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्टामुळें बँकांना तोट्यांत चालणाऱ्याहि कचेऱ्या बंद करणें अवघड जातें, कामचुकार नोकराला काढणें अशक्य होतें, इतकेंच नव्हे तर पगारांत वाढ देत रहावें लागतें; बँकेला मग तें परवडो किंवा न परवडो.

आमचे हितचिंतकांना ही दिवाळी भाग्याची जावो !

**धी बँक ऑफ सिटिझन्स लिमिटेड**

मुख्य कचेरी—१५१४ मारुती गल्ली, बेळगांव
( स्थापना १९३७ )

*सुरक्षितपणा, सचोटी व सेवा या त्रयींवर अधिष्ठित असलेली*

बेळगांव, धारवाड, कारवार आणि विजापूर या जिल्ह्यांतील प्रमुख शहरीं बँकेच्या शाखा असून सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करणारी

**मुंबई-कर्नाटकांतील एक प्रमुख बँक**

मुंबई व इतर ठिकाणांहून रेल्वे रिसिटस् वसुलीसाठी पाठविणेची सोय आहे.

जी. डी. सराफ
चेअरमन

**दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव**

स्थापना ] बेळगांव [ १९४२

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ५६,७०० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्हज् | रु. ४७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ५,३२,४०० |
| इन्व्हेस्टमेंटस् | रु. १,३३,००० |

या बँकेंत सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
व्याजाचे दर आकर्षक आहेत, याचा ठेवीदारांनीं अवश्य फायदा घ्यावा.
बँक सुरुवातीपासून " अ " वर्गांत आहे.
यावरून बँकेचा कारभार अत्यंत दक्षतेनें केला जातो, हें सिद्ध होतें.
विशेष माहितीसाठी भेटा.

ए. के. सोमणाचे, D. CO-OP. सेक्रेटरी.
जी. एम्. भातकांडे, चेअरमन.

## भारतीय व अमेरिकन बँकांच्या नोकरांचा पगार-खर्च व एकूण व्यवस्था-खर्च

| | १९४८ | १९४९ | १९५० | १९५१ | १९५२ |
|---|---|---|---|---|---|
| **हिंदी शेड्यूल्ड बँका** | | | | | |
| ठेवी (कोटी रु.) ... ... | ८७५ | ७६० | ७५४ | ७४८ | ७१५ |
| ठोक नफा (कोटी रु.) ... ... | २१·४४ | २१·४७ | २२·१४ | २४·६२ | २५·२५ |
| निवळ नफा (कोटी रु.) ... ... | ८·०७ | ७·८८ | ६·५८ | ७·५१ | ७·४४ |
| नोकरपगाराचें ठोक नफ्याशीं प्रमाण % ... | ४४·३१ | ४८·८ | ५०·८० | ४८·६८ | ५०·८६ |
| " " ठेवींशीं प्रमाण % ... | १·०९ | १३६ | १·४९ | १·६० | १·८० |
| व्यवस्थाखर्चाचें ठोक नफ्याशीं प्रमाण % ... | ६०·६ | ६३·७ | ६५·७ | ६४८ | ६६·७ |
| " " ठेवींशीं प्रमाण ... | १·४८ | १·८० | १·९३ | २·१३ | २·३५ |
| प्रत्येक बँक कचेरीचा सरासरी व्यवस्थाखर्च (हजार रु.) | ३३ | ३७ | ४२ | ४६ | ५० |
| **अमेरिकन फे. रि. सभासद बँका** | | | | | |
| ठेवी (अब्ज डॉलर) ... ... | १२१ | १२३ | १३३ | १४१ | १४७ |
| ठोक नफा (अब्ज डॉलर) ... ... | २·५ | २·७ | २·९ | ३·४ | ३·८ |
| नोकर पगाराचें ठोक नफ्याशीं प्रमाण % | ३४ | ३४ | ३३ | ३३ | ३१ |
| " " ठेवींशीं प्रमाण % ... ... | ·७२ | ·७५ | ·७५ | ·८० | ·८४ |
| व्यवस्थाखर्चाचें ठोक नफ्याशीं प्रमाण % ... | ५६·४ | ५६·२ | ५४·८ | ५३·९ | ५३·८ |
| " " ठेवींशीं प्रमाण % ... | १·२० | १·२४ | १·२३ | १·२८ | १·३७ |

**टीप :** १ ठोक नफा म्हणजे बँकिंगच्या व्यवसायांतील नफ्यांतून दिलेलें व्याज वजा करून होणारी रक्कम.
२ व्यवस्थाखर्चांत नोकरपगाराचा व इतर खर्चाचा समावेश होतो, पण दिलेल्या व्याजाचा नाहीं.

### यंदा शांततेचें नोबेल पारितोषक नाहीं

चालू वर्षाचें शांततेचें नोबेल पारितोषक द्यावयाचें नाहीं असें नॉर्वेच्या पार्लमेंटनें ठरविलें आहे. ह्या वर्षीच्या बक्षिसाची रक्कम पुढील वर्षासाठी राखून ठेवण्यांत आल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. पारितोषक न देण्याचें कारण अगर त्यासाठी सुचविण्यांत आलेलीं नांवें, दोन्हीहि, प्रसिद्ध करण्यांत आलेलीं नाहींत.

### जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्यांचें घर भाड्यानें

सुप्रसिद्ध नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्यांचें हर्टफोर्डशायरमधील घर त्यांच्या मालमत्तेच्या ट्रस्टींनीं भाड्यानें देण्याचें ठरविलें आहे. एका श्रीमंत अमेरिकन गृहस्थानें तें भाड्यानें घेण्याचें ठरविलें आहे. भाडें वार्षिक १७५ पौंड आणि कराप्रीत्यर्थ ९२ पौंड द्यावे लागणार आहेत. तथापि शॉ ह्यांची लेखन—वाचनाची खोली मात्र भाडेकरूला वापरतां येणार नाहीं. आठवड्यांतून एक दिवस लोकांना घराचा हा भाग व बाहेरील बाग पाहतां येईल.

### म्हैसूर येथील प्रदर्शन

दसऱ्याच्या निमित्तानें म्हैसूर येथें दर वर्षीं भरविण्यांत येणारें प्रदर्शन पहाण्यासाठी भारतामधील रशिआचे वकील मि. मेन्शिकॉव्ह गेले होते. म्हैसूर येथील प्रदर्शन युरोपमधील कांहीं प्रदर्शनांपेक्षा लहान असलें तरी तें प्रेक्षणीय असल्याचें मत त्यांनीं व्यक्त केलें. पुढील वर्षीच्या प्रदर्शनांत रशिआ भाग घेईल, असेंहि ते म्हणाले.

### जुळलेलीं मुलें सुटीं केलीं

पॅरिसमधील एका शस्त्रक्रियातज्ज्ञानें बेबींपाशीं जुळलेलीं दोन मुलें परस्परांपासून अलग करण्यांत यश मिळविलें आहे. ह्या मुलांचे पोटांतील कांहीं अवयव दोघांना उपयोगी होते. दोहोंपैकीं एक मूल वांचण्याची शक्यता आहे.

### अमेरिकेच्या प्रचार-वाङ्मयाला बंदी

भारतामधील अमेरिकेच्या वकिलातीतर्फे प्रसिद्ध होणारें अगर 'युसिस' ह्या वृत्तसंस्थेतर्फे प्रसिद्ध करण्यांत येणारें कोठलेंहि प्रचारात्मक वाङ्मय भारतीय संरक्षणदलांतील लोकांना देण्यांत येऊं नये असा हुकूम मध्यवर्ती सरकारनें काढला आहे. वरील साहित्य लष्करांतील लोकांना मोफत वाटण्यांत येत असे. लष्करांतील लोकांच्या निष्ठेला धक्का पोंचूं नये म्हणून ही सावधगिरी दाखविण्यांत येत आहे, असें समजतें.

### सीलोनला स्वस्त दरानें तांदूळ मिळणार

सीलोन व चीन ह्यांच्या दरम्यान झालेल्या अदलाबदलीच्या व्यापारी करारामुळें सीलोनचे ३·५ कोटी रुपये वांचतील, असा हिशोब करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें चीन सीलोनकडून ५०,००० टन रबर घेणार असून त्याच्या बदला २,५०,००० टन तांदूळ पुरविणार आहे.

### ब्रह्मदेशाच्या प्रतिनिधींचा दौरा

रेल्वेचे डबे, नदींत चालणाऱ्या बोटी व कांहीं भारी यंत्रसामुग्री विकत घेण्यासाठी ब्रह्मदेशाच्या व्यापारी प्रतिनिधींचें एक मंडळ अमेरिकेला गेलें होतें. अमेरिकेंतील दौरा आटोपून आतां तें ब्रिटनला परतलें आहे. त्यानंतर फ्रान्स, इटली, जर्मनी, स्विट्झर्लंड, बेल्जम, झेकोस्लोव्हाकिआ, ह्या देशांचाहि दौरा तें करणार आहे.

### अणूशक्तीच्या वाळूसाठी संशोधन

विशाखापट्टमच्या आसपासच्या दोनशें मैल लांबीच्या समुद्रकिनाऱ्यावर मोनासाइट व इतर खनिज वाळू सांपडली आहे, असें समजतें. ह्या वाळूचा उपयोग अणुशक्तीच्या निर्मितीसाठी करतां येतो. आंध्र विद्यापीठानें संबंधित समुद्रकिनाऱ्याचें संशोधन करावें अशी सूचना भारतीय अणुशक्ति-मंडळानें केली आहे.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

## पुणें शहर

टेलिफोन नं. २४८३ स्थापना १९१७ पोस्ट बॉक्स ५११

लक्ष्मी रोड, पुणें २.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | : | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | : | रु. | ७,४०,९९० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | : | रु. | ७,२९,९३४ |
| खेळतें भांडवल | : | रु. | १,७९,५८,४२३ |

## लॉ क र्स चे

भाड्याचे दर पूर्वीपेक्षां कमी केले आहेत.

भाग विक्री चालू आहे.

पुणें जिल्ह्यांत ठिकठिकाणीं १७ शाखा व उपशाखा असून त्यांचेमार्फत बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—मो. वि. रबडे, मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि गोदावरी शुगर मिल्स लि॰

हेड ऑफिस : फाझलभाई बिल्डिंग, महात्मा गांधी रोड, मुंबई १

नगर जिल्ह्यांत, गोदावरी नदीच्या कांठीं उभारलेल्या आमच्या

## लक्ष्मीवाडी आणि साकरवाडी

( रे. स्टेशन : कोपरगांव ) ( रे. स्टेशन : कान्हेगांव )

ह्या कारखान्यांत, अद्यावत् यंत्रसामुग्रीच्या साहाय्यानें

## शुभ्र, पवित्र व दाणेदार साखर

आमच्या मालकीच्या मळ्यांतील उसापासून तयार केली जाते.

## व्यवहाराकरितां वरील पत्त्यावर चौकशी करावी

ही दिवाळी व नवें वर्ष आमच्या हितचिंतकांस सुखाचें जावो.

# भारताच्या निर्यात व्यापाराचा आढावा

भारतामधून निर्यात होणाऱ्या प्रमुख जिनसांच्या निर्यात व्यापाराचा गेल्या चार वर्षांतील आढावा पुढें थोडक्यांत दिला आहे:—

### तागाच्या जिनसा

| वर्ष | वजन ( हजार टन ) | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | ६·५० | ११३·९४ |
| १९५१–५२ | ८·०६ | २६९·७३ |
| १९५२–५३ | ७·०५ | १२८·९२ |
| १९५३–५४ | ७·७७ | ११३·८८ |

तागाच्या जिनसांची निर्यात ही भारताच्या परदेशीय व्यापारांतील एक महत्त्वाची बाब आहे. ह्या निर्यातीमुळें भारताला परदेशीय हुंडणावळीचा मोठा लाभ होतो. तथापि, गेल्या कांहीं महिन्यांत ही निर्यात कमी होऊं लागली आहे. कांहीं वर्षांपूर्वी भारताची ह्या क्षेत्रांत मक्तेदारी होती. पण आतां तशी स्थिति राहिलेली नाहीं. त्यामुळें निर्यात मोठ्या प्रमाणावर चालू ठेवण्यासाठीं दक्षता बाळगणें जरूरीचें आहे. भारत सरकारला ह्यासंबंधीं योग्य ती जाणीव असून १९५३ च्या जुलैपासून निर्यात जकातीसंबंधीं वेगळें धोरण अंमलांत आणण्यास सुरुवात झाली आहे.

### चहा

| वर्ष | ( कोटी पौंड ) | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | ४४ | ७९·८७ |
| १९५१–५२ | ४२ | ९३·४३ |
| १९५२–५३ | ४२ | ८०·१८ |
| १९५३–५४ | ४७ | १०१·५४ |

गेल्या १५ वर्षांपासून भारतामधील चहाचें उत्पादन एकसारखें वाढत गेलें आहे. एकूण निर्यातींत चहाचें प्रमाण मात्र कमी झालें आहे. भारताच्या चहाच्या निर्यातींत अधिक वाढ करणें अगर सध्या चालू असलेली निर्यात टिकविणें अवघड आहे. कारण, चहा निर्माण करणाऱ्या इतर देशांतून उत्पादन वाढत असल्यामुळें परदेशी बाजारपेठांत स्पर्धा वाढत आहे. त्यामुळें चहाच्या किंमती आणि दर्जा ह्यांच्याकडे अधिक लक्ष देणें जरूरीचें झालें आहे.

### कपास कापड

| वर्ष | ( कोटी वार ) | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | १२७ | ११७ |
| १९५१–५२ | ४२ | ५२ |
| १९५२–५३ | ६१ | ६१ |
| १९५३–५४ | ७६ | ६३ |

१९५२–५३ सालीं एक्सपोर्ट प्रमोशन कमिटीनें ८० कोटी वार निर्यातीचें उद्दिष्ट सुचविलें होतें. परंतु तें साध्य झालें नाहीं. बाजारपेठेंत गिऱ्हाइकांची कमतरता आणि जपानसारख्या राष्ट्रांची स्पर्धा, ह्या कारणांमुळें उद्दिष्टाइतकें कापड निर्यात करतां आलें नाहीं. सरकारला ह्या परिस्थितीची जाणीव असून कापडाच्या निर्यातीला आतां सढळ हातानें परवाने देण्यांत येतात.

### कापूस

गेल्या चार वर्षांतील निर्यातीचे आंकडे खालीलप्रमाणें आहेत.

| वर्ष | गांसड्या (लक्ष) | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | ०·८४ | ४·९४ |
| १९५१–५२ | १·३१ | १३·६८ |
| १९५२–५३ | ४·०५ | १९·३३ |
| १९५३–५४ | २ | ९·४० |



गेल्या महायुद्धापूर्वी कापसाला भारताच्या निर्यातींत महत्त्वाचें स्थान होतें. पण फाळणीनंतर कापूस पिकविणारा भारताचा मोठा भाग पाकिस्तानांत समाविष्ट झाला. त्यामुळें भारताची कापसाची निर्यात खूपच कमी झाली; इतकेंच नव्हें, तर आंखूड धाग्याचा पुरेसा कापूसहि भारतीय गिरण्यांना मिळेनासा झाला. परंतु आतां उत्पादन वाढून पुरेसा कापूस मिळूं लागला आहे.

### वनस्पति–तेलें

| वर्ष | ( कोटी गॅलन ) | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | २·८९ | २३·१८ |
| १९५१–५२ | २·१४ | २२·७६ |
| १९५२–५३ | ३·४३ | २५·१४ |
| १९५३–५४ | ·७ | ६·१४ |

### तेल बिया

| वर्ष | वजन ( हजार टन ) | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | २०६·०७ | १७·२९ |
| १९५१–५२ | ८१·३२ | ७·९६ |
| १९५२–५३ | ५७·७८ | ४·७२ |
| १९५३–५४ | २७·५६ | २·२८ |

### कातडी आणि चामडी

| वर्ष | टन | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | १४,३८१ | ९·४३ |
| १९५१–५२ | १७,७४७ | ८·५२ |
| १९५२–५३ | १४,०९४ | ५·६९ |
| १९५३–५४ | ११,२७७ | ६·०८ |

युद्धापूर्वी भारत दरवर्षी सुमारें ४०,००० टन कच्ची कातडी व चामडी निर्यात करीत असे. युद्धोत्तर काळांत निर्यात बरीच कमी झाली आहे. ह्याचें कारण असें आहे कीं, हल्लीं भारत कमावलेली कातडी अधिक प्रमाणांत निर्यात करीत आहे. त्याचप्रमाणें, बूट व इतर तयार पायतणांचीहि निर्यात भारताकडून बरीच होऊं लागली आहे.

### मसाल्याचे पदार्थ

युद्धापूर्वी भारत दरवर्षी १ कोटी रुपये किंमतीचे मसाल्याचे पदार्थ निर्यात करीत असे. युद्धोत्तर काळांत ह्या पदार्थांची निर्यात अधिकच वाढली आहे. मुख्यतः काळी मिरी, वेलदोडे, मिरच्या, हळद व सुंठ हे पदार्थ निर्यात करण्यांत येतात.

| वर्ष | हंड्रेडवेट | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | ३,०८,००० | २०·४० |
| १९५१–५२ | २,९८,२८० | २३·२२ |
| १९५२–५३ | २,४८,१७४ | १६·०६ |
| १९५३–५४ | २,४८,३३५ | १२·६२ |

### तंबाखू

| वर्ष | वजन ( कोटी पौंड ) | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | ९·८ | |
| १९५१–५२ | १०·७ | १६·९२ |
| १९५२–५३ | ८·१ | १३·८५ |
| १९५३–५४ | ६·८ | ११·२५ |

भारतामधून कच्ची आणि संस्कारित अशी दोन्ही प्रकारची तंबाखु निर्यात होते. कच्चा तंबाखूचें मुख्य गिऱ्हाईक म्हणजे ब्रिटन. १९५३–५४ च्या एकूण निर्यातीपैकी ६ कोटी रुपयांच्या किंमतीची तंबाखू ब्रिटननें खरेदी केली.

### लाख

| वर्ष | हजार हंड्रेडवेट | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | ६६१ | ११·८८ |
| १९५१–५२ | ७१३ | १४·८४ |
| १९५२–५३ | ६८३ | ७·५९ |
| १९५३–५४ | ५३७ | ६·७५ |

शेलॅक हा लाखेचा प्रकार निर्यातीपैकी तीन चतुर्थांश असतो. एकूण उत्पादनापैकी ९० टक्के शेलॅक निर्यात केला जातो. पूर्वी ह्या पदार्थाच्या पुरवठ्याची मक्तेदारी भारताकडे होती. पण अलीकडे कृत्रिम लाखेची पैदास होऊं लागल्यापासून ही परिस्थिति बदलली आहे. त्यामुळें, किंमत आणि दर्जा ह्याबाबत अधिक जागरूक रहाणें भारताला आवश्यक झालेलें आहे.

### अभ्रक

जगांत उत्पादन होणाऱ्या अभ्रकापैकीं ७५ टक्के उत्पादन भारतांत होतें.

| वर्ष | हजार हंड्रेडवेट | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | ४०७ | १०·०० |
| १९५१–५२ | ४०७ | १३·२९ |
| १९५२–५३ | २८४ | ९·०१ |
| १९५३–५४ | २५० | ७·९५ |

भारताचें बहुतेक उत्पादन निर्यात करण्यांत येतें. गेल्या कांहीं वर्षांत भारतीय अभ्रकाला कृत्रिम अभ्रकाची स्पर्धा जाणवूं लागली आहे. कृत्रिम अभ्रक फ्रान्स व अमेरिका ह्या देशांत निर्माण करण्यांत येतें.

### मँगेनीझ

अभ्रकाप्रमाणेंच मँगेनीझ हें खनिज लष्करी महत्त्वाचें आहे. भारताच्या उत्पादनापैकी ५० टक्के उत्पादन डॉलर्सच्या कक्षेंतील देशांना निर्यात करण्यांत येतें. जपानहि बरेंच मँगेनीझ भारताकडून घेतें.

| वर्ष | वजन ( हजार टन ) | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | ८१० | ८·०५ |
| १९५१–५२ | ११२५ | १५·६९ |
| १९५२–५३ | १४४० | २१·७६ |
| १९५४–५५ | १५६८ | २४·२५ |

### कोळसा

गेल्या महायुद्धाच्या पूर्वीहि भारत कोळसा निर्यात करीत असे. ब्रह्मदेश आणि सीलोन भारतीय कोळसा मुख्यत: घेत असत. युद्धकाळांत देशांतच खप वाढल्यामुळें निर्यात घटली. युद्धोत्तर काळांत कोळशाची निर्यात पुन्हां वाढली.

| वर्ष | वजन ( लाख टन ) | किंमत ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | ९·७७ | ३·४१ |
| १९५१–५२ | २३·९४ | ७·८१ |
| १९५२–५३ | २०·८१ | ७·५९ |
| १९५३–५४ | ११·८१ | ४·१४ |


# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

श्री. गंगाराम सिद्राप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.

न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले.

श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी.

श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर.

एन्. व्ही. पांडव, मॅनेजर

# महाराष्ट्रांतील सहकारी साखर कारखाने

## अनुकूल वातावरणाचा फायदा घेण्यासाठी पद्धतशीर प्रयत्नांची आवश्यकता

(एक माहितगार सहकारी कार्यकर्ता)

सहकारी साखर--कारखान्यांबाबतच्या निरनिराळ्या प्रश्नांवर अद्याप वर्तमानपत्रांतून उलट-सुलट चर्चा चालूं असली तरी सुरुवातीची याबाबतची गोंधळाची परिस्थिति आतां राहिलेली नाहीं, हें निर्विवाद आहे. सहकारी कारखाने रजिस्टर करून घेण्यासाठीं लागणारे किमान भांडवल जमा करण्याचे जारीचे प्रयत्न प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या बिनसरकारी समितीमार्फत चालूं असतांनाच मुंबई सरकारनें (४ मंत्री व ३ बिनसरकारी सभासद अशा ७ सभासदांची अशी) एक अधिकृत समिति नेमली असून, एका डेप्युटी रजिस्ट्रारची या कामासाठीं खास नेमणूक केली आहे. या सरकारी समितीनें एक अधिकृत पत्रक काढून सरकारी धोरणाचें जें दिग्दर्शन केलें आहे त्यामुळें शेतकऱ्यांच्या शंकाकुशंकांचें निरसन होण्यास पुष्कळच मदत झाली आहे. कांहीं मंत्री व सरकारी अधिकारी यांनीं चुकीच्या अगर अपुऱ्या माहितीच्या आधारावर केलेलीं भाषणें व दिलेलीं आश्वासनें साखर कारखाने काढूं इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनीं आतां साफ विसरून जावींत व नव्या सरकारी धोरणाबाबत विशेष गैरसमज शेतकऱ्यांत पसरूं नये असें वाटत असल्यास, सरकारी अधिकाऱ्यांनीं धोरणाचा खुलासा करण्यासाठी म्हणून व्याख्यानें देण्याच्या भरीस न पडतां सरकारी पत्रकाच्या हजारों (मराठी) प्रती शेतकऱ्यांत प्रसृत कराव्यात.

### नवे कारखाने सहकारी तत्त्वावरच पाहिजेत

साखर कारखान्यांच्या अर्जांची छाननी होऊन ज्यांना भारत सरकारच्या लायसेन्सिंग सब-कमेटीकडून मशिनरी आयात करण्याचे परवाने मिळतील त्यांच्याच अर्जांचा मुंबई सरकारकडून विचार करण्यांत येईल, असें सरकारी पत्रकांत स्पष्ट करण्यांत आलें आहे. यामुळें परवाने देणाऱ्या या उपसमितीकडे शेतकऱ्यांचे डोळे लागले आहेत. सध्यां ही समिति महाराष्ट्रांतील आपलें काम पुरें करीत असून तिच्यांतील कांहीं सभासदांच्या उद्गारामुळें सहकारी कारखान्यांच्या अर्जांचें काय होणार अशी शेतकऱ्यांना भीति वाटूं लागली आहे. सहकारी साखर कारखान्यांबाबतचें मुंबई सरकारचें धोरण स्पष्ट आहे. त्याच धोरणाला चिकटून राहून, सहकारी कारखान्याशिवाय इतर भांडवलदारांचे कारखाने नव्यानें निघण्यास किंवा जुने वाढविण्यास सरकारानें विरोध केला पाहिजे. कारण, भांडवलदारांचे नवे कारखाने निघावयाचे झाल्यास किंवा जुने वाढवावयाचे झाल्यास त्यांना पुरेशा प्रमाणांत ऊंस मिळेल अशी व्यवस्था करावी लागेल. शेतकऱ्यांकडून अशा कारखान्यांना पुरेशा प्रमाणांत जमिनी विकत मिळतील हें संभवत नाहीं. तसेंच भांडवलदारांच्या कारखान्यांनीं खंडानें घेतलेल्या जमिनीबाबत कशा तऱ्हेचे भांडणतंटे पुढें उपस्थित होतात हें बेलापूर, महाराष्ट्र व फलटण साखर कारखान्यांबाबतच्या अलीकडील आंदोलनावरून कोणाच्याहि चटकन लक्षांत येईल. तिसरा पर्याय, उत्तर प्रदेश व बिहारप्रमाणें शेजारच्या विशिष्ट कारखान्यांना उंस पुरविण्याबाबत शेतकऱ्यांवर सक्ति करण्याचा-याहि बाबतींत, उंसाच्या किंमतीसाठीं तिकडे वारंवार निर्माण होणाऱ्या कटकटी सर्वांच्या चांगल्या परिचयाच्या आहेत. महाराष्ट्रांतील ऊंस पिकविणारा शेतकरी आपल्या हक्काबाबत आतां चांगलाच जागृत झालेला असल्यामुळें तो अशा तऱ्हेची सक्ति निमूटपणें सहन करीलसें दिसत नाहीं. तेव्हां, दुसऱ्या कशासाठी नसलें तरी, साखरेचें उत्पादन या भागांत वाढवावयाचें झाल्यास व औद्योगिक क्षेत्रांतील शांतता वारंवार भंग पावावयाची नसल्यास, महाराष्ट्रांतील यापुढील साखर कारखाने सहकारी पद्धतीवरच काढतां येतील हें स्पष्ट आहे. सामाजिक उद्दिष्टाच्या दृष्टीनेंहि तसें करणें आवश्यक आहे.

आज १८-१९ सहकारी कारखान्यांनीं मशिनरीसाठीं परवाने मिळावेत म्हणून भारत सरकारकडे अर्ज केले आहेत. भांडवलाची जमवाजमव, निश्चित क्षेत्रमर्यादा, वगैरे बाबतींत यांपैकी अनेकांची म्हणावी तशी प्रगति झालेली नाहीं. अर्थात्, सरकारी नियमाप्रमाणें (मशिनरीचा परवाना मिळाला तरी) त्यांना १८ महिन्यांत साखरेचें उत्पादन सुरू करतां येणार नाहीं, हें उघड आहे.


खास दिवाळीकरितां




अन्नाचें रहस्य

बेडेकर मसाले, लोणचीं, पापड

ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकूरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

याचा अर्थ त्यांना एकदम परवाने मिळणें शक्य व योग्य नाहीं. यासाठी, मुंबई सरकारनें सर्व अर्जांची छाननी करून, वरील सरकारी अट पुरी करण्याइतपत भांडवलाची वगैरे तयारी करतां येईल अशी ज्यांचेविषयीं खात्री वाटत असेल त्यांनाच परवाने मिळावेत, अशी शिफारस भारत सरकारच्या उपरिनिर्दिष्ट उपसमितीकडे करावी.

### भांडवल उभारणीस प्राधान्य द्या

१९५५–५६ सालीं साखर कारखाना निघाला नाहीं तर पुढें तो निघूंच शकणार नाहीं, असें शेतकऱ्यांनीं समजण्याचें कारण नाहीं. देशांतील साखरेची वाढती गरज पाहतां, या धंद्यास एक दोन वर्षांनंतर लागलीच मंदी येईल असेंहि मानण्याचें कारण नाहीं. तेव्हां शेतकऱ्यांनीं व सहकारी क्षेत्रांतील कार्यकर्त्यांनीं येत्याच्या व पुढील वर्षाच्या अशा दोन गुळाच्या हंगामांत जास्तीतजास्त प्रयत्न करून, सरकारी पत्रकांत दिल्याप्रमाणें ६०० ते ८०० टनांच्या कारखान्यांसाठीं १५ लाख रुपये व ८०० ते १,००० टनांसाठीं २० लाख रुपये भांडवल जमा करावें. दरम्यान मुंबई सरकारनें भांडवलाबाबतची सवलत अजून दोनतीन वर्षे चालू राहील व मशिनरीचा परवाना मिळवून देण्याबाबत आपण प्रयत्न करूं असें जाहीर करावें. असें झाल्यास यांमुळें उत्पन्न होणारे अनेक दोष व चुका सुरवातीपासून कटाक्षानें टाळतां येतील आणि शेतकरी व सहकारी कार्यकर्ते निश्चिंतपणें भांडवल जमा करण्याच्या खटपटीस लागतील.

साखर कारखाने सहकारी पद्धतीवर चालूं शकतील किंवा कसें याबाबतच्या शंका कांहीं लोक अजाणतां अगर बुद्धिपुरःसर करीत आहेत. या बाबतींत जर कोणास खरोखरी तात्त्विक अगर व्यावहारिक शंका असतील तर त्यांनीं प्रवरा सहकारी साखर कारखान्यास जातीनें भेट देऊन तेथील कार्यपद्धति बारकाईनें अवलोकन करून, त्यांचें निरसन करून घ्यावें. तसेंच, किती टनाचा कारखाना किफायतशीर होऊं शकेल असा एक मुद्दा उपस्थित करण्यांत येत आहे. ह्या तांत्रिक प्रश्नावर सरकारी समितीनें विचार करून आपलें मत दिलें आहे. तेव्हां, या अगर असल्या प्रश्नांकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांनीं आणि सहकारी कार्यकर्त्यांनीं आपलें मन विचलित होऊं देऊं नये. साखर धंद्यास फार मोठें भांडवल लागतें व तें जास्तींत जास्त जमविण्याकडे त्यांनीं पद्धतशीरपणें आपलें सर्व लक्ष केंद्रित करावें. यापुढें जिल्ह्यांतील मध्यवर्ति सहकारी बँका या प्रश्नांत जास्त लक्ष घालतील असें समजण्यास हरकत नाहीं. त्यांना तसें करणें शक्य नसल्यास किंवा ऊंस पिकविण्यास आणि कारखाना चालविण्यासाठी पुरेसें भांडवल पुरविणें त्यांच्या आवाक्याबाहेर असल्यास, मुंबई राज्य सहकारी बँकेनें त्यांत लक्ष घालावें असें सरकारी पत्रकांत म्हटलें आहे, तें योग्यच आहे. खरी अडचण सहकारी कारखान्यांच्या कार्यक्षेत्रमर्यादा, कारखान्याची जागा, वगैरे तपशिलाच्या बाबी ठरविण्याबाबत उपस्थित होईल. पण याहि बाबतींत, सरकारनें साखर कारखान्यासाठी म्हणून नेमलेले खास डेप्युटी रजिस्ट्रार किंवा मध्यवर्ति (बिनसरकारी) समितीचे सेक्रेटरी यांचेकडून जरूर ती सर्व मदत आणि मार्गदर्शन करण्यांत येणार आहे. आशा आहे कीं, सरकारी धोरणाप्रमाणें मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या मदतीचा फायदा घेण्यासाठी सहकारी कार्यकर्ते व शेतकरी पद्धतशीरपणें सतत प्रयत्न करतील व पुढील २–३ वर्षांत महाराष्ट्रांत सहकारी पद्धतीवर निदान १०–१२ साखरकारखाने चालतील.





फो. नं. ४२४८४ [ तार : माधवाश्रम, बॉम्बे

**माधवाश्रम लि.**

**भोजनाची व रहाण्याची उत्कृष्ट सोय**

तसेंच ★ उपाहाराची खुल्या बगीच्यांत व्यवस्था.
★ विवाह-कार्याची थोड्या खर्चांत सर्व प्रकारची उत्तम सोय.
★ कुटुंबासह रहाणारांसाठीं स्वतंत्र खोल्या.

★ माधवाश्रम लि., गिरगांव मुंबई ४ ★

दिनांक २७–१०–५४ ला प्रसिद्ध होणार

**व्याजआकारणीचें पुस्तक**

( विस्तृत जंत्रीसह )

लेखक व प्रकाशक :–कृष्ण गोपाळ घाटपांडे,
( बँक एजंट, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. )
मिळण्याचें ठिकाण :–वडगांव स्टेशन (मध्यरेल्वे) जि. पुणें.

मूल्य :—दोन रुपये. टपालखर्च निराळा.
( बुकपोस्ट तीन आणे; रजिस्टर्ड बुकपोस्ट आठ आणे )

या पुस्तकाचे पहिल्या भागांत व्याज आणि कच्चे यांच्या आवश्यक अशा कायदेशीर माहितीसह कच्चे काढण्याच्या व व्याज आकारण्याच्या रीतींची संपूर्ण माहिती दिलेली असून व्याज आकारण्याच्या प्रत्येक प्रकाराचें एक एक उदाहरण खुलाशासह संपूर्णपणें सोडवून दाखविलेलें आहे. दुसऱ्या भागांत पावपैपासून रु. १८–१२–० पर्यंत व्याजाचे ५० दर असलेली आणि एक कोटी कच्च्यापर्यंत व्याजआकारणी असलेली विस्तृत जंत्री आहे. त्यामुळें सहकारी सोसायट्या, बँका आणि व्याजाचा संबंध असलेल्या सर्व लहानमोठ्या कंपन्या व सावकार यांना हें पुस्तक अत्यंत उपयुक्त असें आहे. पुस्तकाबद्दल ऑडिटर आणि इतर तज्ज्ञ यांनीं दिलेले अभिप्राय पुस्तकांत मुद्रित केले आहेत.

# पाकिस्तानांतील बँकिंग

पाकिस्तानाचे दोन भाग आहेत. त्यांपैकी पश्चिम पाकिस्तानचें क्षेत्रफळ ३,००,००० चौरस मैल असून त्याची लोकसंख्या ३·४ कोटी आहे, आणि पूर्व पाकिस्तानचें क्षेत्रफळ ५४,००० चौरस मैल असून त्याची लोकसंख्या ४·६ कोटी आहे. ३ जून, १९४७ रोजीं भारताच्या फाळणीची योजना जाहीर झाली व १४ ऑगस्ट रोजीं पाकिस्तान हें स्वतंत्र राष्ट्र बनलें. ३० सप्टेंबर, १९४८ अखेर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ह्याच संस्थेनें भारतांत व पाकिस्तानांत काम करावें, असें ठरलें.

### स्टेट बँक ऑफ पाकिस्तान

तथापि, दोन्ही राष्ट्रांतील राजकीय तेढ वाढत जाऊन, दोन्हीं देशांनीं असें ठरविलें कीं १ जुलै, १९४८ पासूनच रिझर्व्ह बँकेचा पाकिस्तानांतील व्यवहार बंद करण्यांत यावा. पाकिस्तान सरकारनें पूर्ण विचार करून 'स्टेट बँक ऑफ पाकिस्तान' स्थापन करण्याचें ठरविलें. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नोकरवर्गास कोणताहि देश नोकरीसाठी निवडण्याची मुभा दिलेली होती. परंतु, फारच थोडे अनुभवी अधिकारी पाकिस्तानांत नोकरीसाठी जाण्यास तयार झाले. तथापि, ठरल्या दिवशीं, १ जुलै, १९४८ रोजीं दि स्टेट बँक ऑफ पाकिस्तानची स्थापना करतां आली.

दि स्टेट बँक ऑफ पाकिस्तानचें वसूल भांडवल ३ कोटी रुपये असून त्यांपैकी ५१% सरकारचें आहे. खाजगी भागिदारांपैकी बहुतेक भागीदार कराची आणि लाहोर येथीलच आहेत; डाक्का येथीलहि बरेच भागीदार आहेत. कराची म्युनिसिपल कॉर्पोरेशननें कराची येथील व्हिक्टोरिया म्युझियम स्टेट बँकेच्या मध्यवर्ती कचेरीच्या कामकाजासाठी दिला आहे. बँकेच्या डायरेक्टर बोर्डांत गव्हर्नर, डेप्युटि गव्हर्नर, सहा सरकार-नियुक्त डायरेक्टर (त्यांपैकी निदान एक सरकारी अधिकारी) व तीन भागिदारांनीं निवडलेले डायरेक्टर, असे सभासद असतात.

फक्त सेंट्रल बँकेसच चलनी नोटा काढण्याचा अधिकार आहे. नोटांच्या ३०% एवढी जिंदगी सोनें, चांदी किंवा मान्य असलेली परदेशी हुंडणावळ ह्यांत गुंतविलेली असली पाहिजे व बाकीच्या जिंदगींत रुपये, रुपयांत परतफेडीचे रोखे व कांहीं प्रकारच्या हुंड्या व प्रॉमिसरी नोटा ह्यांचा समावेश होतो. स्टेट बँकेंत इश्यू खातें व बँकिंग खातें अशीं दोन खातीं आहेत.

बँकांवर नियंत्रण ठेवण्याचे व्यापक अधिकार स्टेट बँकेला कायद्यानें दिलेले आहेत. (अ) प्रत्येक शेड्यूल्ड बँकेनें आपल्या डिमांड देण्याच्या ५% व टाइम देण्याच्या २% रक्कम स्टेट बँकेंत ठेवली पाहिजे. (ब) प्रत्येक बँकेनें एकूण टाइम व डिमांड देण्याच्या २०% रक्कम रोख, सोनें किंवा तारण न दिलेल्या व कायद्यास मान्य अशा रोख्यांत ठेवली पाहिजे. (क) प्रत्येक बँकेनें तिच्या पाकिस्तानांतील टाइम व डिमांड देण्याच्या ८५% रक्कम पाकिस्तानांतील जिंदगींतच ठेवली पाहिजे. बँकिंग कंपन्यांना धोरणविषयक सूचना देण्याचा अधिकार स्टेट बँकेला आहे. नवी कचेरी उघडण्यास किंवा जुन्या कचेरीची जागा बदलण्यास स्टेट बँकेची परवानगी लागते. बँकरेट प्रारंभापासून ३% कायम आहे. पाकिस्तान इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाचें व जागतिक बँकेचें सभासद आहे.

### "मनी मार्केट" व "ओपन मार्केट ऑपरेशन्स"

पाकिस्तानांत "मनी मार्केट"ची वाढ फारशी झालेली नाहीं. 'बिल मार्केट' हि जवळ जवळ नसल्यासारखेंच आहे. ओपन मार्केट ऑपरेशन्सचा पाया म्हणून, सरकारी रोख्यांचा बाजार निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. पाकिस्तानांतील स्टॉक एक्सचेंजवर फारच थोडे व्यवहार होतात. बँका व इतर पतसंस्था हेंच मुख्य गिऱ्हाईक आहे; आतां मध्यमवर्गाकडूनहि रोख्यांना हळूहळू मागणी येऊं लागली आहे. पाकिस्तानांतील व्यापार बहुंशीं मोसमी स्वरूपाचा आहे. ऑगस्ट ते मार्च ह्या तेजीच्या मोसमांत बँका त्यांचे उपलब्ध पैसे गुंतवूं शकतात, पण मंदीच्या मोसमांत बँकाजवळ रोकड पैसा साठतो. पैशाला मागणी असते, त्यावेळीं स्टेट बँक बँकांकडून रोखे विकत घेते व त्यांना पैसे उपलब्ध करून देते; त्यांचेजवळील रोकड वाढली कीं त्यांना पुन: रोखे विकते. दलालांमार्फत सर्व व्यवहार होतात आणि अजून ह्या व्यवहारांचें प्रमाण फार माफकच आहे. पैसे गुंतविण्यास ट्रेझरी बिलें हें बँकांना फार सोइस्कर साधन आहे.

### जॉइंट स्टॉक बँका

पाकिस्तानांतील व्यापारी बँकांचे तीन गट पडतात. (१) भारत वगळून इतर विदेशी देशांत स्थापन झालेल्या एक्सचेंज बँका, (२) हिंदी बँका व (३) पाकिस्तानी बँका. पहिल्या गटांत लॉइड्स बँक लि., ग्रिंडलेज बँक लि. व चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायना ह्यांचा समावेश होतो. हिंदी बँकांत इंपीरियल बँक ऑफ इंडिया व सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ह्या प्रमुख आहेत. हबीब बँक लि., मुस्लिम कमर्शिअल बँक लि. आणि सरकार-पुरस्कृत दि नॅशनल बँक ऑफ पाकिस्तान, ह्या बँका पाकिस्तानी बँकांत प्रमुख आहेत.

२०६ शाखा असलेल्या ३२ शेड्यूल्ड बँकांपैकी १२२ शाखा असलेल्या ५ शेड्यूल्ड बँका पाकिस्तानी आहेत.

### पाकिस्तानची आर्थिक परिस्थिति

पाकिस्तान हा शेतीप्रधान देश आहे आणि पैसा देणारीं मुख्य पिकें म्हणजे पश्चिम पाकिस्तानांतील कपास आणि पूर्व पाकिस्तानांतील ज्यूट व चहा हीं पिकें होत. येत्या कांहीं वर्षांत पाणी पुरवठ्याच्या योजना पुऱ्या होऊन आणि शेतीची पद्धत सुधारून, पाकिस्तान अन्नाचे बाबतींत स्वयंपूर्ण होईल व पंजाबमधील गहूं निर्गत करतां येईल अशी अपेक्षा आहे. औद्योगीकरणाच्या प्रचंड योजना आखण्यांत येत आहेत आणि कोळशाच्या तुटवड्यावर इलाज म्हणून हैड्रो-इलेक्ट्रिक व थर्मल वीजकेंद्रें उभारण्याचे बेत करण्यांत

टे. नं. ६०४२८
वामन गणेश हरचेकर
चांदी, सोनें, मोत्यें व जवाहिरांचे व्यापारी.
केळकर रोड, दादर, मुंबई नं. १८
यांजकडून
अभीष्ट चिंतन
चालू दीपावलि व नूतन संवत्सर
सर्व भारतीयांना सुखाचें व भरभराटीचें जावो.

येत आहेत. बलुचिस्तान मधील सुइ (Sui) गॅस योजना सिंधच्या व जवळच्या पंजाबमधील प्रदेशाच्या विकासास बरीच चालना देईल असा अंदाज आहे.

**बँकांनीं दिलेलीं कर्जें**

(१) ३० जून, १९५३ रोजीं एकूण बँक कर्जें ६३,०५,००,००० रु. ची होतीं.

(२) प्रत्येक बँकेनें दिलेल्या कर्ज रकमेची सरासरी १,६०,८०,००० रु. होती.

(३) ६५·३८% कर्जें पश्चिम पाकिस्तानांत व ३४·६२% कर्जें पूर्व पाकिस्तानांत दिलेलीं होतीं.

(४) दिलेल्या कर्जांची फोड अशी:—पाकिस्तानांत स्थापन झालेयल बँका ४४·९% भारतांत स्थापन झालेल्या बँका २५·१%, भारत सोडून इतर परदेशांत स्थापन झालेल्या बँका ३०%.

(५) व्यापाराला दिलेलीं कर्जें एकूण कर्जांच्या ४२ भरलीं.

(६) विमा कंपन्यांना फक्त ५४,००० रु. कर्ज दिलेलें होतें.

(७) शेती हाच पाकिस्तानमधील मुख्य व्यवसाय आहे. तेथील राष्ट्रीय उत्पादनाच्या दोन-तृतीयांश उत्पादन शेतीचें असून ८० टक्के प्रजा शेतींत गुंतलेली आहे. सर्व बँकांनीं शेती-व्यवसायास दिलेल्या कर्जांची बेरीज ९,४९,००,००० रु. होती.

(८) बँकांनीं ज्या तारणावर कर्जें दिलीं, त्या तारणांपैकी ७०·६४ तारण मालाचें होतें. त्यांपैकी ६८·३% माल निर्गती-साठी होता.

(९) बँकांनीं त्यांच्या डिमांड व टाईम देण्याच्या ४२% रक्कम कर्जाऊ दिलेली होती.

(१०) मालमत्तेच्या तारणावर फारच थोडीं कर्जें दिलेलीं होतीं.

(११) तारण नसलेलीं कर्जें जवळजवळ नव्हतींच.


तुम्हीं खरेदी केलींत काय?

दशवार्षिक नॅशनल प्लॅन सर्टिफिकेटस्

मुदत भरल्यावर ४½ टक्के प्राप्तीवरील करमाफ व्याज

आतांच हें करा

भारताच्या विकासाकरितां तुम्हीं हें भांडवल गुंतवित आहां

- २५ रुपयांपासून तों १००० रुपयांपर्यंत आणि संयुक्तपणें २००० रुपयांपर्यंत तुम्हीं खरीदूं शकतां.
- मुदत भरल्यावर दर साल दर शेंकडा ४½ टक्के दरानें प्राप्तीवरील करमाफ व्याज.
- एक वर्षानंतर केव्हांही रोख रक्कम मिळूं शकते. पण मुदत भरेपर्यंत थांबणें चांगलें.

अधिक माहितीकरितां पुढील ठिकाणीं चौकशी करा —

कोणतेंही पोस्ट ऑफिस.
नॅशनल सेव्हिंग्ज ऑर्गनायझेशनचा कोणताही अधिकृत एजंट किंवा ऑर्गनायझर.
धी रिजनल नॅशनल सेव्हिंग्ज ऑफिसर.

AC.588

भारताच्या भवितव्यांत पैसे गुंतवा

### पोस्टऑफिस सेव्हिंग्ज बँक अकाउंटस

पोस्टांत पैसे ठेवा, नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें घ्या, असा प्रचार करूनहि त्याचा फारसा उपयोग झालेला नाहीं. पो. ऑ. सेव्हिंग्ज बँकेंत जून १९५३ अखेर ३० कोटी रु. होते व नॅ. से. सर्टिफिकेटांत १३½ कोटी रु. गुंतविलेले होते.

### सहकारी बँका

फाळणीनंतर, व्यापारी बँकांचे व्यवहार स्थगित झाले व हिंदू सावकार नाहींसे झाले; त्यामुळें सहकारी बँकांवरील कामाचा बोजा वाढला. वायव्य सरहद्द प्रांतांत आणि पश्चिम पंजाबांत सहकारी बँकांनीं सरकारच्या ट्रेझरींचें काम करण्यास प्रारंभ केला. पिकांच्या खरेदीस त्यांनीं पैसा पुरवला आणि साखर, कापड, इत्यादि नियंत्रित जिनसांच्या वाटपाचें काम केलें. ग्रामोद्योगासहि त्यांनीं साहाय्य केलें. तथापि, मध्यवर्ती सहकारी बँका शेतकऱ्यांना पुरेशीं कर्जे न देतां व्यापारी बँकिंगचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर करूं लागल्या आहेत. भांडवल पुरवठ्याचे अभावीं, शेतीच्या व्यवसायाचें पाऊल पुढें पडत नाहीं. व्यापारी बँकांचा खेडेगावांतून प्रवेश झालेला नाहीं आणि नव्यानेंच स्थापन केलेल्या ॲग्रिकल्चरल डेव्हलमेंट फायनान्स कॉर्पोरेशनची प्रगति अद्याप मंदच आहे. पाकिस्तानमधील सहकारी चळवळीची १९५२ मधील स्थिति दर्शविणारे आंकडे खाली दिले आहेतः—

**सोसायट्यांची संख्या**

| प्रांतिक बँका | सेंट्रल बका | बँकिंग युनियन्स | प्राथमिक सोसायट्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| ४ | ११३ | २० | ३८,४५२ | ३८५४९ |

**सभासद**

| व्यक्ति | सोसायट्या | एकूण | एकूण खेळतें भांडवल |
|---|---|---|---|
| ३१,०१,१७१ | ४७,१६६ | ३१,४८,३३७ | ४२,३०,००,४१८ रु. |

### उद्योगधंद्यांना भांडवलाची मदत

ग्रामोद्योगांना मध्यम व अल्प मुदतींचीं कर्जे देणाऱ्या व्यवस्थेचा अभाव पाकिस्तानांत जाणवत आहे. व्यापारी बँका उद्योगधंद्यांना कर्जे देत नाहींत, परंतु औद्योगिक विकासासाठीं भांडवल पुरविण्याकरितां खास संस्थांचा सरकारनें पुरस्कार केलेला आहे. पाकिस्तान इंडस्ट्रिअल फिनान्स कॉर्पोरेशन आणि पाकिस्तान इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ह्या त्यांपैकीच संस्था होत. फिनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड कंपन्यांना, सहकारी सोसायट्यांना आणि व्यक्तींना सुद्धां कर्जे देतें; तिनें जून, १९५३ अखेर ३·५६ कोटी रु. चीं कर्ज मंजूर केलेलीं होतीं. डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन औद्योगिक कंपन्यांना कर्जे न देतां स्थायी स्वरूपाचें भांडवल पुरवितें.

### बँकिंगच्या वाढीस अनुकूल बाबी

पाकिस्तानांतील बँकिंगच्या पद्धतींत सुधारणा होण्यास पुष्कळच वाव आहे, आणि प्रगतीचा वेग वाढणें जरूर आहे. पाकिस्तानी बँका नव्या शाखा उघडीत आहेत, पाकिस्तानबाहेरहि कांहीं शाखा त्या स्थापीत आहेत. कोलंबो योजनेखालील मदत, पाश्चात्य राष्ट्रांची मदत आणि जागतिक बँकेची मदत, ह्यांची बरीज बरीच मोठी आहे आणि देशाच्या विकासाबरोबर पैसे गुंतविण्यास वावहि वाढणार आहे. तज्ज्ञ नोकरवर्गाची चणचण कमी झाली आहे. अशा रीतीनें, पाकिस्तानांत बँकिंगच्या प्रगतीला परिस्थिति अनुकूल आहे.


# दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

# रामतीर्थ ब्राम्ही तेल

स्पेशल नं. १

( आयुर्वेद औषधीयुक्त )



ज्ञानतंतु व क्रिया बलवान बनवतें. केंस काळे आणि मजबूत होतात. खाडा बंद होतो. टक्कल पडलेल्या जागीं पुन्हां केस येतात. खवडे, उवा, लिखा यांचा नाश होतो. स्मरणशक्ति वाढते. कानांत टाकल्यानें कानाचे रोग नाहींसे होतात. गाढ झोंप लागते.

सर्व ऋतूंत सर्वांना उपयोगी· सर्वत्र मिळतें.

मोठी बाटली रु. ३-८-०

लहान बाटली रु. २-०-०

**आसन चित्रपट**

शरीर सशक्त आणि निरोगी ठेवण्यासाठी आजच रु. १-१२-० मनिऑर्डरनें पाठवून आकर्षक आसन-चित्रपट आमचेकडून मागवा.

## श्री रामतीर्थ योगाश्रम

दादर, मुंबई नं. १४

ही दीपावलि आमचे भागीदारांना व खातेदारांना सुखसमृद्धीची जावो

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

: संचालक मंडळ :

श्री. वा. पुं. वर्दे, (अध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे
श्री. मा. रा. जोशी
श्री. मा. वी. शहा
श्री. मा. म. गुप्ते
श्री. श्री. गो. मराठे, (उपाध्यक्ष)
श्री. न. ग. पवार
श्री. फ. दो. पदमजी
श्री. शं. ल. किर्लोस्कर

: बँकेच्या नव्या शाखा :

पुढील सहा ठिकाणीं बँकेनें नवीन शाखा सुरू केल्या आहेत.

(१) जव्हेरी बाजार, मुंबई (२) भिवंडी (३) पनवेल
(४) भवानी पेठ, पुणें (५) अहमदनगर (६) श्रीरामपूर.

मुख्य कचेरींत व पुणें डेक्कन जिमखाना शाखेंत सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्.

: मुख्य कचेरी :
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर.


# धी बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन — श्री. रमणलाल जी. सरैया, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल—भागीदारांतर्फें रु. ३४,४७,१०० मुंबई सरकारतर्फें रु. २६,००,००० | रु. | ६०,४७,१०० |
| गंगाजळी व फंड .... .... .... | रु. | ५७,२१,९०० |
| ठेवी .... .... .... | रु. | ८,९८,११,६०० |
| खेळतें भांडवल .... .... .... | रु. | १२,१७.०३,००० |

**१४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते.
सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीसाठी चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

# भारतीय शेतीच्या उत्पादनांतील वाढ

## नव्या इंडेक्स नंबरांचा उद्बोधक निष्कर्ष

१९४९ मध्यें शेतीच्या उत्पादनाचे इंडेक्स नंबर तयार करण्यांत आले, त्यांत १९ प्रमुख जिनसांचा विचार केलेला होता. १९३८–३९ अखेरच्या पांच वर्षांचे आकडे त्यास आधार ( = १०० ) घेतलेले होते. तेव्हांच्या मानानें पिकांचे अंदाज पुष्कळच सुधारलेले व व्यापक झालेले असल्यानें आतां नवे इंडेक्स नंबर बनविण्यांत आले आहेत:—

**१ कोणत्या पिकांचा विचार केलेला आहे ?**

( अ ) अन्नधान्यें :—

( १ ) धान्यें—तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका, रागी, गहूं, बार्ली व इतर धान्यें.

( २ ) डाळी—हरबरा, तूर, इतर डाळी.

( ब ) बिगर–अन्नधान्यें: —

( १ ) तेलबिया—भुइमूग, तीळ, सरसू, तुरी, एरंडी.

( २ ) तंतू—कपास, ज्यूट,

( ३ ) मळ्यांतील पिकें—चहा, कॉफी, रबर.

( ४ ) इतर पिकें—ऊंस, मिरे, बटाटे, सुंठ, मिरच्या.

तत्त्वतः शेतीच्या उत्पादनाच्या इंडेक्स नंबरांत शेतीचीं सर्व पिकें व जनावरांपासून मिळणारे पदार्थ ह्यांचा समावेश व्हावयास पाहिजे. परंतु त्या सर्वांचे वार्षिक उत्पादनाचे आंकडे मिळणें कठीण असल्यानें, नव्या इंडेक्स नंबरांत २५ पिकें समाविष्ट केलेलीं आहेत.

**२ आधारभूत वर्ष**

१९४९–५० हें वर्ष आधारभूत धरण्यांत आलें आहे. शेतीच्या उत्पादनाचें तुलनेसाठी आधारभूत वर्ष म्हणून पंचवार्षिक योजनेंत त्या वर्षाचीच निवड केलेली आहे.

**३ कांहीं मालाला दिलेलें जादा महत्त्व**

१९४९–५० ह्या वर्षी वेगवेगळया मालाच्या उत्पादनाची जी एकूण किंमत झाली, त्या प्रमाणांत त्यांना जादा महत्त्व दिलेलें आहे. उदाहरणार्थ, उत्पादनाच्या एकूण किंमतींत तांदुळाची ३५·३%, गव्हाची ८·५%, बाजरीची २·७%, तुरीची १·१%, भुईमुगाची ५·७%, कपाशीची २·८%, चहाची ३·३%, उंसाची ८·७%, बटाट्याची १% आणि सुंठेची ०·३% भरली. त्यामानानें त्यांचें महत्त्व कमी–जास्त केलेलें आहे.

**४ १९४९–५० ते १९५३–५४ मधील उत्पादनाची दिशा**

उत्पादनाचे इंडेक्स नंबर

| | अन्नधान्यें | बिगर-अन्नधान्यें | सर्व जिनसा |
|---|---|---|---|
| १९४९–५० | १००·० | १००·० | १००·० |
| १९५०–५१ | ९०·५ | १०५·९ | ९५·६ |
| १९५१–५२ | ९१·२ | ११०·२ | ९७·४ |
| १९५२–५३ | १०१·१ | १०३·७ | १०२·७ |
| १९५३–५४ | ११६·१ | १०८·२ | ११३·५ |

१९४९–५० ते १९५३–५४ ह्या मुदतींत एकूण शेतीचें उत्पादन १३·५% वाढलें आहे. १९५०–५१ व १९५१–५२ मध्यें अवर्षण, अतिवर्षण, पूर, इत्यादींमुळें उत्पादन घटलें, पण बिगर–अन्नधान्यांचें उत्पादन त्या मुदतींत वाढलें. अन्नधान्यांचें उत्पादन पुढें सुधारलें, पण बिगर-अन्नधान्यांच्या किंमती घटल्यामुळें त्यांचें उत्पादनहि कमी झालें. १९५३–५४ मध्यें दोन्ही प्रकारच्या उत्पादनांत वाढ झालेली आहे.

**५ निष्कर्ष**

( १ ) १९५३–५४ मध्यें तांदुळाचें उत्पादन १६% वाढलें, गव्हाचें ११% वाढलें. ज्वारी व बाजरी ह्यांच्या उत्पादनांत अनुक्रमें २४% व ३५% वाढ झाली.

( २ ) हरबऱ्याचें उत्पादन २०% सुधारलें.

( ३ ) तेलबियांत ४ ते २३% वाढ झाली. तेलबियांपैकी भुइमुगाचें उत्पादन १२% वाढलें.

( ४ ) कपाशीचें उत्पादन ५०% सुधारलें.

( ५ ) १९५१–५२ व १९५२–५३ मध्यें तागाच्या उत्पादनांत ५०% वाढ झाली. किंमती घसरल्यामुळें व प्रतिकूल हवामानामुळें १९५३–५४ मधील उत्पादन १९४९–५० च्या पातळीवर आलें.

( ६ ) उसाच्या उत्पादनानें १९५१–५२ मध्यें उच्चांक ( १२२% ) गांठला, पण पुढें तें उतरलें.

( ७ ) तंबाखूचें उत्पादन दरसाल कमीच राहिलें.

( ८ ) बटाट्यांचें उत्पादन हळुंहळू वाढत आहे.

रेखा फर्निशर्स
३२४, सदाशिव, पुणें.
सर्व प्रकारच्या सुबक फर्निचरचे
कारखानदार

दि इसलांपूर अर्बन को. बँक लि.
इसलांपूर ( जि. दक्षिण सातारा. )
स्थापना १९३५
अधिकृत भांडवल रु. ५०,०००
वसूल भांडवल रु. २५,४००
खेळतें भांडवल रु. १,६५,६९०
बँकिंगचे व्यवहार केले जातात.
मॅनेजर. चेअरमन
के. डी. बोरकर जी. एल्. फडणीस
बी. ए., एलएल. बी.,

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वात अधिक बोनस वाटणारी
महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी!!

## दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७
हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*
शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद
ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७१,६८००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट. | ,, | १-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. — शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., *चेअरमन*

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

१२५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार–SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी, मॅनेजर

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर. — श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

# भारताचे लष्करी उद्योगधंदे

भारत स्वतंत्र झाल्यापासून देशांतील लष्करी स्वरूपाच्या उद्योगधंद्यांनीं बरीच प्रगति केली आहे. तत्पूर्वी देशांत जे लष्करी उत्पादनाचे कारखाने होते, त्यांचें स्वरूप ब्रिटनच्या ह्या प्रकारच्या कारखानदारीला पूरक असें होतें. परकीय राजवटीनें आपला वारसा म्हणून ७–८ ऑर्डनन्स फॅक्टरीज मागें ठेवल्या. परंतु ह्या कारखान्यांतून किरकोळ प्रकारचें लष्करी उत्पादन होत असें. मुख्य यांत्रिक साहित्य ब्रिटनमधूनच आणावें लागे, इतकेंच काय, पण भारतांत लष्करी उत्पादनांत तरबेज असे तंत्रज्ञहि नव्हते. कारण, तंत्रज्ञांना लागणारी ड्राइंग्ज व डिझाइन्स सुद्धा भारतांत नव्हती. गेल्या महायुद्धांत भारतामधील लष्करी स्वरूपाच्या कारखान्यांत आणखी कांहीं नव्या कारखान्यांची भर पडली. तथापि, युद्ध बंद झाल्यावर त्यांना फारसें कामच उरलें नाहीं.

शस्त्रास्त्रें आणि दारूगोळा ह्यांच्या बाबतींत आपण स्वयंपूर्ण झालें पाहिजे हें भारतानें पहिल्यापासूनच ओळखलें आणि गेल्या सात वर्षांत त्या दृष्टीनें प्रयत्न करण्यांत आले. भारताची लष्करी कारखानदारी त्याच्या परदेशीय धोरणाच्या पलीकडे अर्थातच जाऊं शकत नाहीं. आक्रमणाचा प्रतिकार करणें येवढेंच भारताचें संरक्षण–विषयक धोरण आहे. अर्थात्, बाहेरून देशाला कितपत धोका आहे त्यावर ह्या कारखान्यांचें स्वरूप अवलंबून राहतें. भांडवलाचा अपुरा पुरवठा हीहि बाब महत्त्वाची आहे. देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सध्या मोठमोठ्या योजनांवर खर्च करण्यांत येत आहे. तेव्हा संरक्षणात्मक धंद्यांना पैसा अपुरा पडणें साहजिकच आहे.

### मशीनटूल प्रोटोटाइप फॅक्टरी

अंबरनाथ येथें ही फॅक्टरी १२ जानेवारी, १९५२ रोजीं सुरू करण्यांत आली. ऑर्डिनन्स फॅक्टरीजना यांत्रिक हत्यारें पुरविणें आणि नवीन शस्त्रास्त्रें व लष्कराचें साहित्य तयार करणें ह्या दृष्टीनें हें पहिलें महत्त्वाचें पाऊल टाकलें गेलें. ऑर्डिनन्स फॅक्टरीजना लागणाऱ्या यांत्रिक हत्यारांसाठी भारताला आतां परदेशाच्या तोंडाकडे कधीं पहावें लागणार नाहीं. ह्याच कारखान्याला जोडून आर्टिझन ट्रेनिंग स्कूल उघडण्यांत आलें आहे. ह्या शाळेंत ऑर्डिनन्स फॅक्टरीजना जो कुशल कामगार लागतो तो शिकवून तयार करण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

### हिंदुस्थान एअर क्रॅफ्ट

बंगलोर येथील ह्या कारखान्यांत एच. टी—१२ हें विमान बनविण्यांत आलें आहे. विमानांची चांचणी पुरी झाल्यावर लष्करी व नागरी उपयोगासाठी त्यांचें उत्पादन सुरू करण्यांत येईल. ह्याच कारखान्यांत जुळविण्यांत आलेलीं व्हॅम्पायर जातीचीं विमानें भारताच्या विमानदलांत आजाहि वापरण्यांत येत आहेत. विमानांचीं एंजिनें आणि इतर सुटे भाग हे तयार करण्याचे प्रयत्नहि चालूं आहेत. विमानांच्या बाबतींतहि स्वयंपूर्णता हेंच ध्येय ठेवण्यांत आलें आहे.

### भारत इलेक्ट्रॉनिक्स

हा कारखाना १९५६ सालीं उत्पादनास प्रारंभ करील. लष्कराला व इतर सरकारी खात्यांना जें बिनतारी व इलेक्ट्रॉनिक यंत्रसाहित्य लागतें त्याचें उत्पादन ह्या कारखान्यांत करण्यांत येणार आहे. कारखान्यासाठी एकूण ९·५ कोटी रुपये भांडवल लागेल. ह्या वर्षअखेर कुशल कामगार तयार करण्यासाठी एक शाळाहि उघडण्यांत येणार आहे. एका फ्रेंच कारखान्याकडून भारत सरकार सल्ला घेत आहे. कारखान्याची नोंद कंपनी-कायद्याखालीं करण्यांत आली असून तो व्यापारी पद्धतीनें बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या नियंत्रणाखालीं चालविला जाईल.

### इतर कांहीं कारखाने व संस्था

नवीन नवीन प्रकारचें लष्करी उपयोगाचें साहित्य व हत्यारें शोधून काढण्यासाठी संशोधनहि करण्यांत येतें. डिफेन्स सायन्स ऑर्गनायझेशन नांवाची संस्था हें काम करीत असतें. सध्या असलेले लष्करी कारखाने नाना प्रकारचीं हत्यारें व साधनें निर्माण


टि युनियन बँक ऑफ कोल्हापूर लि.
शिवाजी चौक, कोल्हापूर.




" आपल्या ठेवींचें संरक्षण करण्याचें काम असो, अगर गरजेच्या वेळीं पैशाच्या मदतीची अपेक्षा असो ... तुमच्या कोणत्याहि आर्थिक व्यवहाराकरितां वरील बँकेची निवड करणें आपणांस अभिमानाचें वाटेल याची आम्हांला खात्री आहे ! "

दी पैसाफंड शेतकी सहकारी बँक लिमिटेड
हुपरी ( जिल्हा कोल्हापूर )

| | | |
|---|---|---|
| शेअस | रु. | ५०,१३० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ९,०९० |
| खेळतें भांडवल | रु. | २,३३,०२६ |

" सभासदांच्या शक्य तों सर्व प्रकारच्या अडचणीसहकार्यानें दूर करण्याचा प्रयत्न, हें ह्या बँकेचें एक वैशिष्ट्य आहे. "

आ. बा. नाईक — मॅनेजिंग डायरेक्टर
एल. बाय. पाटील — चेअरमन

करीत आहेत. आधुनिक पद्धतीचीं गुंतागुंतीची लष्करी यंत्र-सामुग्री निर्माण करण्याच्या योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत.

### नागरी स्वरूपाच्या मालाचें उत्पादन

१९५३ च्या मे महिन्यांत देशांतील ऑर्डिनन्स फॅक्टरीजची कसून पहाणी करण्यांत आली. ज्या फॅक्टरीजमधून इतर सरकारी खात्यांना लागणारें व नागरी जीवनाला लागणारें सामान निर्माण करण्याइतकी उत्पादनक्षमता असेल त्यांनीं ती पूर्णपणें कामीं लावावी असें ठरविण्यांत आलें. तथापि, आणीबाणीच्या वेळीं पुन्हा संपूर्णपणें लष्करी उत्पादन चालूं करण्याची तरतूद करण्यांत आली आहे. १९५२–५३ सालीं ऑर्डिनन्स फॅक्टरीजनीं ७२·९ लाख रुपये किंमतीचे नागरी सामान तयार केलें. १९५४–५५ सालीं २·५ कोटी रुपये किंमतीचें सामान तयार होईल असा अंदाज आहे. कानपूर येथील हारनेस व सॅडलरी फॅक्टरीनें पोस्ट खात्याला लागणाऱ्या थैल्या तयार करून दिल्या. रायफलींच्या एका कारखान्यांत आतां शिकारीसाठी लागणाऱ्या ·३१५" बंदुका तयार होऊं लागतील. रेल्वेसाठी लागणारें कांहीं सामान धातूच्या व पोलादाच्या एका कारखान्यांत तयार करण्यांत येऊं लागलें आहे.

ऑर्डिनन्स फॅक्टरीजची कार्यक्षमता वाढविण्याच्या प्रश्नाचा भारतीय सरकार विचार करीत आहे. संरक्षण–खात्याला लागणारें विशेष प्रकारचें साहित्य जास्तींत जास्त प्रमाणांत आणि कमींत कमी वेळांत कसें उत्पन्न करावें आणि त्याचबरोबर जरूरीपेक्षा अधिक असलेली उत्पादनक्षमता वापरण्यासाठी कारखान्यांची पुनर्घटना कशी करावी, असा हा प्रश्न आहे. ऑर्डिनन्स फॅक्टरीजच्या कार्याची तपासणी करण्यासाठी सरदार बलदेवसिंग ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे. कमिटीनें सर्व ऑर्डिनन्स फॅक्टरीज डोळ्याखालून घातल्या आहेत. कमिटीचा अहवाल अद्याप तयार व्हावयाचा आहे.

### नवीन रेल्वेचा मार्ग

पुणें ते बेळगांव ह्या अरुंद रुळाच्या रेल्वे–रस्त्यावर रायबाग नांवाचें गांव आहे. ह्या ठिकाणापासून निपाणीपर्यंत नवीन रेल्वेचा रस्ता तयार करण्यांत येणार असल्याचें समजतें. निपाणी हें गांव मुंबई राज्यांतील तंबाखूच्या व्यापाराचें मोठें केंद्र आहे. नव्या रस्त्याच्या प्राथमिक पहाणीच्या कामाला चालू वर्षीं सुरवात होईल. रस्ता २८ मैल लांबीचा होईल.


## पुणें पीपल्स को–ऑपरेटिव्ह बँक लि.

२७०, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

सहकारी चळवळीशीं अनेक वर्षे ज्यांचा निकटचा संबंध आहे, अशा अनुभवी कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखालीं चाललेली एक नवीन सहकारी बँक.

सभासदांना व नाममात्र सभासदांना वेगवेगळ्या योजने-प्रमाणें रु. २५,००० पर्यंत व्यक्तिशः कर्ज देणारी पुणें शहरांतील ही एकच अर्बन बँक आहे. हिचा फायदा गरजूंनीं अवश्य घ्यावा.

**द. दि. चितळे**
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि इसलामपूर को-ऑपरेटिव्ह पीपल्स बँक लिमिटेड

उरुण-इसलामपूर. जि. द. सातारा.

स्थापना ४ मे, १९२६ र. नं. ५४०४

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. ३५,१७० |
| रिझर्व्ह फंड | रु. १७,०९७ |
| खेळतें भांडवल | रु. २,११,२६७ |
| इतर फंडस | रु. १४,३१४ |


आकर्षक व्याजाच्या दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. जास्त माहितीसाठी लिहा अगर भेटा.

**डी. डी. लाटकर** — मॅनेजर
**एम्. डी. पवार** — चेअरमन

## दि बेळगांव डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., बेळगांव

हेड ऑफिसः—१५०, भांदुरगल्ली, बेळगांव.

तारेचा पत्ता : ' डिसेंट बँक ' फोन नं. ८८



★ प्रगतीचें पाऊल ★

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | २०,००,००० |
| वसूल झालेलें „ | रु. | ११,२०,९५० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ७,२२,५३७ |
| ठेवी | रु. | १,०७,२२,४२२ |
| खेळतें भांडवल | रु. | १,४९,८०,२५२ |

या बँकेच्या सर्व ऑफिसिसमध्यें चालती, व सेव्हिंग्ज बँक ठेवी व एक महिन्यापासून दहा वर्षे मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. तसेंच सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

बेळगांव बझार व बैलहोंगल येथील शाखांमध्यें सुरक्षिततेसाठीं लॉकर्स मिळतात.

विशेष माहितीसाठीं बँकेच्या ऑफिसमध्यें चौकशी करावी.

**ही दिवाळी सर्वांस सुखाची व समृद्धीची जावो.**

**व्ही. सी. मेडलेरी** — मॅनेजर.
**पी. बी. उगरगोळ** — चेअरमन.

# महत्त्वाच्या जागतिक संघटना

१ BIS ( बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट्स, बेसल )—ह्या बँकेची स्थापना १९३० सालीं झाली. जर्मनीकडून घ्यावयाच्या नुकसानभरपाईची व्यवस्था करणें, त्याबद्दलचे पैसे देणें आणि मध्यवर्ती बँकांच्या व्यवहारांत सहकार्य राखण्याचें काम करणें, असे तिचे हेतू होते. १९५० पासून युरोपिअन पेमेंटस् युनिअन ह्या संघटनेची एजंट म्हणून काम करते.

२ CCC ( कॉमॉडिटी क्रेडिट कॉर्पोरेशन, अमेरिका )—शेतीच्या मालाच्या किंमती प्रमाणाबाहेर घसरूं न देण्यासाठी अशा मालाची खरेदी करणें आणि त्यासाठीं कर्जे देणें ह्या दोन हेतूंनीं ही संघटना १९३३ सालीं स्थापण्यांत आली. संघटनेला जास्तींत जास्त ६७५ कोटी डॉलर्स कर्जे उभारण्याची परवानगी आहे.

३ ECAFE ( इकॉनॉमिक कमिशन फॉर एशिआ अँड दि फार ईस्ट ) स्थापना १९४७; १५ पूर्ण सभासद राष्ट्रें; ९ निम-सभासद राष्ट्रें; मुख्य कचेरी बँकाक, सयाम, येथें.

४ ECE ( इकॉनॉमिक कमिशन फॉर युरोप )—स्थापना १९४७; १८ सभासद राष्ट्रें; आणखी १० राष्ट्रें विचार-विनिमयांत भाग घेतात. मुख्य कचेरीः जिनीव्हा.

५ ECLA ( इकॉनॉमिक कमिशन फॉर लॅटिन अमेरिका) स्थापना १९४८; २४ राष्ट्रें सभासद; मुख्य कचेरी; सँटीॲगो.

६ ECOSOC ( इकॉनॉमिक अँड सोशल कौन्सिल ऑफ दि युनायटेड नेशन्स ) जनरल ॲसेंब्लीनें १८ राष्ट्रांची सभासद म्हणून निवड केली आहे. संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या आर्थिक व सामाजिक कार्याबद्दल जनरल ॲसेंब्लीला जबाबदार. संयुक्त-राष्ट्र-संघटनेतर्फे देण्यांत येणाऱ्या तांत्रिक मदतीचा आढावा घेणें आणि धोरणाबद्दल माहिती देणें, हीं कामेंहि करते. ह्या कामासाठीं एक टेक्निकल असिस्टन्स बोर्ड नेमण्यांत आलें आहे. ह्या संस्थेच्या उप-संघटना म्हणून वरील तीन संघटना काम करतात.

७ ECSC ( युरोपिअन कोल अँड स्टील कॉम्युनिटी )—युरोपमध्यें कोळसा आणि पोलाद ह्यांची एकसंघ बाजारपेठ निर्माण करण्यासाठीं शुमन योजना अंमलांत आणण्याचा प्रयत्न करणारी संघटना. स्थापना जुलै १९५२; बाजारपेठेच्या कार्याला फेब्रुआरी १९५३ मध्यें प्रारंभ झाला.

८ EPA ( युरोपिअन प्रॉडक्टिव्हिटी एजन्सी )—स्थापना १९५३; संघटनेच्या सभासद-राष्ट्रांत अधिक उत्पादन करण्याच्या कामीं उत्तेजन देण्याचा संघटनेचा हेतु आहे.

९ EPU ( युरोपिअन पेमेंटस् युनिअन )—स्थापना १९५०. उद्देश : निरनिराळ्या राष्ट्रांत होणाऱ्या दृश्य आणि अदृश्य व्यापारांमुळें अनेक देशांच्या चलनांची जी देवाणघेवाण करावी लागते तिची व्यवस्था करणें; ह्या राष्ट्रांशीं आर्थिक दृष्टया निगडित असलेल्या समुद्रपार राष्ट्रांच्या चलनाच्या व्यवहारांचीहि सोय करणें.

१० FAO (फूड अँड ॲग्रिकल्चरल ऑर्गनायझेशन ऑफ युनायटेड नेशन्स )—स्थापना १९४५; १९५१ पासून रोम येथें मुख्य कचेरी; ७१ राष्ट्रें सभासद; जगांतील अन्नाच्या व शेतीच्या उत्पादनासंबंधीं माहिती गोळा करणें आणि त्यासंबंधीं कार्यक्रम आंखणें हीं कामें करणारी खास संघटना. १९५४ सालचें अंदाजपत्रक ६० लाख डॉलर्सचें आहे.

११ FOA ( फॉरिन ऑपरेशन्स ॲडमिनिस्ट्रेशन, यु. स्टेट्स ) स्थापनाः ऑगस्ट १९५३, मुख्य कार्य : अविकसित देशांना देण्यांत येणाऱ्या तांत्रिक मदतीच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणें; मित्र राष्ट्रांना आर्थिक मदत देणें; लष्करी मदतीच्या कार्यक्रमावर नजर ठेवणें.

१२ GATT ( जनरल ॲग्रीमेंट ऑन टॅरीफ्स् अँड ट्रेड ) स्थापना १९४७; ह्या संस्थेला आंखीव संघटना अशी नाहीं. निरनिराळ्या ३४ राष्ट्रांनीं आपसांत जकातीसंबंधीं केलेले करार, असें तिचें स्वरूप आहे. जकातीसंबंधीं सध्या चालू असलेल्या सवलतींचें संरक्षण करणें हें तिचें कार्य आहे.

१३ IBRD ( इंटरनॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट )—ही संस्था "वर्ल्ड बँक" म्हणून अधिक प्रसिद्ध आहे. स्थापना १९४५; कार्याला प्रारंभ जून १९४६; ५६ राष्ट्रें सभासद. संयुक्त-राष्ट्र-संघटनेची खास उपसंघटना; सभासद राष्ट्रांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठीं उत्पादक योजनांना योग्य तारणावर कर्जे देणें आणि तांत्रिक सल्ला देणें, असा संघटनेचा उद्देश आहे. अधिकृत भांडवल १,००० कोटी डॉलर्स, विकलें गेलेलें भांडवल ९०४ कोटी डॉलर्सच्यावर; त्यापैकीं २० टक्के भांडवल वसूल झालेलें आहे. वसूल भांडवलापैकीं २ टक्के सोन्याच्या स्वरूपांत आणि १८ टक्के सभासद राष्ट्रांच्या स्वतःच्या चलनाच्या स्वरूपांत. ३१ मार्च, १९५४ अखेर १८७ कोटी डॉलर्सच्यावर कर्जें मंजूर करण्यांत आलेलीं आहेत.

१४ ILO ( इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन )—स्थापना १९१९; १९४६ पासून संयुक्त-राष्ट्र-संघटनेची खास उपसंघटना; ६९ राष्ट्रें सभासद; हेतु : कामगारवर्गाची परिस्थिति सुधारणें. १९५३ च्या प्रारंभीं संस्थेनें केलेल्या ७३ शिफारसींना जरूर

सुंदर बनारसी पातळें, नवीन जरीचीं लुगडीं व मिलचें कापड

यांकरितां

शाहाडे आठवले लि., दादर

शाहाडे बिल्डिंग; एन्. सी. केळकर रोड, दादर, मुंबई २८

:: टेलिफोन ६०५५४ ::

तितक्या राष्ट्रांची मान्यता मिळून त्या अंमलांत आलेल्या आहेत. १९५४ सालचें अंदाजपत्रक ६० लाख डॉलर्सच्या वर.

१५ IMF ( इंटरनॅशनल मॉनेटरी फंड )–स्थापना १९४४; १९४७ सालीं कार्याला सुरवात; ५६ राष्ट्रें सभासद. संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या ह्या उपसंघटनेचें उद्दिष्ट निरनिराळया राष्ट्रांच्या नाणें-विषयक धोरणांत सहकार्य घडवून आणणें आणि त्यांचीं चलनें स्थिर राखणें असें आहे. चालकांचे परस्परांमधील दर कायम असावे असा तिचा आग्रह असतो. पण चलनांचा तोल मूलतःच गेला असेल तर दरांत बदल करतां येतो. जानेवारी १९५४ मध्यें संस्थेजवळ सुमारें ८७२ कोटी डॉलर्स किंमतीचीं चलनें व सोनें होतीं.

१६ NATO ( नॉर्थ ॲटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन ) स्थापना १९४९; शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी सामुदायिक संरक्षणाच्या प्रयत्नांचें एकीकरण करणें हा संघटनेचा उद्देश आहे. सभासद–राष्ट्रांच्या मूलभूत उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्याचेंहि काम संघटना करते. यू. एस्. ए., कॅनडा व युरोपांतील १८ देश सभासद आहेत.

१७ OEEC ( ऑर्गनायझेशन फॉर युरोपिअन इकॉनॉमिक कोऑपरेशन )–स्थापना १९४८; १८ राष्ट्रें सभासद; मार्शल योजनेप्रमाणें अंमलांत आणावयाचे कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी ही संघटना निर्माण करण्यांत आली. युरोपिअन राष्ट्रांचें सहकार्य घडवून आणून, व्यापारी व हुंडणावळीची देव-घेव अधिक सुलभ करणें हाहि एक हेतु आहे.

१८ RFC ( रीकन्स्ट्रक्शन फिनॅन्स कॉर्पोरेशन, यू. एस्. ए. )–१९३२ सालच्या मंदीच्या वेळीं उभारण्यांत आलेली खास संघटना; हेतूः उद्योगधंदे, द्रव्यविषयक संस्था आणि सार्वजनिक उपयोगाच्या संस्था ह्यांना कर्जें देणें, १९५३ सालीं कर्जें


जनता सहकारी बँक, लिमिटेड

८६६ सदाशिव पेठ, फुले मार्केट रस्ता, पुणें २

अल्पावधींत जनतेच्या विश्वासाचें ठिकाण

★ प्रमुख शहरीं हुंड्या व बिल्स कलेक्शनची योजना
★ अल्प मुदतीच्या ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर
★ नाममात्र सभासदत्वाची योजना
★ काटकसरीसाठी बचत योजना
★ कार्यक्षम व्यवस्थापकांची देखरेख

बँकिंगच्या सर्व व्यवहारांसाठी भेटा. { द. शं. जमदग्नि, मॅ. डायरेक्टर

महाराष्ट्र भुवन, बेळगांव

—मुजावर गल्ली—

महाराष्ट्राचे व कर्नाटकचें अत्यंत आवडतें व सुखसोइनें युक्त

बेळगांव मुजावरगल्ली. } मालक महाराष्ट्र भवन

Bank With DENA BANK
DEVKARAN NANJEE BANKING CO. LTD.
ESTABLISHED 1938

देवकरण नानजी बँकिंग कं. लि.

६१ शाखा आणि १३ सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | १ कोटि | रु. |
| खपलेलें व वसूल | ५० लक्ष | रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | २६ लक्ष | रु. |
| ठेवी (३०-६-५४) | ११½ कोटी | रु. पेक्षां ज्यास्त |
| खेळतें भांडवल(३०-६-५४) | १४ कोटी | रु. पेक्षां ज्यास्त |
| खात्यांची संख्या | ९० हजारांपेक्षां ज्यास्त | |

मुंबईत १८, गुजरातमध्यें १७, सौराष्ट्रांत १२, महाराष्ट्रांत ११ आणि मध्यप्रदेश, कलकत्ता व दिल्ली येथें प्रत्येकी १ ह्याप्रमाणें कचेऱ्या.

सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

यंदाची दीपावलि व नूतन वर्ष आमच्या ठेवीदारांना आनंदाचें व सुखाचें जावो.

प्रवीणचंद्र व्ही. गांधी
मॅ. डायरेक्टर.

मुंबई राज्यांतील एक आदर्श अर्बन सहकारी बँक

दि भुसावळ पीपल्स को. बँक लि.

स्टेशन रोड, भुसावळ. ( पू. खा. )

फो. नं. ३६ ] स्थापना १९२५ [ पोस्ट बॉक्स नं. ३

३०–९–१९५४ चे आकडे

| | | |
|---|---|---|
| भांडवल | रु. | २,००,००० |
| खपलेलें | रु. | १,५०,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. | १,१३,१४४ |
| इतर रिझर्व्हज् | रु. | १,४४,८१८ |
| ठेवी ( सर्व प्रकारच्या ) | रु. | २०,४९,३४५ |
| खेळतें भांडवल | रु. | २५,६५,७८० |

—डायरेक्टर मंडळ—

श्री. हरि सदाशिव खरे, चेअरमन.
श्री. रामकृष्ण सोनजी पाटील, व्हाइस चेअरमन.
श्री. निवृत्ति रामचंद्र फाटक
श्री. भीमभाई वसनजी नायक
श्री. सरूपचंद हिरालाल बंब
श्री. सदाशिव विठ्ठल वाड
श्री. सदाशिव दामोदर नाईक
श्री. जिनाभाई जी. देसाई, मॅनेजर
श्री. रतनजी एन. देसाई, आसि. मॅनेजर

★ सभासद व बिगर–सभासद ह्यांचेकडून बँक करंट, सेव्हिंग्ज आणि मुदती ठेवी, सोइस्कर व्याजाच्या दरानें स्वीकारते. कर्ज-दारांना रिबेट, हे बँकेचें खास वैशिष्ट्य आहे. मेंबर्स प्रॉव्हिडंट फंड ह्या नांवाची बचत योजना अंमलांत आहे. बँक सभासदांना वैद्यकीय मदतीची व्यवस्था करते. शेअर्स, रोखे, विमा पॉलिसी, शेतीचा व औद्योगिक माल, सोन्या–चांदीचे दागिने, ह्यांचे तारणावर बँक सभासदांना कर्ज देते.

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

देण्याचे अधिकार समाप्त झाले. १९५४ च्या जूनमध्यें संस्था विसर्जन करण्यांत आली.

१९ UN (युनायटेड नेशन्स)–२६ जून १९४५ रोजीं स्थापना; सध्या ६० राष्ट्रें सभासद; जनरल ॲसेंब्लींत प्रत्येक राष्ट्राला १ मत असतें.

२० SEATO (साउथ ईस्ट एशिया ट्रीटी ऑर्गनायझेशन) पाकिस्तान, थाइलंड, फिलिपाइन्स हे तीन आशियाई देश व ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, ग्रेट ब्रिटन व युनायटेड स्टेट्स ह्यांनीं मनिला येथें सह्या करून उभारलेली संघटना. आग्नेय आशिया व नैर्ऋत्य पॅसिफिकमधील देशांना आक्रमणापासून संरक्षणाचा करार, सप्टेंबर, १९५४.


महाराष्ट्रांतील नागरी सहकारी चळवळींमध्यें कित्येक वर्षें लोकादरास व ठेवीदारांच्या विश्वासास पात्र असलेली एकमेव नागरी सहकारी संस्था

**दि पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. पंढरपूर (जि. सोलापूर)**

| | |
|---|---|
| (१) शेअर भांडवल | ... रु. ५८,६२० |
| (२) रिझर्व्ह फंड | ... रु. ५२,०२१ |
| (३) इतर फंडस् | ... रु. ४८,४८९. |
| (४) ठेवी | ... रु. ७,४०,१४४ |
| (५) सरकारी कर्जरोख्यांत गुंतविलेली रक्कम | ... रु. ४,११,०५० |
| (६) खेळतें भांडवल | ... रु. ८,९१,२७८ |

या बँकेंत मुदतीच्या ठेवी, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक्स, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

तसेंच सभासदांमध्यें बचतयोजनेचा प्रचार करणेचे दृष्टीनें या बँकेंत 'सभासद प्रॉव्हिडंट फंड' पद्धति सुरू केली आहे.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं अवश्य फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां ऑफिसकडे लिहा.

पं. रा. कुलकर्णी, जी. डी. सी. ॲण्ड ए. — मॅनेजर
औ. ह. कवठेकर — चअरमन



रौप्यमहोत्सवोन्मुख

**दि कोरेगांव को-ऑपरेटिव्ह पीपल्स बँक लि., कोरेगांव**

(स्थापना ४-१२-१९२९)

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत भांडवल | रु. | ८०,००० |
| (२) भरलेलें भाग भांडवल | रु. | ६६,५५० |
| (३) रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४७,९०० |
| (४) ठेवी | रु. | ३,०६,४०० |
| (५) खेळतें भांडवल | रु. | ४,९५,००० |

रौप्यमहोत्सवानिमित्त आकर्षक दरानें ठेवी घेण्यास सुरुवात केली आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

कृ. द. बोकील — चेअरमन
शं. रा. बोकील — मॅ. डायरेक्टर
गो. रा. टंकसाळे — प्रेसिडेंट



यंदाची दिवाळी सर्वांस सुखाची जावो !

**************************************

**दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि.**

कोल्हापूर.

(स्थापना १९३३)

| | |
|---|---|
| १) शेअर भांडवल उभारलेलें | रु. २,००,००० |
| २) शेअर भांडवल वसूल | रु. १,०३,२०० |
| ३) रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ९०,८०० |
| ४) खेळतें भांडवल | रु. ४,५०,००० |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

जे. डी. भोसले, — ऑ. सेक्रेटरी
डी. ए. शिंदे, बी. ए., बी. टी., — प्रेसिडेंट



**दी रत्नागिरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना १९१४

हेड ऑफिस :—रत्नागिरी

शाखा :—(१) संगमेश्वर, (२) देवरुख.

| | |
|---|---|
| खपलेलें भागांचें भांडवल— | रु. १५ हजारांवर |
| गंगाजळी व इतर निधी— | रु. १॥ लक्ष रुपयांचेवर |
| ठेवी— | रु. १७ लक्ष रुपयांचेवर |
| खेळतें भांडवल— | रु. २४ लक्ष रुपयांचेवर |

मुंबई राज्यांतील प्रथितयश सहकारी अर्बन बँकांमधील एक यशस्वी बँक

चालू, सेव्हिंग्ज व कायम मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. अधिक माहिती समक्ष अगर पत्रद्वारें आनंदानें व तत्परतेनें पुरविली जाईल.

वि. वि. भाटवडेकर
मॅनेजर



[स्थापना १९२१]

## गरगट्टी अँड सन्स

शहापूर–बेळगांव

**धोबी, फॅमिली व शिंपी**

**पेटंट इस्त्रीचे कारखानदार**

*************************************

**आमचे ग्राहकांस हें वर्ष सुखाचें जावो**

*************************************



## दि सराफ बँक ऑफ कोल्हापूर लि., कोल्हापूर

(१९४५)

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. ११,००० |
| खेळतें भांडवल | रु. ४,००,००० |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

— संचालक मंडळ —

श्री. शं. ग. जामसाडेकर (चेअरमन)
श्री. बा. सु. साळोखे (व्हा. चेअरमन)
श्री. अ. के. चिपडे
श्री. आ. स. जिर्गे
श्री. द. स. करमरकर
श्री. अ. ह. साळवणकर
श्री. रा. ग. कदम
श्री. ग. गो. पोतदार
श्री. दि. प. माने

व. बा. घालवाडकर
मॅनेजर



# दि भारत इंडस्ट्रियल बँक लि., पुणें शहर


**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, श्रीरामपूर, लोणावळा, खोपोली, ओझर (जि. नाशिक)

*****

**— ठेवींचे दर —**

| | |
|---|---|
| चालू ... ... | ½ टक्का |
| सेव्हिंग्ज ... ... | २ टक्के |
| मुदतीची ठेव ... | ६ महिने २½ टक्के ते ५ वर्षे ४¼ टक्के. |



बँकेची इमारत

★ शॉर्ट टर्म डिपॉझिटस् सवलतीचे दरानें स्वीकारली जातात.
★★ नियमित बचत योजना ... रिकरिंग डिपॉझिटस् स्वीकारली जातात.
★★★ मुख्य इमारतींत सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें सोयीस्कर भाड्यानें लॉकर्स मिळतात.
★★★★ मुख्य इमारतींत स्त्री खातेदारांची स्वतंत्र सोय.
★★★★★ व्हॉल्टमध्यें सीलबंद पेट्या, ट्रंका सुरक्षितपणें सांभाळण्याची व्यवस्था.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

हेड ऑफिस व शाखांचेकडे चौकशी करावी अथवा माहिती मागवावी.

लक्ष्मी रोड, पुणें २

नी. ना. क्षीरसागर
रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
मॅनेजिंग डायरेक्टर्स

*******************************************************

ही दीपावलि व नूतन वर्ष आमचे ठेवीदार, भागीदार, खातेदार व हितचिंतक यांना सुखसमृद्धीची जावो

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र

## शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— यशःप्राप्तीकरितां —

॥ अंतरी शुद्ध भावना असावी लागते ॥

********

हजार टनांच्या मशिनरीकरितां ठेवी घेणें जरूर झालें त्यावेळीं शेअर भांडवलावर नफा व ठेवींची परतफेड यांकरितां आंखलेली योजना.

*********

हजार टनांची मशिनरी व दोन हजार एकर ऊंस यापासून एक लक्ष पोतीं साखर होऊं शकते.

*********

या एक लक्ष पोत्यांपैकी

(१) पन्नास हजार पोतीं — शेअरवर १० टक्के नफा.
(२) पन्नास हजार पोतीं — ठेवींची परतफेड.

*********

ठेवी दर वर्षीं परत होऊन व्याज थांबलें म्हणजे शेअरवर २० टक्के नफा देतां येईल.

*****

या योजनेमुळें

ठेवी सुरक्षित राहून जास्त व्याजाचा फायदा ठेवीदारांना मिळाला आहे.

भागीदारांना यापुढें १० टक्के नफा मिळत जाईल.

*********

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना यंदाची दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो.

*************

१८० सदाशिव पेठ,
लक्ष्मी-पथ, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स

# सांगली बँक लि., सांगली

स्थापना १९१६ : शेड्युल्ड बँक

मुंबई शाखा—फोर्ट

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | : | रु. ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | : | रु. ५,२५,००० |
| ठेवी व इतर | : | रु. १,००,००,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री आर. व्ही. देशमुख, B. A., B. LITT. (Oxon)
कलेक्टर, सातारा साऊथ, सांगली
चेअरमन, (Ex. officio, Bom. Govt. Nominee)
श्री. आर. डी. टेटरेकर, B. A., LL. B.
श्री. फुलचंद रुपचंद शहा
श्री. तात्यासाहेब श्री. आरवाडे
श्री. बाबुराव चिंतामणी बिराज,
श्री. चारुदत्त बाबाजी शिरगुप्पे
श्री. बी. ए. आरवाडे


मॅनेजर
श्री. एस् के. गुत्ते, M. A., C. A. I. I. B.

**व्याजाचे दर**

| | | | द. सा. द. शें. |
|---|---|---|---|
| करंट | .... | .... रु. | ०–८–० |
| सेव्हिंग | .... | .... रु. | १–८–० |
| स्पे. सेव्हिंग | | .... रु. | २–०–० |
| १ वर्ष मुदत | | .... रु. | ३–०–० |
| ३ वर्ष मुदत | | .... रु. | ४–०–० |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.




# किर्लोस्कर

लोखंडी नांगर


शेतीचीं अवजारें

दिवाळीच्या शुभमुहूर्तावर खरेदी करा व आपला आनंद द्विगुणित करा.



इलेक्ट्रिक पंपिंग सेट

ही दिवाळी
आमच्या ग्राहकांस
व आश्रयदात्यांस
सुखसमृद्धीची
जावो !



उसाचे चरक

किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण मुद्रणालयांत श्री. केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्री. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.